29 MARCH TO 04 APRIL 2021 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 27/03/2021 9:21 PM Page 1

C M Y K

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ अंक : १४ सोमवार दि. २९ मार्च २०२१ ते रविवार दि. ०४ एप्रिल २०२१ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## सोशल डिस्टन्स पायदळी तुडवणाऱ्या या भाजपा आमदाराला देंवेंद्र फडणवीस राजीनामा द्यायला लावणार का?

'आपला तो बाब्या आणि दुसऱ्याचे ते कारटे' या न्यायाने सध्या भाजप नेते वागत आहेत. पूजा चव्हाण आत्महत्या प्रकरणात पोहरादेवी मंदिरासमोर गर्दी जमवणाऱ्या माजी वनमंत्री संजय राठोड यांच्यावर सोशल डिस्टन्सच्या नियमचा भंग केल्याबद्दल भाजपा नेत्यांनी बेछूट आरोप करीत त्यांचा राजीनामा मागितला होता. तर अनिल देशमुख यांच्यावरही सोशल डिस्टन्सचा भंग करून कथित पत्रकार परिषद घेतल्याबद्दल त्यांच्यावर कारवाईची मागणी केली होती. मग आता ३० ते ४० कार्यकर्त्यांना घेऊन वीज मंडळाच्या कार्यालयात घुसून राडा करणाऱ्या भाजपा आमदार मंगेश चव्हाण यांनीही सोशल डिस्टन्सच्या नियमाचा भंग केलाय. यावेळी आमदार महोदय आणि त्यांच्या कार्यकर्त्यांच्या तोंडावर मास्क सुद्धा नव्हते. त्यामुळे स्वतःला जबाबदार विरोधी पक्ष नेते म्हणवून घेणारे फडणवीस आता मंगेश चव्हाण याला आमदारकीचा राजीनामा द्यायला लावणार आहेत का? किंवा सोशल डिस्टन्सच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या भाजप कार्यकर्त्यांवर पक्षांतर्गत कारवाई करणार आहेत का? याचे उत्तर त्यांनी महाराष्ट्राला द्यावे.

# वीज महावितरणच्या कार्यालयात शिस्तीचा ढोल फुटला भाजपा आमदार मुस्लिम अधिकाऱ्याच्या जीवावर उठला





जमलेले महावितरण विभागाचे कर्मचारी

जळगाव/ललित खरे

राज्यातील सत्ता गेल्या पासून भाजपा नेते असे काही पिसाळले आहेत कि सत्ताधारी पक्षावर उलट सुलट आरोप करूनही त्यातून काहीही हाती लागत नसल्याने त्यांनी आता सरकारी कर्मचाऱ्यांवर आपला राग काढायला सुरुवात केली आहे. सरकारी आदेशानुसार वीजबिल वसुलीची मोहीम राबवणाऱ्या वीज मंडळाच्या एका अधिकाऱ्याला भाजपचे आमदार मंगेश चव्हाण आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी कार्यालयात घुसून खुर्चीला बांधून बेदम मारहाण केली. अर्थात वीजबिल वसुली हे वर वरचे कारण असून तो अधिकारी मुस्लीम असल्यामुळेच त्याला टार्गेट करण्यात...पान २ वर

## आम्ही मुख्यमंत्र्यांकडे दाद मागणार-फारुख

माझा काहीही गुन्हा नसताना मला भाजपा आमदार आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी जी अपमानास्पद वागणूक दिली त्याने मला प्रचंड दुःख झाले असून या घटनेमुळे वीज मंडळाचे सर्व कर्मचारी संतापलेले आहेत. वीज बिल वसुली बाबत आम्ही सरकारच्या आदेशाचे पालन करीत आमची ड्युटी बजावत असताना लोकप्रतिनिधी जर आम्हाला त्रास देवू लागले, तर आम्ही आमचे काम कसे करायचे. त्यामुळे आमदाराने केलेल्या कृतीबद्दल आमची ऑफिसर्स युनियन मुख्यमंत्र्यांना भेटून तक्रार करणार असल्याचे मारहाण झालेले अभियंता अधीक्षक मोहम्मद फारुख यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगीतले.

## अंधश्रद्धेतून लहान मुलाचा नरबळी दिला वर्षानंतर आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल झाला

जळगाव/क्राईम रिपोर्टर



महाराष्ट्रात शाहू, फुले, आंबेडकर यांच्यासारखे थोर समाज सुधारक होवून गेले. तसेच शाम मानव दाभोलकर यांच्या सारख्या सामाजिक कार्यकर्त्यांनी अंधश्रद्धेच्या विरुद्ध जनजागृती केली. सरकारला जादूटोणा विरोधी कायदा करायला लावला. तरीही लोकांच्या मनातली अंधश्रद्धा गेलेली नाही. आपला मुलगा आजारातून बारा व्हावा म्हणून एका माणसाने गावातल्याच एका लहान मुलाचा बळी दिला. विशेष म्हणजे पोलिसांनी या प्रकरणाची फिर्याद घेण्यास टाळाटाळ केल्याने पिडीत कुटुंबाला न्यायालयाचा दरवाजा ठोठावा लागला. तेंव्हा कुठे एका वर्षानंतर या प्रकरणी १६ जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. नेहमीच आजारी राहणारा मुलगा बरा व्हावा म्हणून मांत्रिकाच्या सल्ल्याने ओळखीच्या दहा वर्षे वयाच्या मुलाचा नरबळी दिल्याप्रकरणी मांत्रिकासह अमळनेर तालुक्यातील डांगर बुद्रुक गावातील सोळा जणांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल झाला आहे. बळी गेलेल्या मुलाच्या वडिलांनी न्यायालयाचा आदेश मिळवून वर्षभरानंतर का असेना, पोलिसांना गुन्हा दाखल करायला भाग पाडले आहे. ...पान २ वर

## सालगड्याच्या पत्नीला भेटायला गेला म्हातारपणातील अय्याशीमुळे रंगनाथ मेला





लातूर/राम पोटोळे

माणूस कितीजरी बाहेरख्याली असला तरी त्याचे वय झाल्यावर त्याने आपल्या या वाईट सवयी सोडायच्या असतात. पण म्हणतात ना जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही. कवठ केज येथील रंगनाथ गूठे याच्या बाबतीतही तसेच होते. त्याचे आपल्या सलगाड्याच्या पत्नीशी अनैतिक संबंध होते. मात्र वय झाले दोघांचीही मुले बाले मोठी झाली. ती बाई दुसऱ्या गावात राहायला गेली. तरी रंगनाथ तिची पाठ सोडत नव्हता. तिला भेटायला जात होता. हे तिच्या कुटुंबातील लोकांना मान्य नव्हते आणि त्यातूनच त्यांनी रंगनाथचा खून केला. मात्र पोलिसांनी मोठ्या शिताफीने आरोपींना अटक केली.


दि. १७ मार्च २०२१ रोजी सावरगाव ते लातूर जाणाऱ्या रस्त्यावर महेश आनंदराव शिंदे यांच्या उसाच्या फडात एक अनोळखी इसमाचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडल्याची वार्ता मुरुड पोलीस ठाण्यात येऊन धडकली. ठाणे अंमलदारांनी घटनेची प्राथमिक माहीती घेवून वरीष्ठांना खबर दिली. मिळालेल्या माहितीवरून मुरुड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन ढोणे यांनी पोउपनि सुर्वे, पोना. बहादूरअली सय्यद, ...पान २ वर

## प्रियकराचा लागला तिला भलताच लळा जन्मदात्या आईचा मुलीनेच चिरला गळा



छाया : रामेश्वर गवई

उल्हासनगर/राजेंद्र वेदांते



**सध्या प्रेमाच्या नावाखाली तरुण पिढीचा जो लैंगिक व्यभिचार चालला आहे त्यात प्रेमी युगल इतके आकंठ बुडून गेलेत कि त्यांच्या या व्यभिचाराच्या आड येणाऱ्या कोणाचाही मुलाहिजा ठेवायला ते तयार नाहीत. आपल्या सुखाच्या आड येणाऱ्यांचा कसाही करून काटा काढायचा एवढेच त्यांना ठावूक असते. त्यासाठी त्यांची कोणत्याही थराला जाण्याची तयारी असते. अशावेळी शरीरसुखासाठी हपापलेले आणि प्रेमात आंधळे झालेल्यांना रक्ताच्या नात्याचाही विसर पडतो. उल्हासनगरात अशीच एक घटना घडली आहे. एका तरुणाच्या प्रेमात पागल झालेल्या एका अल्पवयीन मुलीने प्रियकराच्या मदतीने चक्क जन्मदात्या आईची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी या प्रेमी युगुलाला अटक केली असून या घटनेने संपूर्ण उल्हासनगर हादरले आहे.**

उल्हासनगर शहरातील कॅम्प नंबर ४ च्या २६ सेक्शन परिसरातील एका महिलेचा तिच्या घरातच रक्ताच्या थारोळ्यात मृतदेह पडल्याची माहिती स्थानिकांनी पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर विठ्ठलवाडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी एका मध्यमवयीन महिलेचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. तिच्या शरीरावर धारधार शस्त्राचे असंख्य वार होते. तिचा गळा चिरलेला होता. घरात सर्वत्र रक्ताचा सडा पसरलेला होता. मारेकऱ्याने हल्ला केल्यानंतर बळीत महिला स्वतःचा जीव वाचवण्यासाठी त्या घरात इतरत्र फिरली असावी असा अंदाज पोलीसांनी लावला होता. मारेकर्याने अत्यंत क्रूरपणे आणि निर्दयपणे या महिलेची हत्या केली असावी हे घटनास्थळी पडलेल्या रक्ताचा सडा यावरून स्पष्ट होत होते. पोलीसांनी केलेल्या प्राथमिक चौकशीत मृत महिलेचे नाव विद्या असल्याचे पोलीसांना समजले. विद्याची हत्या करेपर्यंत मारेकर्याची मजल जाते म्हणजे तसे ठोस कारण असले पाहिजे. ते कारण शोधले की या खूनाच्या गुन्ह्याचा उलगडा होईल. असे या तपास पथकाने ठरवले. मृत महिलेचा मृतदेह पोलीसांनी शवविच्छेदनासाठी पाठवला. ...पान ६ वर

## सायकल चोरीमुळे यंत्रमाग मालक चिडला संशयावरून त्याने नोकराचा मुडदा पाडला

इचलकरंजी/क्राईम रिपोर्टर

एखादा माणूस क्रिमिनल असला आणि नंतर भलेही तो सुधारला तरी त्याचा मुळचा तापत आणि गुन्हेगारी स्वभाव कायम असतो. एका खुनाच्या प्रकरणात शिक्षा भोगून आलेला इचलकरंजी येथील अल्ताफ बाहेर आल्यावर सुधारला होता आणि त्याने यंत्रमाग उद्योग सुरु केला होता. त्याच्याकडे अलीम नावाचा एक कारागिर कामासाठी यायचा मात्र अल्ताफच्या दोन सायकली चोरीला जाताच या सायकली आलीम यानेच चोरल्या असा अल्ताफला संशय होता आणि हा संशय येताच त्याच्यातील क्रिमिनल जागा झाला आणि त्याने आलीमच्या घरून त्याचे अपहरण करून त्याला ठार मारले. या प्रकरणी अल्ताफ याला अटक करण्यात आली आहे.



मयत

आरोपी

पाठोपाठ घडणाऱ्या खूनासारख्या घटनेने इचलकरंजी शहर परिसरात चांगलीच खळबळ उडाली आहे. एका खूनाचा तपास संपतो ना संपतो तोच दुसरा खून हा उजेडात येतो याने पोलीस खाते ही बुचकाळ्यात पडले आहे. पाठोपाठ सलग घडणाऱ्या खूनाच्या सत्रामुळे वस्त्रनगरी ही क्राईम नगरी बनली आहे की काय असे मत सर्वसामान्य माणसातून व्यक्त केली जात आहे. परवाच मंगळवार दि. १६ मार्च २०२१ रोजी सकाळीच पार्वती औद्योगीक वसाहतीसमोरील संगमनगर येथील मोकळ्या मैदानावर कोल्हापूर धाब्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर एका तरूणचा मृतदेह पडला ...पान ६ वर

## अनैतिक संबंधामुळे मैत्रीची दोरी तुटली लाईट येताच मित्राच्या पापाला वाचा फुटली

वाडा/रुपेश वाढे

**एखाद्याचा जर काटा काढायचा असेल व त्यातून स्वतःला सेफ करायचे असेल तर माणूस कशा प्रकारे प्लान करतो याचे उदाहरण दर्शवणारी एक भयंकर घटना वाडा तालुक्यातील कोनसई गावात घडली.**

पिंटू कुमार व विदेश शर्मा या दोन जिवलग मित्रांपैकी विदेश शर्मा याचे पिंटूच्या पत्नीशी छुपे अनैतिक संबंध होते. मात्र त्याला या संबंधाची कुणकुण लागताच आपल्या पाठीत सुरा खुपसणाऱ्या आपल्या या मित्राला त्याच्या गद्दारीची शिक्षा द्यायचीच असा त्याने निर्णय घेतला आणि आपल्याला त्या दोघांच्या संबंधातले काहीच ठावूक नाही असे दाखवीत अत्यंत थंड डोक्याने विदेश शर्माच्या हत्येचा प्लान केला. त्यासाठी त्याला नोकरीच्या निमित्ताने वाडा येथील कोनसई येथे आणले. तेथे त्याला कामाला लावले. मात्र तो संधीची वाट बघत होता आणि एकेरात्री गावातील विद्युत पुरवठा खंडित होताच त्याला संधी मिळाली आणि त्याने आपल्या दोन साथीदारांच्या मदतीने गम्छाने गळा आवळून त्या गद्दार मित्राची हत्या केली. त्यानंतर त्याचा मृतदेह पोत्यात भरून त्याची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न सुरु असतानाच त्यांच्या दुर्दैवाने ...पान ६ वर

## जमिनीच्या वादात सख्खे भाऊच वैरी झाले रक्ताच्या नात्याला त्यांनी कलंकित केले



मयत मनोज

सांगली/क्राईम रिपोर्टर

**ग्रामीण भागातील लोकांची उपजीविका हि प्रामुख्याने शेतीवर अवलंबून असल्याने शेतीच्या वाटणीवरून सतत वाद होत असतात आणि कधी कधी हे वाद इतके विकोपाला जातात कि माणूस रक्ताची नातीही विसरून जातो. आजवर शेतीच्या वादातून मुलाने आई बापाचा भावाने भावाचा खून केल्याच्या अनेक घटना घडलेल्या आहेत. मिरज तालुक्यातील करोली गावात अशीच एक घटना घडली आहे. जमिनीच्या वादातून एका दारुड्या भावाने आपल्या सख्ख्या भावाचीच हत्या केली.**

मिरज तालुक्यातील एम.करोली येथे वसंत इंगवले (देशमुख) हे आपल्या परिवारासह राहयला आहेत.त्यांना मनोज आणि नितीन अशी दोन मुले आहेत.त्यांची लग्ने त्यांनी केलेली आहेत.दोघांच्या बायका या सख्या बहिणी सख्या जावा झालेल्या असून.वसंत इंगवले याची दोन्ही करोली ३ एकर शेत जमीन आहे.त्यांनी ही ३ एकर शेतजमीन तोंडी आपल्या दोन्ही मुलांना वाटणी करून दिली आहे.त्यामुळे प्रत्येकी दीड एकर शेतजमीन ही मनोज आणि नितीन यांना वाटणीला आली होती. मनोज याला दोन मुले तर नितीन याला एक मुलगा आणि एक मुलगी असा दोघांचा परिवार असून ते दोघे ही वेगवेगळे राहत आहेत. त्याचे आई वडिलही ...पान २ वर



आरोपी नितीन

## मुलबाळ नसल्याने टोमणे एकूण जगणे असह्य झाले जाब विचारायला जाताच त्याला भावानेच ठार केले



अमरावती/क्राईम रिपोर्टर

निपुत्रिक असणे हा काही गुन्हा नाही. पण समाजातील बुरसट विचारसरणी असलेल्या लोकांचा मात्र अपत्यहीन दांपत्याकडे बघण्याचा दृष्टीकोन वाईट असतो. त्यांच्याकडून अशा अपत्यहीन दांपत्याला हिणवले जाते. मानसिक त्रास दिला जातो. विशेष म्हणजे अशा प्रकारचा त्रास देणारे कुटुंबातीलाच लोक असतात आणि जेंव्हा कुटुंबातील लोकांकडूनच अशी हेटाळणी केली जाते, तेंव्हा मात्र माणसाला राग येणे स्वाभाविक आहे. कैलाश गजबे आणि त्यांच्या पत्नीला मुलबाळ नव्हते. त्यामुळे त्याचा चुलत भाऊ आणि त्याचे कुटुंबीय कैलाश आणि त्याच्या पत्नीची सतत हेटाळणी करीत असत. त्यांना टोमणे मारीत असत. त्यातून त्यांच्यात वाद निर्माण झाला आणि एकेदिवशी या प्रकरणी जाब विचारायला गेलेल्या कैलासला त्याचा चुलत भाऊ सुनील त्याची पत्नी व आईने ठार मारले. या प्रकरणी पोलिसांनी तिन्ही आरोपींना अटक केली. ...पान २ वर

C M Y K

29 MARCH TO 04 APRIL 2021 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 27/03/2021 9:22 PM Page 1



पान १ वरून....

## वीज महावितरणच्या कार्यालयात ....

आले असा आरोप चाळीसगाव येथील नागरिकांनी केला आहे. त्यातच जळगाव महापालिकेतील भाजपची सत्ता गेल्याने भाजपचे नेते आणि कार्यकर्ते चिडलेले आहेत. अशावेळी एखादा दलित किंवा अल्पसंख्याक अधिकारी त्यांच्या तावडीत सापडला कि त्यांचा हिंदुत्ववादी उन्माद उसळून येतो आणि मग ते मागचा पुढचा जराही विचार न करता त्याच्यावर तुटून पडतात. शिस्त आणि राष्ट्रवादाचा ढोल बडवणाऱ्या भाजपचा हाच का राष्ट्रवाद हीच का शिस्त. बरे अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या मागणीबाबत हि त्यांचे धोरण कसे पक्षपाती आहे तेही महाराष्ट्राने अनेक वेळा पहिले आहे. बच्चू कडू यांनी एका सरकारी अधिकाऱ्याच्या कानाखाली मारली तेंव्हा फडणवीस आणि चंद्रकांत दादा सारख्या भाजपा नेत्यांनी त्या अधिकाऱ्यांची बाजू घेत थयथयाट केला होता. बच्चू कडूंवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली होती. मग आज भाजपा आमदाराने वीज मंडळाच्या कार्यालयात घुसून एका अधिकाऱ्याला खुर्चीला बांधून मारले, त्याचे अपहरण करण्याचा प्रयत्न केला. अशावेळी फडणवीस आणि चंद्रकांत दादा गप्प का? या प्रकरणात त्यांची वाचा का बसली. म्हणजे प्रशासनाच्या बाबतीत आपली भूमिका आपल्या सोयीनुसार ठरवायची हेच भाजपचे धोरण दिसतेय आणि अशाच प्रकारे पक्षपात करून दलित मुस्लिमांना टार्गेट करणाऱ्या या लोकांच्या हाती सत्ता द्यायची का शाहू, फुले, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात असले प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत हे भाजपने लक्षात ठेवावे, अशी संतप्त प्रतिक्रिया महाराष्ट्रातील जनता व्यक्त करीत आहे. दरम्यान वीज मंडळाच्या अधिकाऱ्याला मारहाण करणाऱ्या भाजप आमदार मंगेश चव्हाण आणि त्यांच्या ३१ कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली आहे. दरम्यान मंगेश चव्हाण यांच्यासह ३१ संशयितांना न्या.डी.बी. साठे यांच्या न्यायालयात हजर करण्यात आले. याप्रसंगी न्यायालयाने आमदार चव्हाण यांच्यासह इतरांना ३० मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. विधानसभेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन संपल्यानंतर संपूर्ण राज्यातील थकीत वीज असलेल्यांचे वीज कनेक्शन तोडण्याचे काम सुरु झाले होते. जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्यामधील जवळपास सात हजार शेतकऱ्यांची वीज तोडण्यात आली. त्याचाच जाब विचारण्यासाठी भाजपचे आमदार मंगेश चव्हाण यांनी अधीक्षक अभियंता मोहम्मद फारुख यांची भेट घेण्यासाठी त्यांची वेळ मागितली. फारुख यांनी त्यांना भेटीस बोलावताच आमदार चव्हाण आपल्या ३० कार्यकर्त्यांसह वीज मंडळाच्या कार्यालयात पोहचले. अधीक्षक अभियंता फारुख यांनी त्यांचे म्हणणे ऐकून घेतले व आम्ही फक्त तीन महिन्याची थकबाकी भरायला सांगतोय, मागील १० वर्षांची नाही आणि त्यासाठी थकबाकीदारांना रीतसर नोटीसही पाठवल्या आहेत हे आमदारांना समजावून सांगितले. पण मंगेश चव्हाण आणि त्यांचे कार्यकर्ते ऐकण्याचा मनस्थितीत नव्हते. त्यातच ते नशापाणी करून आल्याचे तिथल्या काही कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे ते अधिकच चिडलेले होते आणि त्यांनी फारुख यांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करून त्यांनी व त्यांच्या कार्यकर्त्यांनी फारुख यांना रस्सीने खुर्चीला बांधून ठेवले व मारहाण केली. दरम्यान फारुख यांना खुर्चीला बांधलेल्या अवस्थेत बाहेर नेण्यात आले. यावेळी तेथे हजार असलेले कर्मचारी नंदकुमार उमप व विवेक शिरसाठ यांनी आमदार चव्हाण व त्यांच्या कार्यकर्त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. या घटनेमुळे महावितरणांच्या विविध कर्मचारी संघटनांनी एकत्र येऊन जोपर्यंत आमदार व त्याच्या कार्यकर्त्यांवर कारवाई होणार नाही, तोवर काम बंद आंदोलन सुरु ठेवले जाईल असा इशारा दिला. त्यानंतर या घटनेची औद्योगिक वसाहत पोलिसात तक्रार करण्यात आली. या प्रकरणी आमदार मंगेश चव्हाण व त्यांच्या ४० ते ५० कार्यकर्त्यांवर भारतीय दंड विधान कलम ३५३, ३३२, १४३, १४७,१४९, ३५१, २९४, २६९, १८८ मुंबई पोलीस कायदा कलम १३५ तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ च्या कलम ५१ ते ६० प्रमाणे गुन्हा दाखल करून आमदार चव्हाण यांच्यासह ३१ जणांना अटक करण्यात आली. ही संपुर्ण प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी स्वतः अप्पर पोलीस अधीक्षक चंद्रकांत गवळी सहाय्यक पोलीस अधीक्षक कुमार चीन्था पोलीस ठाण्यात हजर होते.

## अंधश्रद्धेतून लहान मुलाचा नरबळी...

गेल्या वर्षी सात एप्रिल रोजी चतुर्दशीच्या दिवशी (चावदस) सकाळी नऊ ते दुपारी एक वाजेच्या दरम्यान हा प्रकार घडल्याचे फिर्यादी सुभाष बसराज राठोड यांनी म्हटले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार डांगर बुद्रुक येथील इंदल हिरामण चव्हाण यांचा मुलगा झिंग्या (वय साधारण १२ वर्षे) हा नेहमी आजारी राहत होता. तो बरा व्हावा म्हणून इंदल याने जादूटोण्यावर विश्वास ठेवत चावदस निमित्त ७ एप्रिल २०२० रोजी डाळ बट्टीच्या जेवणाचा कार्यक्रम शेतात ठेवला. या जेवणासाठी त्यांनी गावातीलच सुभाष राठोड यांचा मुलगा सुदर्शन याला निमंत्रण दिले. त्याला घरातून घेऊन येण्यासाठी झिंग्याला पाठवण्यात आले होते. शेतात आल्यावर सुदर्शनच्या कपाळावर टिळा लावून गळ्यात मिरची, लिंबूची माळ घालून त्याची पूजा करण्यात आली. नंतर त्याला शेताजवळील पाझर तलावात नेण्यात आले. सुभाष राठोड यांची त्यावेळी आरोपींनी समजूत काढण्याचा बराच प्रयत्न केला. झाले गेले होऊन गेले. आता मुलगा परत येणार नाही. आपण त्याचा दाह संस्कार करु (मृतदेह जाळून टाकू) असे त्यांचे म्हणणे होते. पण सुदर्शनच्या नातेवाईकांनी त्याचा दफनविधी केला. हा नरबळी असून, संबंधितांवर खुनाचा गुन्हा नोंदवा, असा अर्ज सुभाष राठोड यांनी अमळनेर पोलिस स्टेशनला दिला. मात्र, तपास करुन नंतर ठरवू, असे उत्तर त्यांना त्यावेळी देण्यात आले. गुन्हा नोंदवायला पोलिस टाळाटाळ करत असल्याचे पाहून सुभाष राठोड यांनी न्यायालयात अर्ज सादर केला. दरम्यान, न्यायालयाने अमळनेर पोलिस स्टेशनच्या प्रमुखांना या प्रकरणी गुन्हा दाखल करून तपास करण्याचे आदेश दिले. त्यानुसार अमळनेर पोलिसांनी सर्व आरोपींविरोधात भारतीय दंड विधान कलम ३०२, क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या कलम १२०(ब) आणि ३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक गंभीर शिंदे करीत आहेत. संशयित आरोपी रोहिदास हिरामण चव्हाण, कनिराम हिरामण चव्हाण, इंदल हिरामण चव्हाण, योगेश कनिराम चव्हाण, रामसिंग नंदा चव्हाण, दादू रोहिदास चव्हाण, नीलेश रोहिदास चव्हाण, सोनी रोहिदास चव्हाण, निकिता इंदल चव्हाण, चंद्रकला कनिराम चव्हाण, तुळसाबाई रोहिदास चव्हाण, भारती इंदल चव्हाण, ताई रामसिंग चव्हाण, शंकर रामसिंग चव्हाण, नवसाबाई हिरामण चव्हाण (सर्व रा. डांगर बुद्रुक) आणि भगत म्हणून काम करणारा ज्ञानेश्वर चव्हाण (रा. रणाईचे) हे सोळा जण घटनास्थळी उपस्थित होते. त्यांनी सुदर्शनला पाझर तलावाच्या पाण्यात नेऊन तोंड धरुन बुडवले आणि त्याचा बळी दिला. मात्र त्यातील एकालाही त्याची दया आली नाही. दुपारपर्यंत सुदर्शन घरी आला नाही म्हणून त्याच्या नातेवाईकांनी त्याची विचारपूस सुरू केली. त्याला तलावात बुडवल्याचे त्याच्या मित्रांनी सांगितले. त्यामुळे त्याचे आईवडील व नातेवाईक त्या शेताकडे त्याच्या शोधासाठी गेले होते. त्याठिकाणी ततलावाजवळ सुदर्शन निपचित पडलेला त्यांना दिसला. त्याच्या कपाळावर कुंकवाचा टिळा होता. गळ्यात मिरची व लिंबाची माळ होती. सुदर्शनचा बळी दिला गेल्याचे त्यांच्या आपल्या लक्षात आले. ते दृश्य पाहून काही वेळ त्याच्या वडीलांची देखील शुद्ध हरपली होती. नंतर नातलगांनी त्यांना कसेबसे घरी आणले होते.

## मुलबाळ नसल्याने टोमणे एकूण ...

वंशाचा दिवा असावा हे प्रत्येक विवाहीत जोडप्याचे स्वप्न असते. त्यासाठी प्रत्येक विवाहीत स्त्री पुरुष प्रयत्नशील असतात. ज्या जोडप्यांना लग्नानंतर मुलबाळ होत नाही त्यांची मानसिक अवस्था बिकट झालेली असते. अशा जोडप्याला मुलबाळाच्या मुद्द्यावरुन कुणी शाब्दिक त्रास दिला म्हणजे अर्थाचा अनर्थ देखील होत असतो. अमरावती शहरातील राजापेठ पोलिस स्टेशन हद्दीत हमालपुरा परिसर आहे. या परिसरात दोघे चुलत भाऊ जवळ जवळ राहतात. यापैकी एका भावाला मुलबाळ नसल्यामुळे दुस-या भावाने त्याला हिणवल्याची भावना झाली. त्या रागातून एका भावने दुस-याची हत्या केल्याची घटना काही दिवसांपुर्वी घडली. या घटनेत लोखंडी बत्ता आणि चाकूचा वापर करण्यात आला. याप्रकरणी पोलिसांनी मारेक-यासह त्याची आई व अन्य एक महिला अशा तिघांना अटक करत कारवाई केली. कैलाश गणेश अजबे (३८), रा. चिचफैल, हमालपुरा) असे मयत भावाचे नाव आहे. मारेकरी सुनील माणिक अजबे (३६) रा. चिचफैल, हमालपुरा अमरावती याच्यासह त्याची आई व अन्य एका महिलेस अटक करण्यात आली. कैलाश आणि सुनिल हे दोघे नात्याने चुलत भाऊ असून त्यांची घरे एकाच परिसरात आहे. गेल्या काही दिवसांपासून या दोघांमध्ये काहीना काही कारणावरुन वाद सुरु होते. सुनील गेल्या काही महिन्यांपासून एका महिलेसोबत लिव्ह इन रिलेशनशिप'मध्ये रहात होता. सुनील व ती महिला तसेच त्याची आई असे तिघे जण एकत्र रहात होते. सुनिलचा चुलत भाऊ कैलाशचे काही वर्षापूर्वी लग्न झाले आहे. मात्र, त्याला अद्याप मूलबाळ झाले नाही. दरम्यान सुनील आणि कैलाशचा वाद झाला त्यावेळी दोघेही एकमेकांना शिवीगाळ करत होते. सुनील कैलाशला म्हणाला की, तुझे इतक्या वर्षापासून लग्न झाले तरीही तुला मूलबाळ नाही. याशिवाय इतरही काही आक्षेपार्ह शब्द सुनीलने वाद सुरु असतांना वापरले. याच कारणावरून दोघात भांडण झाले होते. दरम्यान कैलाश सुनीलच्या घरी गेला आणि तू माझी बदनामी का करतो असा त्याला जाब विचारला. याच कारणावरून त्यांच्यात पुन्हा वाद झाला. त्यावेळी कैलाशला त्याचा चुलत भाऊ सुनील, त्याची आई व ती महिला या तिघांनी मारहाण केली. या मारहाणीत महिलांपैकी एकीने त्याच्या डोक्यात बत्ता मारला. एकीने काडीने मारले. याचवेळी सुनीलने कैलाशच्या छातीत चाकूने वार केला. या घटनेत कैलाश घटनास्थळी रक्तबंबाळ अवस्थेत जमीनीवर कोसळला. त्यावेळी डोक्यात बसलेला बत्त्याचा जबर घाव आणि छातीत चाकूचा वार यामुळे कैलाश जागीच मृत्युमुखी पडला. घटनेची माहिती मिळताच राजापेठ पोलिस स्टेशनचे पोलिस निरिक्षक मनीष ठाकरे यांनी त्यांच्या पथकासह घटनास्थळी धाव घेतली. दरम्यान तिघे मारेकरी पसार झाले होते. पोलिसांनी घटनास्थळावरुन बत्ता तसेच काठी जप्त केली. मारेकऱ्यांचा शोध देखील लागलीच सुरु करण्यात आला. पोलिस निरिक्षक मनिष ठाकरे यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने काही वेळातच सुनील अजबेसह त्याची आई व त्या महिलेला शिताफीने अटक करण्यात यश मिळवले. या कारवाईत राजापेठ पोलिस स्टेशनचे पोलिस निरिक्षक मनीष ठाकरे, पोलिस निरीक्षक किशोर शेळके, पोलिस उप निरीक्षक काठेवाड, राजेश पाटील, किशोर महाजन, अतुल संभे, विजय राऊत, शेख दानिश, राहुल ढेंगेकर, अमोल खंडेझोड यांनी सहभाग घेतला.

## सालगड्याच्या पत्नीला भेटायला ...

रतन शेख, सुधीर सालुंके, महेश पवार यांना सोबत घेवून घटनास्थळाकडे धाव घेतली. महेश आनंतराव शिंदे यांच्या उसाच्या फडात भोवताली लोकांनी एकच गर्दी केली होती. पोलिसांची गाडी पाहताच लोकांनी घटनास्थळावरून काढता पाय घेतला. पोलिसांनी गर्दीला पांगवत घटनास्थळ गाठले. उसाच्या डेरेदार फडात अंदाजे ५० ते ५५ वर्षीय इसम रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. त्याच्या मानेवर, नाड्यावर धारदार शस्त्राने वार केल्याच्या खुणा दिसत होत्या. त्याचे अंगावरील सारे कपडे रक्ताने माखलेले दिसत होते. तसेच मयताचे गुप्तांग कापून त्याच्याच तोंडात ठेवून मारेकऱ्यांनी सदरील इसमाची अतिश्य क्रुर्र हत्या घडवुन आणली होती. घटनास्थळावर मतांमध्ये आणि मारेकरी यामध्ये बरीच झटापट झाल्याच्या खुणा दिसत होत्या. कारण घटनास्थळावरील उभा आसलेली ऊस काहीप्रमाएात आडवा झाला होता. या सर्व बाबीवरून या खुन प्रकरणात एकापेक्षा जास्त मारेकरी असण्याची शक्यता पोलिसांकडून वर्तविण्यात येत होती. दरम्यान घटनास्थळाला ग्रामीण उपविभागीय पोलिस अधिकारी प्रिया पाटील यांनी भेट देऊन पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना योग्य ते सूचना करून पंचनामा करण्यास सांगितले. पोलिसांनी पंचनाम्याला सुरुवात केली. सर्व प्रथम पोलिसांनी मयताच्या अंगावरील कपड्यांची झडती घेतली असता मयताची ओळख पटावी असला कुठलाच पुरावा पोलिसांच्या हाती लागला नाही. पोलिसांनी घटनास्थळाच्या आजूबाजूचा परीसर पिंजून काढला मात्र मयताची ओळख पटवी आस कुठलाच पुरावा पोलिसांच्या हाती लागला नाही. दरम्यान सावरगाव शेतशिवारात ऊस तोडणी करणाऱ्या बऱ्याच कामगारांच्या टोळ्या आल्याने त्यातील कुणीतरी असावा असा संशय व्यक्त करीत मुरूड पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक सुर्दशन ढोणे यांनी परिसरात आलेल्या सर्व उसतोडी करणाऱ्या टोळ्यांशी संपर्क करून ओळख पटविण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांच्या हाती काहीच लागले नाही. परंतु चाणक्ष साहायक पोलिस निरीक्षक साईनाथ ढोणे यांना या खुन प्रकरणातील एक महत्वाचा धागा मिळवला. मयताचा मृतदेह पाहून मारेकऱ्यांनी अतिशय निघृण हत्या घडवून आणल्याने हा खुन अनैतिक संबंधातूनच झाला असण्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांच्या वतीने वर्तविण्यात येत होता. दरम्यान मुरूड पोलिसांनी जिल्हाभरात कुणी पुरूष मिसिंग आहे का याची माहीती घेतली. तसेच सर्वच पोलिस ठाण्याला मयाचे वर्णन पाठवून दिले. मयताची ओळख पटविण्यासाठी मुरूड पोलिस धडपड करीत होते. घटनास्थळ परीसरातील आवश्यक ती माहीती हास्तगत करत पोलिसांनी पंचनामा आटोपून प्रेत उत्तरणीय तपासणीसाठी शायकीय रूग्णालयात पाठविण्याची तजबीज केली. दरम्यान औसा तालुक्यातील कवठा केज येथील एक इसम काल सकाळी सावरगाव मार्गे खंडापूर येथे आपल्या सासरवाडीला जातो म्हणून निघाला होता, पण आद्याप सासरवाडीला पोंहचला नसून त्याचा मोबाईलपण बंद आहे. आणी त्याचा मुलगा बेपत्ता इसमाचा शोध घेत सावरगावात आला अशी माहीती साहायक पोलिस निरीक्षक साईनाथ ढोणे यांना मिळाली. तात्काळ सपोनि साईनाथ ढोणे यांनी संबधीत तरूणाला बोलावून घेतले व मयताची ओळख पटविण्याचा प्रयत्न केला. मयताला पहाताच संबधीत तरूणाने टोह फोडून विलाप करण्यास सुरूवात केली. हे माझे वडील असून त्यांचे नाव भागवत रंगराव घुटे आसल्याचे सांगितले. अशाप्रकारे पोलिसांना मयताची ओळख पटविण्यात यश आले. पोलिसांनी मृतदेह उत्तरणी तपासणीसाठी शासकीय रूग्णालयात पाठविला. मयताचा मुलगा किशोर भागवत घुटे यांच्या फिर्यादीवरून मुरुड पोलीस ठाणे हद्दीत गुन्हा रजिस्टर नंबर ७९ /२०२१ कलम ३०२ २०१ ३४ भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच त्याचे वडील भागवत रंगराव घुटे यांचे गावातील एका महीलेसोबत अनैतिक संबध होते. त्यातुनच महीलेच्या पोरांनी व नातेवाईकांनी भागवत घुटे यांचा खून केला आसल्याचा संशय व्यक्त केला. जिल्हा पोलीस अधीक्षक निखील पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, ग्रामीण उपविभागीय पोलिस अधिकारी प्रिया पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाचे सर्व सूत्रे मुरुड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सुदर्शन ढोणे यांच्या हाती देण्यात आले. तपासाची चक्रे गतिमान करत साहायक पोलीस निरीक्षक साईनाथ ढोणे यांनी या खून प्रकरणातील मयताच्या पूर्व चारित्र्याची माहिती घेण्यास सुरुवात केली. सर्वप्रथम पोलिसांनी मयत राहत असलेल्या कवठा केज गाठले. मयत भागवत घुटे यांच्या नातेवाईकांशी संपर्क करून अधिक माहिती जाणून घेतली. तेंव्हा ३० वर्षांपूर्वी भागवत रंगराव घुटे यांचा विवाह लातूर तालुक्यातील खंडापूर येथील एका नामवंम कुटूंबातील मुलीशी झाला होता. लग्नानंतर भागवत रंगराव घुटे यांचा संसार अगदी सुखात चालला होता. त्यांना दोन मुली आणि दोन मुले असे अपत्य झाले होते. वडीलोपार्जीत शेती व्यवसाय करून भागवत घुटे आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत होते. त्यांच्या कामात त्यांची पत्नीही तितकीच मदत करीत होती. मयत भागवत घुटे हा चंचल स्वभावाचा होता. तसेच ते एकमुडी होते. घरी पारंपरागत शेती व्यवसाय असल्याने भागवत घुटे यांना शेतीविषयी बरेच ज्ञान होते. ते नेहमी फायदेशिर शेती व्यवसाय करीत होते. त्यामुळे मयत भागवत घुटे यांची आर्थीक परस्थिती चांगलीच होती. दरम्यान १८ ते २० वर्षांपूर्वी मयत भागवत घुटे यांनी आपल्या शेतात गावातीलच दादाराव हिंगे नामक व्यक्तीला सालगडी म्हणून कामाला ठेवला होता. तेंव्हा भागवत घुटे ऐन तारूण्यात होता. शेतवस्ती करून आपल्या लहान लेकरांसह राहणाऱ्या सालगड्याच्या बायकोवर भागवतची नजर पडली. त्यातूनच भागवत घुटे यांने सालगड्याच्या बायकोशी जवळीता साधुन लगट करण्यास सुरूवात केली. भागवत घुटे याचे सागड्याच्या बायकोसोबत बेधाकपणे अनैक्तिक संबध सुरू झाले. याचा संशय येवून बऱ्याचदा भागवत घुटे कुटूंबात वाद झाले. लेकर मोठी झालेत अस वागू नका अस बऱ्याचदा भागवत घुटे याच्या बायकोने दोघांनाही सांगितले मात्र कोणी ऐकण्यास तयार नव्हते. दोन्ही कुटूबातील लेकरांचे लग्न झालेतरी सुना,नातवंडे झाली तरी या दोघांचा प्रतिचा खेळ सुरूच होता. दरम्यान गेल्या तिन वर्षापुर्वी दादाराव हिंगे नामक सालगड्याचा मृत्यू झाला. त्यामुळे हिंगे कुटूंब कवठा गाव सोडून आपआपल्या लेकराबाळंना व आईला सोबत घेवून उदगीर येथे एका शेतात सालगडी म्हणून काम करत होते. दरम्यान तेथेही भागवत घुटे आधून-मघून जात आसे. तसेचे मोबाईलवर संर्पक करत आसत. दरम्यान १६ मार्च २०२१ रोजी भागवत घुटे दूपारी आपल्या सासरवाडीला (खंडापूर ता.जि.लातूर) जात आसल्याचे सांगून मोटारसायकली वरून खंडापूर या गावी निघाला होता. मात्र रात्री उशीरापर्यांत सासरवाडीत पोहंचला नसल्याचा फोन किशोर घुटेला त्याच्या आईने केला होता. कारण किशोर घुटेची आई ही काही दिवसापुर्वी आपल्या भावाकडे खंडापूरला गेली होती.अशी खात्रीलायक माहीती पोलिसांनी हास्तगत केली. पोलिसांनी मयताचा मुलगा किशोर घुटे यांने सांगितलेल्या संशयीतांच्या हालचालीवर पोलिसांनी बरीक नजर ठेवली होती. खुन प्रकरण झाल्यापासून सावरगावातील सतिष कांबळे आणी त्याचा अल्पवयीन मुलगा गावात नसल्याची गुप्त माहीती सपोनि साईनाथ ढोणे यांना मिळाली होती. मुरूड पोलिसांचे पथक संशयीत आरोपीच्या मागावर आसतानाच या खून प्रकरणातील संशयीत आरोपी हे सावरगावातून पळून जाण्याच्या बेतात आसल्याची खात्रीलायक खबर सपोनि साईनाथ ढोणे यांना मिळाली. यावरून सपोनि साईनाथ ढोणे यांनी या प्रकरणातील संशयीत आरोपींना ताब्यात घेण्यासाठी आपल्या पोलिस पथकाला योग्य त्यासुचना करून सावरगाव शिवारातील एका शेतात लपून बसलेले संशयीत आरोपी सतीष केरबा कांबळे (रा. सावरगाव ता.जि.लातूर), कैलास दादाराव हिंगे (रा. कवठा ता.औसा जि.लातूर)यांना अटककेली. विधीसंघर्षग्रस्त बालक नामे पवन सतीष कांबळे (रा. सावरगाव ता.जि. लातूर) यास ताब्यात घेवून अधिक विचापूस केली. सुरूवातील सतिष कांबळे आणी कैलास हिंगे यांनी पोलिसांना असमाधानकारक उत्तरे दिली. त्यानंतर तिघांनाही वश्वासात घेवून अधिक विचारपूस केली आसता त्यांनी आपल्या गुन्ह्याची कबूली दिली. दरम्यान भागवत घुटेमुळेच आपल्या घराचे वाटोळे झाले याचा राग माझे भाच्चे विकास दादाराव हिंगे व कैलास हिंगे यांना येत होते. समजावून सांगूनही भागवत घुटे आपल्या आईचा पिछा सोडत नसल्याचा राग त्याच्या मनात धगधगत होता. सुना- नातवंडे घरात आसुनही भागवत घुटे सारख आईला मोबाईलवर बोलतो. आईची इच्छा नसतानाही भागवत घुटे बोलण्याचा आग्रह धरतो. भागवतमुळे घराची बदनामी झाली त्याचा कायमचा काटा कढणार आसल्याची भावना आपल्याकडे माझे भाच्चे कैलास आणी विकासनी बोलन दाखवली होती. तसेच मलापण सोबत राहण्याची विनवणी केली आसल्याची जबानी सतिष कांबळे यांनी दिली. तसेच अन्य आरोपी विकास दादाराव हिंग यांने भागवत घुटे यांच्यावर चाकूने वार केले असल्याची त्यांने माहीती दिली. आरोपीकडून मयताची मोटार सायकल जप्त करण्यात आली आहे. तसेच मयताचे आयकार्ड, रक्तानी माखलेले कपडे पालिसांनी जप्त केली असून याखून प्रकरणातील फरार आरोपी नामे विकास दादाराव हिंगे याचे शोधकामी दोन पथके तयार करण्यात आली आहेत. विकास दादाराव हिंगे यांच्या अटकेनंतरच हे खून प्रकरण करण्यासाठी नेमका कट कसा रचला याचा उलगडा होणार आहे. सदरची कामगीरी पोलीस अधिक्षक, मा. निखील पिंगळे साहेब, अप्पर पोलिस अधिक्षक हिम्मत जाधव साहेब व उप विभागीय पोलिस अधिकारी प्रिया पाटील मॅडम यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि ढोणे, पोउपनि सुर्वे, पोना. बहादूरअली सय्यद, रतन शेख, सुधीर सालुंके, महेश पवार यांनी केली असून तपासात १२ तासाचे आत गुन्हा उघडकीस आणून आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

## जमिनीच्या वादात सख्खे भाऊच ...

त्याच्यापासून वेगळे राहत असल्याने त्याचा व्यवहार ते स्वत:च बघत असतात. मनोज आणि नितीन हे दोघे ही सुशिक्षीत आहेत. मनोज याने बी ए पर्यत शिक्षण घेतले आहे.तर नितीन याने एम. ए. पर्यत शिक्षण घेतले आहे. दोघेही सुशिक्षित असले तरी ते कुठे ही नोकरी करीत नव्हते. त्यांना नोकरी मिळाली नसल्याने ते दोघे ही आपआपल्या वाटणीला आलेल्या शेतजमीनीतील उत्पन्नावरच आपला उदर निर्वाह करीत होते. त्यातच नितीन याला दारू पिण्याचे व्यसन असल्याने तो सारखा दारू पिऊन येऊन मला शेताची वाटणी कमी मिळाली आहे म्हणून मोठा भाऊ मनोजबरोबर आणि वडिल वसंत इंगवले याच्याबरोबर भांडण काढत होता. त्याच्या दररोजच्या भांडणाला ते दोघे ही वैतागलेले होते.नितीन याला कायम वाटायचे की आपल्याला शेतातील वाटणी ही कमी मिळालेली आहे. म्हणून तो दारू पिऊन आला की भांडण काढत होता.तर कधी वडिलांना मारायला जात होता.तर कधी मोठा भाऊ मनोज यालाही मारायला जात होता. नितीनच्या दारू पिण्याच्या सवयीला वैतागून त्याची बायको ही माहेरी निघून गेली होती.त्यामुळे तो जास्तच आपल्या घरच्या लोकावर चिडत होता. तो आपल्या वडिलांना परत आपल्या शेताची वाटणी कागदोपत्री करून दया म्हणून सांगत होता. वसंत इंगवले हे हयात असल्याने त्याच्या नावेच ती ३ एकर शेत जमीन होती. त्यामुळे मनोजचे किंवा नितीन याचे नाव कागदोपत्री लागलेले नव्हते. नितीन याला कागदोपत्री ती शेतजमीन पाहिजे होती. पण त्याचे वडिल हे कागदोपत्री शेतजमीनीची वाटणी करायला तयार नव्हते. मिरज तालुका हा दुष्काळ ग्रस्त तालुका म्हणून ओळखला जात असला तरी म्हैशाळ ताकारी पाणी योजनेने या भागातील काही शेती ही ओलीताखाली आलेली आहे. त्यामुळे येथील शेतकरी खरीप पिकाबरोबरच द्राक्षांचे पीक ही घेत असतात.या भागात द्राक्ष बागायतदार आणि पानमळे जास्त असल्याने शेतकऱ्याच्या हातात चार पैसे जास्तच खेळू लागले आहेत.वसंत इंगवले यांनी ही शेतावर गावातील एका सोसायटीतून ७५ हजार रूपयांचे कर्ज काढून मनोज याला दिले होते. त्याने या रक्कमेतून मनोज आपल्याला आलेल्या दीड एकर शेतात द्राक्षांची बाग केली होती. याचा राग नितीन याला आला होता. त्याला ही शेतीवर कर्ज काढायचे होते.परंतू एक कर्ज असताना दुसरे कर्ज मिळत नाही अशी अडचण येत होती.त्यामुळे नितीनला कर्ज मिळत नव्हते. त्यामुळे ही तो वडिल वसंत आणि भाऊ मनोज याच्यावर चिडत होता. त्याचेबरोबर भांडण काढीत होता.त्यांची भांडणे ही करोली ग्रामस्थांनी क्रित्येक वेळा मिटवलेली होती. तरी ही त्याचा वाद हा मिटत नव्हता. नितीन हा काही केल्या ऐकत नव्हता. त्याला ही त्या शेतीवर कर्ज पाहिजे होते. तो त्यासाठी त्या दोघांच्या मागे लागला होता.पण अगोदरच सोसायटीचे ७५ हजार रूपयांचे कर्ज असल्याने ते भागविल्या शिवाय दुसरे कर्ज ही मिळणार नव्हते. त्यातच त्याच्या मनात मुद्दामच आपल्या वडिलांनी आपल्या विरोधात मनोज याला कर्ज काढून द्राक्ष बाग करायला लावली आहे असा समज निर्माण झालेला होता. दि.१६ मार्च रोजी सकाळी मनोज याच्या द्राक्ष बागेत द्राक्षे छाटणीसाठी काही मजूर आले होते.त्यांना बघून नितीन हा अधिकच चवताळला होता. तो मजुरांना मनोजला आणि आपल्या वडिलांना दारू पिऊन येवून शिवीगाळ करून मारहाण करण्याची धमकी देत होता. याचा राग मनोजला देखील आला होता.तो याचा जाब नितीन याला विचारायला गेला असता त्या दोघांत त्यावेळी मोठी भांडणे झाली होती. ही भांडणे त्या मजुरांनी आणि त्याच्या वडिलांनी मिटवली होती. त्यावेळी नितीन याने फुल्ला दारू पिलेली होती. त्या दारूच्या नशेत तो मनोजला आणि मजुरांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करीत होता. त्यावेळी ती भांडणे तात्पुरती मिटली होती. दुपारी झालेल्या भांडणाचा राग अजून नितीनच्या मनात होता. तो कुठला तरी राग कुठे काढत होता. संध्याकाळी परत तो गावातून दारू पिऊन आला होता.दारू पिऊन येताना त्याने आपल्या हातात एक पार घेऊनच आला. त्याच्या मनात आता वेगळाच विचार चालू होता. त्याला आता सरळ मार्गाने हा न्याय मिटवयाचा नव्हता. वडिल किंवा भाऊ या दोघापैकी कुणाला तरी अद्दल घडवली तरच यातून मार्ग निघेल याचा विचार तो करीत होता.म्हणून तो फुल्ल दारू पिऊन आला तो दारूच्या नशेत मनोज याच्या दरवाज्यासमोर उभा राहून त्याला शिव्या देत तुला आता मारूनच टाकतो अशी धमकी देत होता. मनोज हा त्याचा मोठा भाऊ होता. परंतू शेतजमीनीच्या वाटणीत त्याला शेती जास्त गेल्याचा दावा तो करीत होता.आणि आई वडिल ही त्याच्याच बाजूने बोलत असतात याचा ही राग त्याला आलेला होता.दारूच्या नशेत तो आपली बायको आपल्याला सोडून माहेरी गेल्याचा टपका मनोजवर आणि आई वडिलावर ठेवित होता. नितीन हा शिव्या देत असताना मनोज ही घरातून आपल्या हातात चाकू घेऊनच आला होता. भांडण हे विकोपाला गेले होते मनोज ही त्याला तुलाही मारूनच टाकतो आणि तुझी दररोजची कटकट मिटवतो असे म्हणत त्याच्या अगांवर धावून गेला. तो नितीनवर चाकूने वार करण्याचा प्रयत्न करीत असताना, नितीन याने तो वार चुकवून मनोजच्याच डोक्यात त्याने आपल्याकडील लोंखडी पारीने हल्ला चढविला. त्याने त्या पारीने दोन तीन घाव त्याच्या डोक्यात घातले त्यासरशी मनोज मोठयाने ओरडत जमीनीवर खाली कोसळला. त्याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव झालेला होता.मनोज मोठयाने ओरडल्याने मनोजच्या घरातील त्याची बायको व मुले आणि मनोजचे आई वडिल ही बाहेर आले होते. त्याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला होता. दुपारचे भांडण हे कुठल्या कुठे तरी गेले होते. या घटनेनतंर घटनास्थळावरून नितीन हा गावात गेला होता. तो परत दारूच्या दुकानात गेला होता. सख्या भावाने भावाचा खून केल्याची बातमी एव्हान करोली गावात पसरली होती. जो तो घटनास्थळी येत होता. घटनास्थळी ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. या घटनेची माहिती मिरज ग्रामीण पोलीसांना देण्यात आली होती. घटनास्थळी मिरज ग्रामीणचे पो. निरी.मिलींद पाटील यांना समजातच ते ही घटनास्थळी आपल्या पोलीस ताफ्यासह दाखल झाले होते. त्यांनी घटनेचा रितसर पंचनामा करून मृतदेह उतरीय तपासणीसाठी मिरज सिव्हिल हॉस्पिटल येथे पाठवून दिला. घटनास्थळी मिरजचे डीवायएसपी अशोक विरकर यांनी भेट देऊन पाहणी केली होती. त्यांनी तपासाच्या योग्य त्या सुचना पोलीसांना केल्या होत्या. या घटनेची माहिती पोलीसांनी मयत मनोज याच्या पत्नीकडून आणि वसंत इंगवले याच्याकडून घेतले होते. ही घटना कोणत्या कारणातून आणि कुणी केली याची माहिती पोलीसांना मिळाली होती. शवविच्छेदनानंतर पोलीसांनी मनोज याचा मृतदेह त्याच्या वडिलाच्या ताब्यात अंतीम संस्कारासाठी दिला. घटनास्थळावरून संशयीत आरापी नितीन इंगवले हा पळून गेला होता. पोलीस त्याचा शोध घेत असताना काही वेळातच तो पोलीसांना गावात सापडला होता. पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याला मिरज ग्रामीण पोलीस स्टेशनला आणले होते. त्याच्याकडे या घटनेची पोलीस चौकशी करीत असताना त्याने आपला गुन्हा पोलीसासमोर कबुल केला होता. मयत मनोज पत्नीने या घटनेची रितसर फिर्याद पोलीसात दाखल केली होती. तिच्या फिर्यादीवरून पोलीसांनी मनोज वसंत इंगवले (वय ४२) यांच्या खून पक्ररणी त्याचा लहान भाऊ नितीन वसंत इंगवले (वय ४०) याच्या विरोधात मिरज ग्रामीण पोलीस ठाण्यात गु.रजि.नं.१०९/२०२१ भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता. मा.कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेली पार जप्त केली होती. पोलीस अधिक्षक दीक्षीत गेडाम, उपविभागीय अधिकारी अशोक विरकर यांच्या मार्गदर्शनाखाली धनजंय विटेकरी, हे या घटनेचा पुढील तपास करीत आहेत. त्यांना पो.ना.बंडू पवार, राजेंद्र बाबर सुरज सदाळ हे मदत करीत आहेत. व्यसनी माणूस हा दारूच्या नशेत कोणते पाऊल उचलेले आणि त्याच्या हातून कोणती अघटित घटना घडेल हे काही सांगता येत नाही. हेच यातून दिसून येते.

29 MARCH TO 04 APRIL 2021 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 27/03/2021 9:23 PM Page 1



## थोडक्यात वृत्तांत

### पालकमंत्री शेत पानंद रस्ता योजनेतून जळकोट, उदगीर तालुक्यासाठी ५ कोटी

लातूर : ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतमालाची वाहतुक करण्याकरीता तसेच दळणवळणाची साधने सोयीचे व्हावे यासाठी राज्य शासनाने सुरू केलेल्या पालकमंत्री शेत पाणंद रस्ता योजनेतून लातूर जिल्ह्यातील उदगीर व जळकोट या तालुक्यांना ५ कोटी निधी मंजूर करण्यात आला असून लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरूवात केली असल्याची माहिती राज्याचे पर्यावरण, पाणीपुरवठा व स्वच्छता, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), रोजगार हमी, भूकंप पुनर्वसन व संसदीय कार्य राज्यमंत्री संजय बनसोडे यांनी दिली. पालकमंत्री पानंद रस्ते योजना अंतर्गत लातूर जिल्ह्यातील उदगीर तालुक्या करिता ४ कोटी तर जळकोट तालुका करिता १ कोटी रुपये निधी उपलब्ध करण्यात आला आहे. यातून शेतकऱ्यांना शेतापर्यंत शेतीमालाची वाहतूक करणे सोयीचे होणार आहे. या पालकमंत्री पानंद शेतरस्ता योजनेमुळे उदगीर व जळकोट तालुक्यातील जवळपास ५० ते ६० गावांना याचा फायदा होणार आहे असे राज्याचे राज्यमंत्री संजय बनसोडे यांनी सांगितले.

### संतोष बिराजदार यांना एमडीआरटी अमेरिका २०२२ पुरस्कार प्राप्त!

लातूर : लातूर भारतीय जीवन विमा क्षेत्रात अतिशय सन्मानचा मानला जाणारा जागतिक दर्जाचा एम.डी.आर.टी. अमेरिका – हा पुरस्कार आघाडीचे विमा प्रतिनिधी संतोष वैजनाथ बिराजदार यांना नुकताच प्राप्त झाला त्याबद्दल शाखाधिकारी महादेव पेंदे, उपशाखाधिकारी नितीन कुरुंदकर विकासधिकारी वसंतराव काजळेकर आदीनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या कोरोना सारख्या वैश्विक महामारीमुळे सर्व व्यवसाय थांबले असताना अतिशय कठीण परिस्थितीत सुद्धा विमा ग्राहकास अध्यावत दर्जेवर अखंडित विमा सेवा घरपोच देऊन विमा ग्राहकाची योग्य गुंतवणूकीचे नियोजन करून देत भारतीय जीवन विमा निगम क्षेत्रात अतिशय सन्मानाचा मानला जाणारा जागतिक पातळीवरील बहुमान आघाडीचे विमा प्रतिनिधी संतोष बिराजदार यांनी या अगोदर हा सतत ११ वेळा एम.डी.आर.टी. दोन वेळा सि.ओ.टी. एका वर्षांमध्ये तीनवेळा एम.डी.आर.टी. व एल.आय.सी मधील सर्वोच्च क्लब मेंबर शिप कॉर्पोरेट क्लब सदस्य यांना प्राप्त झालेले असून या यशाचे सर्व श्रेय माझे विमा ग्राहकास जात असल्याचे मत संतोष बिराजदार यांनी यावेळी व्यक्त केले. पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल शाखाधिकारी महादेव पेंदे उपशाखाधिकारी नितीन कुरुंदकर, विकासधिकारी वसंतराव काजळेकर ए.बी.नाईक त्याच्यासह अधिकारी, कर्मचारी, विमा प्रतिनिधी व मित्रपरिवाराच्या वतीने अमोल जाणते, सतीश पवार, महादेव पांडे, काशिनाथ वाघमारे, वशिष्ट चौरे, नागनाथ आगवणे, राम पवार, लामतुरे संतोष आदींनी अभिनंदन केले.

### मातंग एकता आदोलंन संघटनेच्या लातूर जिल्हा अध्यक्षपदी योगेश शिंदे

लातूर : योगेश शिवाजी शिंदे यांची लातूर जिल्हाअध्यक्ष पदी मा.रमेशदादा बावगे माजी गृहमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने निवड करण्यात आली आहे.याच्या अध्यक्षतेखाली ही सघटना लातूर जिल्ह्यात वाढविण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. पुढील कार्यकारणी योगेश शिंदे हे करणार असून ज्यांना कोणाला सघटनेत प्रवेश सामील करून घेण्याचे प्रयत्न ते करणार असल्याचे योगेश शिंदे यांनी यावेळी सांगितले आहे.तसेच त्यांच्या निवडीबद्दल त्यांना अनेकांनी शुभेच्छा दिल्या.तसेच त्यांनी या पदाचा वापर समाजसेवेसाठी करावा व संघटना बळकट करावी असे आव्हानही मातग एकता आदोलंन या सघटनेच्या संस्थापक अध्यक्ष रमेशदादा बागवे यांनी केले.

### पत्रकाराच्या घरातील चार व्यक्तीचे चार दिवसात मृत्यू

जळगाव : जळगाव जिल्हयाच्या रावेर तालुक्यातील सावधा येथील सामनाचे प्रतिनिधी कैलाशसिंह परदेशी यांचा कोविडनं आज बळी घेतला आहे. परंतू त्यांच्या कुटुंबातले कोरोनाचे ते पहिलेच शिकार नाहीत. दोन दिवस अगोदर त्यांचे बंधू किशोरसिंह परदेशी आणि त्यांच्या पत्नी संगीता परदेशी याचंही निधन झालं .घरातील दोन मुलं आणि सून यांचा आकस्मित मृत्यू झाल्यानं त्यांच्या ८५ वर्षाच्या मातोश्रींवर पहाडच कोसळला. हा धक्का त्या पचवू शकल्या नाहीत. तिघांच्या मृत्यूच्या धक्क्यानं त्याचंही निधन झालं. चार दिवसात एकाच कुटुंबातले चार मृत्यू झाल्यानं साऱ्या जळगाव जिल्हयाला धक्का बसला आहे. जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी दिलेल्या माहितीन्वये तिघांना कोविडची लागण झाल्यानंतर त्यांनी तीन दिवस घरगुती उपाय केले. म्हणजे त्यांनी रूग्णालायात जायला विलंब केला. त्यामुळे आजार वाढत गेला आणि त्यात त्यांचे निधन झाले सामनाचे कार्यकारी संपादक संजय राऊत यांनी परदेशी यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले असून १९९० पासून परदेशी सामनाचे पत्रकार होते, अत्यंत प्रामाणिक आणि कठोर परिश्रम करणारे पत्रकार म्हणून ते सर्वपरिचित होतेअशा भावना त्यानी व्यक्त केल्या आहेत. मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम,देशमुख यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केले असून राज्यातील सर्वच पत्रकारांनी काळजी घ्यावी असे आवाहन केले आहे.परदेशी कुटुबाला सरकारनं आर्थिक मदत द्यावी अशी मागणीही एस.एम.देशमुख यांनी केली आहे. एकाच कुटुंबातील चार व्यक्ती चार दिवसात मृत्युमुखी पडल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होते आहे.

# पालकमंत्री अमित देशमुखांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबारात २५५३ जणांनी केले रक्तदान!




**लातूर/प्रतिनिधी**

राज्याचे वैदयकीय शिक्षण मंत्री तथा लातूरचे पालकमंत्री ना. अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त लातूर जिल्ह्यातील १० तालुक्यात रक्तदान शिबीर घेण्यात आले, यासाठी जिल्ह्यातील काँग्रेस पदाधिकारी कार्यकर्ते याना २१०० बँग रक्तदान व्हावे असे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवले होते. मात्र लोकनेते विलासराव देशमुख, सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या विकासभिमुख कार्य पद्धतीने जोडलेल्या काँग्रेस पदाधिकारी कार्यकर्ते यांनी उस्फूर्तपणे तब्बल २५५३ जणांनी रक्तदान करून पालकमंत्री ना. अमित विलासराव देशमुख यांच्यावर विश्वास व्यक्त करून विकासात्मक कार्यकरणाऱ्या नेत्यासोबत आम्हीं लातूरकर आहोत असा संदेश रक्तदान करून रक्तदात्यानी दिला आहे. उद्दिष्ट २१०० होते मात्र लोकनेत्यावर प्रेम विश्र्वास व्यक्त करून तब्बल २५५३ जणांनी उस्फूर्तपणे रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली आहे, यामुळे रक्तदान करणारा लातूर पॅटर्न निर्माण केला आहे. लातूर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष श्रीशैल्य उटगे यांच्या माध्यमातून ही संकल्पना जिल्हाभरात राबवली गेली गेली. गेल्या दहा दिवसापासून जिल्हाभरात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष, विवीध सेलचे जिल्हाध्यक्ष, तालुका अध्यक्ष, पदाधिकारी स्थानीक पातळीवरील कार्यकर्ते यांनी बैठका घेऊन रक्तदानाचे महत्व सांगीतले. सध्या कोवीड१९ ची सूरू असलेली साथ रक्ताचा तुटवडा जाणवू नये यासाठी मोठ्या प्रमाणात तयारी केली होती. त्याला जिल्यातील काँग्रेस पक्षाच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, लोकनेते विलासराव देशमुख साहेब, माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या चळवळीतील कार्यकर्ते विवीध संस्थांचे पदाधिकारी यांनी खूप सहकार्य केले आहे त्यामूळे उद्दिष्ट २१०० ठेवले होते मात्र पालकमंत्री अमित देशमुख यांच्यावर विश्र्वास व्यक्त करीत तब्बल उद्दीष्टापेक्षा ५५३ जास्त म्हणजे २५५३ जणांनी उस्फूर्तपणे रक्तदान केले आहे, अशी माहिती लातूर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष श्रीशैल्य उटगे यांनी दिली आहे. जिल्यातील तालुका व्हाईज रक्तदान खालील प्रमाणे झाले असून औसा तालुका ५१०, औसा शहर २२१, लामजना ५१, बेलकुंड १५१, हसेगाव ३६, मदणसुरी ५१, यांचा समावेश आहे. चाकुर तालुक्यात ४७० त्यात चाकुर शहर १५६, नळेगाव १११, चापोली ६५, वडवळ ५५, रोहीना ४३, जाणवळ ४० रक्तदात्याचा समावेश आहे.

उदगीर तालुक्यात ३०९ जणांनी रक्तदान केले असून त्यात उदगीर शहर १२२, हळी ११३, हेर ७४, तर रेणापूर तालुका २९६ जणांनी उस्फूर्तपणे रक्तदान केले आहे त्यात रेणापूर शहर ५३, पोहरेगाव ६६, पानगाव ५५, खरोळा ४१, लखमापूर ६१, बिटरगाव २०, निलंगा तालुका २५१ रक्तदानात सहभाग नोंदवला असून त्यात निलंगा शहर ५२, आंबुलगा ५०, औराद ४७, राठोडा १०२, लातूर तालुक्यात २२१ जणांनी रक्तदान केले त्यात गंगापूर ५६, तांदुळजा ३४, बाभळगाव ३३, मुरुड २५, आर्वी २५, भातांगली२१, जवळा (बु) २१, निवळी ६, देवणी तालुक्यात १९१ जणांनी रक्तदान केले आहे त्यात देवणी शहर १०४ तर वलांडी ८७, शिरूर अनंतपाळ तालुक्यांत ११९ जणांनी रक्तदान केले त्यात साकोळ ५१, बोळे गाव ३१, उजेड २२, शीवपुर १५, अहमदपूर तालुक्यात ११६ जणांनी उस्फूर्तपणे रक्तदान केले त्यात अहमदपूर शहरात ९८, तर येलादेवी उमरगा येथे १८, तर जळकोट मध्ये ७० जणांनी उस्फूर्तपणे रक्तदान करून तब्बल एकूण जील्यात २५५३ असे विक्रमी रक्तदान केले आहे पालकमंत्री अमित देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान करून जिल्ह्यांत नेत्यावर लातूरकरांनी मोठा विश्वास प्रेम व्यक्त केले आहे.

रक्तदान शिबिर घेण्यासाठी माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख, आमदार धीरज विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्यातील सर्वच काँग्रेस विवीध फ्रंटचे अध्यक्ष, तालुका अध्यक्ष, शहर अध्यक्ष, पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी खूप मेहनत घेतली. त्यामूळे उद्दिष्ट पेक्षा जास्त रक्तदान झाले आहे. त्यांचे सर्वांचे आभार व्यक्त करीत आहेत, अशी माहिती जिल्हा काँग्रेस अध्यक्ष श्रीशैल्य उटगे यांनी बोलताना दिली आहे.

## सफाई कामगारांच्या पाल्यांना वारसा हक्क नियमानुसार शासकीय सेवेत सामावुन घ्यावे -अमित देशमुख



**मुंबई/प्रतिनिधी**

जे.जे. समूह रुग्णालयातील ज्या सफाई कामगारांच्या पाल्यांना वारसा हक्काने शासकीय सेवेत नियमानुसार सामावून घेण्याची प्रक्रिया प्रलंबित आहे. अशा कर्मचाऱ्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने वारसा हक्काअंतर्गत शासकीय सेवेत सामावुन घेण्याच्या प्रक्रियेस गती देऊन प्रक्रिया तात्काळ पुर्ण करण्याचे निर्देश वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांनी दिले.

मंत्रालयात जे.जे. रूग्णालय आणि सेंट जॉर्ज रूग्णालयातील सफाई कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात मंत्री अमित देशमुख यांनी शासन सकारात्मक असल्याचे सांगितले. या बैठकीस वैद्यकिय शिक्षण विभागाचे सचिव सौरभ विजय, वैद्यकीय शिक्षण संचालक डॉ.तात्याराव लहाने, जे.जे. रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. माणकेश्वर, अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेस युनियनचे गोविंदभाई परमार आदिसह सफाई कामगार संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख म्हणाले, २०१४, २०१७ आणि २०२१ नुसार ज्या सफाई कामगारांना अद्याप वारसा हक्कानुसार शासकीय सेवेत सामावून घेतले नाही. अशा कामगारांना नियमानुसार कायमस्वरूपी सामावून घेण्यासाठीच्या प्रक्रियेस गती द्यावी तसेच चतुर्थ श्रेणी पदासाठी भरण्यात येणाऱ्या जागा या बाह्यकृत सेवेद्वारे भरण्यात येतील. मात्र, जे कामगार पिढ्यादर पिढ्या सफाई कामगारांचे काम करीत आहेत, त्यांना या भरतीमध्ये प्रथम प्राधान्य देण्यात यावे, अशा सूचनाही मंत्री श्री. देशमुख यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. चतुर्थ श्रेणी कामगारांना घरे उपलब्ध करून देण्याबाबत त्यांच्या अन्य समस्या सोडविण्यासंदर्भातही शासन सकारात्मक असल्याचे अमित देशमुख यांनी यावेळी उपस्थित सफाई कर्मचाऱ्यांना आश्वासित केले.

## लातूर पोलिस अधिक्षक कार्यालयात वृक्षारोपण





**लातूर/प्रतिनिधी**

नांदेड परीक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक निसारजी तांबोळी यांच्या हस्ते पोलीस अधीक्षक कार्यालय लातूर येथे वृक्षारोपण करण्यात आले. ग्रीन लातूर वृक्ष टीमच्या माध्यमातून पोलीस अधीक्षक कार्यालयात १५२६ शोभिवंत झाडे लावण्यात आली आहेत. गुलाब, लिली, टीकोमा, मोगरा, चाफा, कनेरी, टरमेनेलिया या शोभिवंत व फुलांच्या झाडांचे रोपण करण्यात आले.या सर्व झाडांची पाहणी करून नांदेड परीक्षेत्राचे आयजी निसारजी तांबोळी यांनी ग्रीन लातूर वृक्ष टीमच्या कार्याचे कौतूक करून शुभेच्छा दिल्या. झाडांचे संगोपन करा, झाडे जगवा असे आवाहनही यावेळी निसार तांबोळी यांनी केले. लातूर परिसरात हरित आच्छादन वाढविणे गरजेचे आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक निखीलजी पिंगळे, पोलीस उपअधीक्षक हिम्मत जाधव, पोलिस उपअधीक्षक प्रिया पाटील, पोलिस निरीक्षक गजानन भातलोंढे, ग्रीन लातूर वृक्ष टीमचे डॉ. पवन लड्डा, मनपा नगरसेवक इम्रान सय्यद, ॲड वैशाली लोंढे-यादव, ऋषिकेश दरेकर, मनमोहन डागा, विजयकुमार कठारे, शिवशंकर सुफलकर, मोईझ मिर्झा, प्रिया नाईक, महेश गेलडा, शुभम आवाड हे उपस्थित होते.

## जैन इरिगेशनचे आनंद पाटील यांना राज्यस्तरीय स्पर्धेत नामांकन

**जळगाव/प्रतिनिधी**





येथील जैन इरिगेशनचे चित्रकार आनंद पाटील यांच्या चित्राचे राज्यस्तरीय कॅमलिन आर्ट फाऊंडेशनच्या चित्रकला प्रदर्शनात निवड झाली आहे. कला स्पर्धामध्ये कॅमलिन आर्ट फाऊंडेशनचे नाव जगात नावाजलेले आहे. दर वर्षी आयोजित होणाऱ्या या स्पर्धेत हजारों स्पर्धक भाग घेत असतात. चार पुरस्कार व्यावसायिक चित्रकार तर बारा चित्र विद्यार्थी विभागात राष्ट्रीय पुरस्कार दिली जाताता. पोर्ट्रेट, लँडस्केप, स्टील-लाईफ व क्रिएटिव्ह पेंटिंग अशा प्रकारात प्रवेशिका मागविण्यात येते. सदरील स्पर्धेत जळगावचे चित्रकार आनंद पाटील याचे पोर्ट्रेट (व्यक्ती) चित्र या प्रकारातील बाबा ह्या चित्राची निवड झाली आहे. हे जल रंगातील असुन त्याचा आकार हा १५÷९ इंच एवढे आहे. यापूर्वी मुंबई येथील जे जे. अपलाइड आर्ट कॉलेजमध्ये पदवीच्या शेवटच्या वर्षाला असताना वर्ष २००३ मध्ये वार्षिक प्रदर्शनात देखील कॅमलिन आर्ट बेस्टचा कलर्स एन्ट्री पुरस्कार ही आनंद पाटील यांना प्राप्त झाला होता. तसेच कला क्षेत्रातील अनेक पुरस्कारही त्यांना मिळाले आहेत. आजवर पाटील यांची पाच एकल प्रदर्शन संपन्न झाली आहेत आणि आठ गृप शो तसेच दोन कला मेळाव्यात सहभाग नोंदविला आहे.

आनंद पाटील यांची दोन चित्रे ही कॅनडा, सहा चित्रे मुंबई, सात चित्रे भुसावळ तर साठपेक्षा अधिक चित्र जळगाव मध्ये संग्रहीत आहे. निसर्गचित्रांसोबत व्यक्तिचित्रांची त्यांना (पोर्ट्रेट) आवड आहेत. कॅमलिन आर्ट फाऊंडेशनच्या कला प्रदर्शनात चित्राची निवड होणे ही फार कौतुकास्पद आहे. जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन, सहव्यवस्थापकीय संचालक अजीत जैन यांनी अभिनंदन केले तसेच कलाक्षेत्रातील मान्यवर, कलारसिक आणि मित्रमंडळींकडूनही आनंद पाटील यांचे अभिनंदन होत आहे.

## एससीआरटी विविध उपक्रम स्पर्धेत वाड्यातील तीन विद्यार्थी विजेते!

**वाडा/प्रतिनिधी**



महाराष्ट्र स्टेट कौन्सिल ऑफ एज्युकेशन अँड ट्रेनिंग पुणे यांच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या विविध उपक्रम स्पर्धेत वाड्यातील जिल्हा परिषद शाळेतील सेमी इंग्रजी माध्यमाच्या तीन विद्यार्थ्यांनी प्राविण्य मिळवले आहे. बालदिनानिमित्त नोव्हेंबरमध्ये ही राज्यस्तरीय स्पर्धा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आली होती. या स्पर्धेत वकृत्वस्पर्धेत इयत्ता पहिली व दुसरी गटात स्वरा जयेश शेलार पालघर जिल्हा (वाडा तालुका) गटात प्रथम, तर नयन नकुल पाटील द्वितीय ठरला तसेच इयत्ता तिसरी ते पाचवी गटात पत्रलेखनमध्ये ओम राजेश भोईर हा द्वितीय ठरला आहे. या विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे व त्यांना स्पर्धेसाठी प्रोत्साहित करणाऱ्या जिल्हा परिषद शाळा वाडा येथील शिक्षिका रूतिका राजेश भोईर व प्रतिभा प्रभाकर गोतारणे यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## भिवंडीत अग्नितांडाव सुरूच; दोन कंपन्यांना भीषण आग

**भिवंडी/आकाश गायकवाड**



भिवंडीत आगिंचे सत्र सुरूच असून मंगळवारी सात भंगार गोदामांना लागलेली आग विझते न विझते तोच आमने गावात असलेल्या गोदाम संकुलनातील दोन कंपन्यांना बुधवारी पहाटेच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. घटनास्थळी अग्निशमन दल दाखल झाले असून आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. तालुक्यातील आमने गावच्या हद्दीत असलेल्या महावीर गोदाम संकुलनात व्हीआरआयपीएल रिटेल कंपनी व ऑर्बीट एक्स्पोर्ट कंपनी या दोन गोदाम कंपन्यांना पहाटे भीषण आग लागली असल्याने लागलेल्या आगीत दोन्ही कंपन्या जळून खाक झाल्या आहेत. या गोदाम कंपन्यांमध्ये प्लास्टिक, कासमैटीक, घरगुती साहित्य, हार्डवेअर तसेच कापडाचा मोठ्या प्रमाणात साठा करण्यात आला होता. बुधवारी पहाटेच्या सुमारास या दोन्ही गोदामांना भीषण आग लागल्याने दोन्ही गोदामे जळून खाक झाली आहेत. या आगीचे नेमके कारण अजून समजू शकले नाही. सुदैवाने या आगीत कोणतीही जिवीत हानी झालेली नाही. या आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी भिवंडी, कल्याण, ठाणे येथील तीन गाड्या दाखल झाल्या असून आग विझविण्यासाठी अग्निशमन दलाकडून शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. दरम्यान मार्च महिना आला की भिवंडीत गोदाम व यंत्रमाग तसेच डाइंग सायजिंग कंपन्यांना आग लागण्याचे सत्र सुरू होत असल्याने या आगिंमागील नेमकी कारण समजत नाही. त्यामुळे या आगी अचानक लागतात की इन्शुरन्स मिळविण्यासाठी लावल्या जातात याबाबतचे सत्य समोर येतांना दिसत नाही. त्यामुळे या आगिंच्या घटनांची सखोल चौकशी व्हावी अशी मागणी स्थानिक नागरिक करत आहेत.

# देहविक्री करणाऱ्या महिलांच्या बचतगटाने सुरू केली घरघंटीचक्की

**भिवंडी/अभिजित हिरे**




भिवंडी शहरातील देहविक्रय करणाऱ्या महिलांच्या हनुमान टेकडी येथील वस्तीत राहणाऱ्या महिलांच्या आर्थिक, सामाजिक आरोग्य विषयक जनजागृती करणाऱ्या श्री साई सेवा संस्था या सामाजिक संस्थेच्या प्रमुख डॉ स्वाती खान यांनी येथील महिलांना या व्यवसायातुन बाहेर पडण्यासाठी प्रवृत्त करण्यास सुरुवात केली आहे. नुकताच येथील महिलांच्या स्थापन केलेल्या बचत गटाच्या माध्यमातून घरघंटी चक्की सुरू करण्यात आली आहे. डॉ. स्वाती खान यांनी येथील महिलांना संघटित करून परिवर्तन स्वयं सहाय्यता महिला बचतगट महानगरपालिकेच्या राष्ट्रीय नागरीक उपजीविका अभियान अंतर्गत स्थापन केले आहे. या महिला बचत गटास श्री साई सेवा संस्था यांनी एम ई एस एच फाऊंडेशन च्या अर्थ साहाय्याने ही भेट बचतगटास दिली असून तिचा गुरुवारी शुभारंभ डॉ. स्वाती खान यांच्या शुभहस्ते करण्यात आला. या उपक्रमामुळे महिलांना स्वयं रोजगाराचे साधन उपलब्ध होणार असल्याने महिलांनी आनंद व्यक्त केला आहे.

## डहाणूचे पोलीस निरीक्षक गोविंद ओमासेंची उचलबांगडी

डहाणू : डहाणूचे पोलीस निरीक्षक गोविंद ओमासे यांना पोलीस मुख्यालयात जमा करण्यात आले आहे. रात्री उशीरा याबाबतचे आदेश जारी करण्यात आले आहेत. ओमासे यांच्या विरोधात अनेक तक्रारी उद्भवल्या होत्या. डहाणूचे आमदार विनोद निकोले यांनी देखील त्यांच्या विरोधात तक्रारी केल्या होत्या. मात्र वेळोवेळी ओमासेंना अभय मिळाले. जिल्ह्यात दुसरे पोलीस निरीक्षक उपलब्ध नसल्याचे सांगून आमदारांना शांत केले. असे असले तरी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षातर्फे कॉम्रेड चंद्रकांत घोरखाना सतत पाठपुरावा करीत होते. २४ मार्च रोजी ओमासेंच्या निष्काळजीपणामुळे त्यांच्या पिस्तुलातून गोळी सुटली व पोलीस अधिक्षकांनी त्यांना मुख्यालयात जमा केले आहे. ओमासेंची विभागीय चौकशी देखील केली जाणार असल्याचे समजते. ओमासे हे २४ मार्च पासून सुट्टीवर जाणार असल्याने त्यांनी त्यांचे पिस्तूल जमा करण्यासाठी महिला पोलीसाकडे दिले. पिस्तूल जमा करताना आधी त्यातील काडतूस काढणे गरजेचे होते. महिला पोलीसाने पिस्तूल हाताळताना त्यातून गोळी सुटली. त्यानंतर ओमासेंनी स्वतःकडे पिस्तूल घेताना त्यांच्याही हातून गोळी सुटली. सुदैवाने दोन्ही गोळ्यांपासून जीवितहानी झाली नाही.

29 MARCH TO 04 APRIL 2021 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 27/03/2021 9:23 PM Page 1



# कशाला हवी राष्ट्रपती राजवट!

एखादे राज्य सरकार जर घटनेच्या चौकटीत राहून काम करीत नसेल तसेच केंद्राच्या निर्देशांचे योग्यरित्या पालन करीत नसेल किंवा त्या राज्यातील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे हाताबाहेर गेलेली असेल तर अशा वेळी केंद्र सरकारं घटनेच्या ३५६ आणि ३६५ कलमांचा आधार घेऊन त्या राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करू शकते. देशातील वेगवेगळ्या राज्यात आजवर १२६ वेळा राष्ट्रपती राजवट लावण्यात आली. तर महाराष्ट्रात १९८०, २०१४ आणि २०१९ आली राष्ट्रपती राजवट लावण्यात आली होती आणि त्याची वेगवेगळी कारणे होती. मात्र आज महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लवण्यासारखी परिस्थिती आहे का? तर अजिबात नाही! तरीही विरोधी पक्षाकडून राष्ट्रपती राजवटीची मागणी कशासाठी केली जात आहे तेच कळत नाही. मुकेश अंबानींच्या घराबाहेर उभी करून ठेवलेल्या गाडीत जीलेटीनच्या काड्या सापडल्या आणि त्यानंतर त्या कार मालकाची हत्या झाली. या प्रकरणी एपीआय सचिन वाझे यांच्यावर मनसुखच्या पत्नीने खुनाचा आरोप केल्याने सचिन वाझेनां पोलीस दला मधून निलंबित करण्यात आले. तसेच त्यांना अटकही झाली आहे. आता एनआयएसारखी राष्ट्रीय तपास यंत्रणा या प्रकरणाचा तपास करीत आहे. त्यांच्या तपासातून जे काही सत्य असेल ते नक्की बाहेर येईल. पण तपास पूर्ण होण्याच्या अगोदरच महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू करावी अशी भाजपकडून जी कोल्हेकुई सुरू झाली आहे ती अत्यंत हास्यास्पद आहे. सचिन वाझे प्रकरणावरून महाराष्ट्रात कुठे तणाव निर्माण झाला आहे का? कुठे दोन गटात राडेबाजी होऊन कायदा-सुव्यवस्था धोक्यात आली आहे का? किंवा या संपूर्ण प्रकरणात केंद्र सरकारच्या विरोधात महाराष्ट्रातील महाविकास आघाडीने घटनाबाह्य भूमिका घेतली आहे का? मग या पैकी काहीही घडलेले नसताना विरोधी पक्ष राष्ट्रपती राजवटीची मागणी कशासाठी करीत आहे? महाराष्ट्रातले महाविकास आघाडीचे सरकार आमदार फोडून पाडण्यात फडणवीस आणि त्यांच्या चेल्यांना यश आले नाही म्हणून आता वाझे प्रकरणाचे निमित्त करून सरकारच्या विरोधात केंद्राकडे कागाळ्या करून सरकार अस्थिर करण्याचा प्रयत्न केला जातोय. ज्या पण सध्या तरी ते शक्य नाही. मुकेश अंबानींची सुरक्षा, मनसुख हिरेन ही हत्या सचिन वाझेंची अटक आणि पोलिसांच्या बदल्यामध्ये झालेला भ्रष्टाचार यात जनतेला काडीचाही इंटरेस्ट नाही. कारण हा काही लोकांच्या पोटापाण्याचा किंवा आरोग्याचा प्रश्न नाही. म्हणूनच विरोधी पक्षाच्या कोल्हेकुईकडे महाराष्ट्रातला कुत्राही ढुंकून बघायला तयार नाही. आणि हेच वास्तव विरोधी पक्ष नेत्यांनी समजून घ्यायला हवे. ज्यामध्ये जनतेला काडीचाही स्वारस्य नाही त्यासाठी विरोधकांचा आटापिटा का? महाराष्ट्रात इतर कुठलेही गंभीर प्रश्न नाहीत का? मग त्याकडे दुर्लक्ष करून नको त्या गोष्टींना महत्व देऊन राष्ट्रपती राजवटीची मागणी करणे कितपत योग्य आहे. राष्ट्रपती राजवट लावल्यानंतर सगळा कारभार राज्यपालांच्या हाती जाईल आणि त्यानंतर अनेक गोष्टींवर बंधने येतील. एक प्रकारे लोकांची कोंडी होईल. सध्याच्या कोरोनाच्या संकट काळात लोकांची अशी कोंडी करणे योग्य ठरेल का? महाराष्ट्रातील राज्यपालांना महाराष्ट्राबद्दल आणि इथल्या जनतेविषयी किती प्रेम आहे हे या पूर्वी अनेक वेळा बघायला मिळाले. असे असताना त्यांच्या हातात सर्व कारभार गेल्यास आणखी समस्या निर्माण होऊ शकतात. आणि राज्यात सर्व काही आलबेल असताना तसेच जनतेची कुठलीही तक्रार नसताना केवळ मूठभर विरोधी पक्षाच्या मागणीवरून केंद्राने जर महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लावण्याचा प्रयत्न केला, तर महाराष्ट्रातील जनता ते कदापि सहन करणार नाही. कारण केंद्राच्या अशा मनमानी विरुद्ध महाराष्ट्र पेटून उठेल. लोकांवर कोरोनाचे संकट असताना राष्ट्रपती राजवटीची दंडेली अन्यायकारक ठरेल आणि त्याची फार मोठी राजकीय किंमत केंद्राला आणि भाजपला चुकवावी लागेल. कारण अगोदरच महाराष्ट्रातील जनता इथल्या भाजप नेत्यांवर नाराज आहे. कारण त्यांनी वेग वेगळ्या प्रकरणात महाराष्ट्राची आणि खास करून इथल्या पोलिसांची बदनामी केलेली आहे. अशावेळी केंद्राने अन्याय कारकरित्या राष्ट्रपती राजवट लावण्याचा प्रयत्न केला, तर लोकांच्या असंतोषाचा स्फोट होईल. तेंव्हा इथल्या भाजपवल्यांनी राष्ट्रपती राजवटीची मागणी करण्यापूर्वी राज्यातील जनतेच्या मनाचा कानोसा घ्यावा आणि लोकांनाही महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लावावी असे वाटत आहे असा भाजपचा दावा असल्यास त्यांनी सार्व. मताचा कौल घ्यावा म्हणजे दूध का दूध आणि पानी का पानी होईल. असे करण्याची भाजपची हिम्मत आहे का? असेल तर त्यांनी सार्व मताचा कौल जिंकून दाखवावा म्हणजे त्यांच्या मागे किती आणि विरोधात किती लोक आहेत तेही दिसून येईल. पण आज महाराष्ट्रातील भाजपची स्थिती पाहता त्यांना असे करण्याची हिम्मत होणार नाही आणि म्हणूनच त्यांनी भलती सलती मागणी करू नये कोरोनाच्या संकटकाळात लोकांना मदत करून जबाबदार विरोधी पक्षाची भूमिका पार पाडावी तेच त्यांच्या हिताचे ठरेल.

# कोरोना सेंटरच्या आगीतून भ्रष्टाचाराचा धूर

'संकट को अवसर मे बदलना चाहिए' म्हणजेच संकटात सुद्धा माणसाने संधी शोधून त्याचा लाभ उठवला हवा असा देशवासियांना उपदेश भारताचे महान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही दिवसांपूर्वी केला होता. त्यांच्या याच उपदेशाची व्यापारी दृष्टिकोन लक्षात ठेऊन काही लोकांनी या संकटाच्या काळातही हात धुवून घेतले. यात अन्नधान्याचे व्यापारी आणि खाजगी रुग्णालयांचा समावेश होता. एकीकडे सरकारी रुग्णालयात डॉक्टर पासून वार्ड बॉयपर्यंत सर्व कर्मचारी जीव धोक्यात घालून कोरोनाग्रस्त पेशंटना वाचवण्याचा प्रयत्न करीत होते, तर दुसरीकडे खाजगी रुग्णलयात कोरोना रुग्णांच्या नातेवाईकांची तिथले डॉक्टर चंबळच्या दरोडेखोरांना सुद्धा लाज वाटावी अशी लूटमार सुरू होती. दहा दहा लाखांची बिले पाठवून कोरोना रुग्णांच्या नातेवाईकांचे खिसे कापले जात होते. कोरोनाचा इतका प्रादुर्भाव वाढला होता की सरकारने काही खाजगी रुग्णालये कोव्हिड सेंटर चालवण्याची घाई घाईने परवानगी दिली होती. पण या रुग्णालयांनी त्यांच्या कोव्हीड सेंटरमध्ये आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून न दिल्याने व सरकारनेही त्याकडे फारसे लक्ष न दिल्याने ही कोव्हीड सेंटर कोरोना ग्रस्तांना यातना गृह बनली होती. आणि या खाजगी कोव्हीड सेंटरमध्ये हाणामारी पासून विनयभंगपर्यंत अनेक गंभीर घटना घडल्या होत्या. त्यामुळेच केवळ पैसा कमावण्यासाठी उभारलेली खाजगी कोव्हीड सेंटर भ्रष्टाचाराचे अड्डे बनले होते. भांडुपमध्ये अशाच एका अस्थायी कोव्हीड सेंटरला गुरुवारी मध्य रात्री भीषण आग लागून व्हॅन्टीलेटवर असलेल्या ११ कोरोनाग्रस्त रुग्णांचा मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण देश हादरला आहे. कारण सद्या देशातील जनता आणि सरकारी आरोग्य यंत्रणा कोरोनाशी संघर्ष करीत असताना देशाच्या आर्थिक राजधानीत एका खाजगी रुग्णालयातील कोव्हीड सेंटरला आग लागून ११ कोरोनाग्रतांचा मृत्यू होणे ही घटना केवळ भयंकर नसून खाजगी आरोग्य यंत्रणेच्या विश्वास अहर्तेचा कोळसा करणारी आहे. कारण अगोदरच वेगवेगळ्या ठिकाणी बांधलेल्या कोव्हीड सेंटरच्या भ्रष्टाचारावर विरोधकांनी सरकारला घेरले होते, त्यात आता भांडुप मधील आगीच्या घटनेने पेट्रोल ओतले आहे. त्यामुळे राजकीय आग अधिकच भडकली आहे आणि त्यावर रोट्या शेकण्यासाठी विरोधकांनी आरोपांचे पीठ मळायला सुरुवात केली आहे. आता महाराष्ट्राची सरकारने कशी वाट लावली यावर मीडिया समोर भटजी बुवांचे कीर्तन सुरू होईल आणि मीडियासाठी हा विषय अधिकच चविष्ट बनेल. सन रायीजनासारख्या एका खाजगी हॉस्पिटलला मॉलमध्ये कोव्हीड सेंटर सुरू करायला परवानगी देण्यापूर्वी त्या हॉस्पिटलची योग्यता, अनुभव तपासून घेणे आवश्यक होते, पण तसे काही न करता परवानगी देण्यात आली. या हॉस्पिटलचे कोव्हीड सेंटर आगीच्या भक्षथळी पडले. आज संपूर्ण महाराष्ट्रात कोरोनाने पुन्हा डोकेवर काढलेले असताना अशा प्रकारे कोव्हीड सेंटरला आग लागून त्यात दहा कोरोना ग्रस्त रुग्णांचा मृत्यू होणे ही अत्यंत गंभीर बाब असून या घटनेमुळे जे कोरोना बाधित आहेत त्यांच्या मनात रुग्णालय बाबत भीती निर्माण होऊ शकते आणि अशा स्थितीत एखाद्याला कोरोना झालेला असला तरी तो उपचार घेण्यासाठी हॉस्पिटलमध्ये जाणार नाही. आणि तसे झाले तर अशा



प्रकारे मनात भीती बाळगून घरात लपून बसलेले कोरोनाग्रस्त त्यांच्या संपर्कातील हजारो लोकांना बाधित करू शकतात. काही महिन्यापूर्वी भंडारा जिल्ह्यातील एका रुग्णालयात आग लागून ९ अर्भकाचा होरपळून मृत्यू झाला होता. त्यानंतर सरकारने राज्यातील सर्व रुग्णालयांना फायर ऑडिट करण्याचे आदेश दिले होते. पण त्याची पुरेशी अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे भंडारा दुर्घटनेची मुंबईत पूनरारुत्ती झाली. सरकारने नेहमीप्रमाणे दुर्घटनेची कसून चौकशी करण्याचे आदेश दिलेत. तसेच मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी ५ लाख रुपये देण्याची घोषणा करून आपली औपचारिक जबाबदारी पार पाडली. पण ज्यांच्या घरातला कर्ता पुरुष गेलाय त्याच्या कुटुंबाला हे ५ लाख आयुष्यभर पुरणार आहेत का? कुटुंबाचा दैनंदिनी खर्च, मुला बाळांचे शिक्षण, लग्न कार्य या पाच लाखांच्या मलमपट्टीने पूर्ण होईल का? एखादा माणूस मेल्यावर त्याच्यासाठी अश्रू गाळण्यापेक्षा त्याला जगवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. कोरोनाची दुसरी लाट खतरनाक आहे. सरकारकडून त्यासाठी आवश्यक त्या उपायोजना सुद्धा केल्या जात आहेत. पण कोरोना काळातील खाजगी रुग्णालयांच्या वाईट अनुभव पाहता कोरोनाग्रस्त उपचार करण्यासाठी खाजगी रुग्णालयात परवानगी देण्यापूर्वी त्या रुग्णालयाची व्यवस्थित माहिती घ्यावी त्यांच्या आरोग्य सेवेचा पूर्वितीहास तपासावा आणि त्यानंतरच अशी रुग्णालये कोरोनाग्रस्तांच्या वापरात आणावित. पण सरकारने सरसकट सर्वच खाजगी रुग्णांलयांना कोरोनाग्रस्त रुणांनासाठी कोव्हीड सेंटर खोलण्याची परवानगी देवून कोरोनाग्रस्त रुग्णांच्या जीवाशी खेळ चालवला आहे. त्यामुळे हे कुठेतरी थांबायला हवय. सरकारी असो अथवा खासगी कोव्हीड सेंटरसाठी परवानगी दिलेल्या रुग्णालयांनी सुरक्षेचे आवश्यक ते उपाय करायलाच हवेत. त्याच बरोबर कोरोनाग्रस्त रुग्णांवर उपचार करण्यासाठी चांगले डॉक्टर चांगल्या परिचारिका ठेवायला हव्यात, तरच कोरोना विरुद्धचा लढा यशस्वी होईल.

**संध्या स्ट्रोक**

**सोनू जाधव**

**मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३**

# भय इथले संपत नाही...

**(वाढत्या गुन्हेगारीची झळ सर्वसामान्य नागरिकांना बस लागली आहे. घरफोड्या, सोनसाखळी चोरी, वाहन चोरी आदी घटना वाढू लागल्या आहेच. दुसरीकडे संघटीत गुन्हेगारांच्या टोळ्या डोके वर काढत आहेत. त्यामुळे वसई विरार शहर हे राहण्यासाठी असुरक्षित बनलं आहे. )**

वसई विरार शहरातील सर्वसामान्य नागरिक सध्या भयभीत झालेला आहे. दररोज होणाऱ्या लहान मोठ्या चोरीच्या घटनांनी नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. दररोज वाहन चोरीच्या सरासरी तीन घटना घडत आहे. सोनसाखळी चोरी, भुरट्या चोऱ्या वाढल्या आहेत. दुकानं फोडली जात आहे, रात्रीच्या वेळी बंद घरांची कुलपे तोडली जात आहे. रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांच्या हातातील मोबाईल हिसकावणे, गळ्यातील सोनसाखळी लंपास करणे या घटना सातत्याने वाढत आहे. शहरात संघटीत टोळ्यांची गुन्हेगारी वाढली आहे. मागील आठवड्यात रात्री साडेनऊच्या सुमारास भर रस्त्यात गोळीबार करून हल्ला करण्यात आला. वसई लोकल मध्ये रात्री पावणेआठच्या सुमारास एका महिलेवर चोरीच्या उद्देशाने हल्ला करण्यात आला. त्यामुळे नागरिकांच्या असुरक्षिततेच्या वातावरणात भर पडली आहे. गुन्हेगारांना पोलिसांचे भय राहिलेले नाही का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. शहरातील वाढती गुन्हेगारी ही ढासळत्या कायदा सुव्यवस्थेचे लक्षण आहे.

नालासोपारा आणि विरार शहराच्या पुर्वेला मोठ्या प्रमाणावर अनधिकृत वसाहती उभ्या रहात आहेत. गुवसाहती गुन्हेगारांचे आश्रयस्थान बनू लागल्या आहेत. त्या ठिकाणी कोम्बिंग ऑपरेशन राबविणे गरजेचे आहे. नायजेरिय नागरीक हे अमली पदार्थाची तस्करी, ऑनलाईन गुन्हेगारी यात सक्रीय असतात. शहरात मोठ्या प्रमाणात बेकायेशीर परकिय नागरिक रहात आहेत. त्यांच्या नोंदी देखील पोलिसांनी ठेवल्या नव्हत्या. वसईतील सात पोलीस ठाण्यात मिळून केवळ ५९ नायजेरियन नागरिकांच्या नोंदी होत्या. यावरून पोलिसांची निष्क्रियता दिसून येत आहे. जनक्षोभ उसळयानंतर पोलिसांनी नायजेरियन नागरिकांविरोधात मोहीम उघडली आहे.

अमली पदार्थ विक्री, गुटखा विक्री मोठ्या प्रमाणवर होत आहे. पोलिसांची थातुरमातूर कारवाई सुरू आहे. मात्र त्यांची पाळेमुळे खणून काढण्यात पोलिसांना अपयश आलेले आहे. नालासोपारा मधील गोळीबार आणि हल्ला हा उत्तरेकडील राज्यातील माफियागिरीची झलक दाखवणार आहे. सराईत गुन्हेगार एवढी हिम्मत कशी करू शकतात? त्यांच्याकडे एवढी प्राणघातक शस्त्रे सहज कशी उपलब्ध होतात, असे प्रश्न निर्माण झालेले आहे. शहरात अनेक सराईत गुन्हेगार मोकाट वावरत आहे. त्यांच्यावरील तडीपारीचे प्रस्ताव सादर झालेले नाहीत. ज्यांचे प्रस्ताव सादर झाले आहेत, ते मंजूर झालेले नाहीत. हे सर्व गुन्हेगारांना पोषक वातावरण ठरू लागले आहे. नालासोपारा शहराच्या भरवस्तीत रात्री साडेनऊच्या सुमारास झालेला गोळीबार आणि शस्त्राने केलेला हल्ला हा उत्तरेकडील राज्यातील माफियाराज प्रमाणे आहे. गुन्हेगारांना ना कसले भय, ना कसले बंधन. एखादयाने खिशात मोबाईल घेऊन फिरावे तसे हे गुन्हेगार शस्त्र घेऊन फिरत असतात. अशा सराईत गुन्हेगारांनावर प्रतिबंधात्मक कारवाई पोलिसांनी केलेली नाही. पोलिसांचा धाक नसल्याने किंवा पकडले गेलो तरी काही होऊ शकत नाही याची त्यांना खात्री आहे. अभिलेखावरील अनेक सराईत गुन्हेगार शहरात सक्रीय आहेत तर काहींनी राजकीय आश्रय देखील घेतलेला आहे.

वसई स्थानकातून लोकल ट्रेनमध्ये चढलेल्या एका महिलेवर चोरीच्या उद्देशाने हल्ला झाला. हल्लेखोराने शस्त्राने तिच्यावर वार केले. रेल्वे स्थानकातील प्रवाशांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत असते. महिलांच्या सुरक्षेबाबात नेहमीच उपाययोजना केल्याचा दावा केला जातो. पण सुरक्षेचे दावे के किती पोकळ होते, हे या हल्ल्याने सिध्द झाले. शहरात साततयाने घरफोडया होत आहेत. दुकानांध्ये सातत्याने होणाऱ्या चोऱ्यांमुळे व्यापारी वर्ग भयभीत झाला आहे. सीसीटीव्ही कॅमेरे असले तरी चोरी होत आहे. तोंड झाकून लिलया चोरी केली जात आहे. त्यामुळे केवळे सीसीटीव्हीचे जाळे पसरवून उपयोग नाही तर गस्ती वाढवणे गरजेचे आहे. करोनाकाळात मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी वाढली. त्यामुळे गुन्हेगारीत वाढ झाली हे आता सिध्द होऊ लागले आहे. करोनाकाळात अनेकांना तुरूंगातून सोडलं. ते गुन्हेगार सक्रीय झाले आहे. विविध टोळ्या पुन्हा सक्रीय झाल्या आहेत. बरोजगारी, आर्थिक टंचाई यामुळे मानसिक स्वास्थ हरवले आहे आणि त्याचा परिणाम गुन्हेगारी वाढण्यात झाला आहे.

**नव्या पोलीस आयुक्तालयापुढे आव्हान**

वसई विरारचा शहरी भाग पालघर जिल्ह्यात येतो. त्यामुळे वसई विरार शहरातील वाढत्या गुन्हेगारील आळा घालण्यासाठी शहरातील कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी स्वतंत्र पोलीस आयुक्तालयाची मागणी गेल्या अनेक वर्षासूनची होती. त्यामुळे वसई विरार आणि मिरा भाईंदर या दोन जिल्ह्यातील शहरे एकत्र करून मिरा भाईंदर वसई विरार या स्वतंत्र पोलीस आयुक्तालयाची स्थापना करण्यात आली. स्वतंत्र पोलीस आयुक्तालय स्थापन झाल्याने गुन्हेगारी कमी होईल, अशी आशा होती. मात्र आयुक्तालय स्थापन झाले आणि मनुष्यबळ कमी असल्याने अपेक्षित परिणाम साधण्यात यश येत नाही. राज्याचे तत्काली पोलीस महासंचालक हेमंत नगराळे यांनी नव्या आयुक्तालयाची पाहणी केली होती. त्यावेळी नव्या आयुक्तालयात ४४ टक्के मंजूर पदे दे रिक्त असल्याचे त्यांनी सांगितले. नव्या पोलीस आयुक्तालयात सहा नव्या पोलीस ठाण्याची निर्मिती केली जाणार होती. परंतु ती प्रक्रिया देखील रखडली आहे. वाहतूक पोंलिसांचे मनुष्यबळ कमी आहे. अगदी तुटपुंजे वाहतूक पोलीस शहरात आहेत. त्यामुळे वाहतूक व्यवस्थेचे नियोजन करण्यात अडचणी निर्माण होत आहे. या अपुऱ्या मनुष्यबळाअभावी पोलिसांना कायदा सुव्यवस्था राखण्यात अपयश येत आहे. टाळेबंदीच्या काळात अनेक गुन्हेगार जामिनावर सुटले होते. ते वसई विरार शहरात आश्रयाला आले आहेत. या टाळेबंदीच्या काळात गुन्हेगारीत वाढ झाल्याचे दिसून आले आहे. अर्थात या मनुष्यबळाची कमरतता, पोलीस ठाण्यांची निर्मिती या प्रशासकीय बाबी असल्या तरी गुन्हेगारी मोडीत काढून नागरिकाना सुरक्षित वाटेल असं वातावरण तयार करणं हे खरं आव्हान नव्या पोलीस आयुक्तालयासमोर आहे. शहरातील प्रत्येक नागरिकाला राहण्यासाठी, मोकळं फिरण्यासाठी हे शहर सुरक्षित आहे, अशी भावना निर्माण झाली पाहिजे तरच स्वतंत्र पोलीस आयुक्तालयाचा उद्देश सफल होईल.

# जैन स्पोर्टस् ॲकॅडमीच्या कांचन चौधरीला ३ सुवर्ण व रौप्य पदक

## बंगलोर पॅरा स्वीमिंग चॅम्पीयनशीप स्पर्धेत चमकदार कामगिरी



**जळगाव/प्रतिनिधी**

येथील जैन स्पोर्टस् ॲकॅडमीची खेळाडू तथा जैन फार्म फ्रेश फूडस् लि.च्या मसाला प्रकल्पातील सहकारी, स्वीमिंग क्रीडा प्रकारात महाराष्ट्र शासनाचा एकलव्य पुरस्कारप्राप्त खेळाडू कांचन चौधरी यांनी बंग्लोर येथे नुकत्याच झालेल्या 'पॅरा स्वीमिंग चॅम्पीयनशीप' स्पर्धेत चमकदार कामगिरी केली. व्यक्तिगत पातळीवर त्यांनी ३ सुवर्ण व एक रौप्य पदक पटकाविले. कांचनच्या या यशाबद्दल जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन व सहव्यवस्थापकीय संचालक तथा जैन स्पोर्टस् अकॅडमीचे संचालक अतुल जैन यांनी अभिनंदन केले. जळगाव जिल्ह्यात खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे, चांगल्या दर्जाच्या सुविधा मिळाव्यात, या मुख्य उद्देशासाठी जैन इरिगेशनतर्फे जैन स्पोर्टस् ॲकॅडमीची निर्मिती करण्यात आली आहे. या ॲकॅडमीतील खेळाडू कांचन योगेश चौधरी हिला शालेय शिक्षण घेत असताना दत्तक घेऊन जबाबदारी पत्करली. तिला स्विमिंगसाठी लागणारे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षकांद्वारे मार्गदर्शन, किट जैन अकॅडमीने उपलब्ध करून दिले. कांचनच्या घरातील आर्थिक परिस्थिती बेताची असताना शिक्षण व स्विमिंगचा सराव सातत्याने सुरू ठेवला. आंतरराष्ट्रीय पातळीवरील पॅरा ऑलिम्पिकमध्ये सहभागही तिने नोंदवून चमकदार कामगिरी केली. क्रीडा क्षेत्रातील योगदानाला अधोरेखित करत स्वीमिंग क्रीडाप्रकारात महाराष्ट्र शासनाचा अत्यंत मानाचा मानला जाणारा एकलव्य पुरस्कार देखील कांचन यांनी प्राप्त केला. खेळासोबतच त्यांनी एम. एस्सी. मायक्रो बायोलॉजीचा अभ्यासक्रम चांगल्या गुणांची प्राप्ती करत पूर्ण केला.

जैन उद्योग समूहाचे सहव्यवस्थापकीय संचालक तथा जैन स्पोर्टस् ॲकॅडमीचे संचालक अतुल जैन यांनी कांचन चौधरीला शिक्षण पूर्ण झाल्यानंतर कंपनीत रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार कांचनला ७ ऑगस्ट २०१७ मध्ये नोकरीवर घेतले गेले. जैनच्या विविध आस्थापनांमध्ये, प्रकल्पात मिळालेल्या नोकरी, रोजगार संधीमुळे कांचन सारख्या अन्य खेळाडूंना प्रोत्साहन मिळत आहे. नोकरी सांभाळून हे खेळाडू विविध स्पर्धेत सहभाग नोंदवितात व आपली चुणूक दाखवितात. 'आपल्या खेळ व करियरला जैन स्पोर्टस् ॲकॅडमी व जैन परिवारामुळे उत्तम संधी मिळालेली आहे' अशी प्रतिक्रिया कांचनने आवर्जून व्यक्त करत कृतज्ञता व्यक्त केली.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# राजकीय असूयेपोटी माझ्यावर खोटे गुन्हे दाखल -प्रशांत राऊत

**विरार/प्रतिनिधी**

मागील ३० वर्षापासून सामाजिक व राजकिय क्षेत्रात कार्यरत असलेल्या व बहुजन विकास आघाडीचे कार्यकर्ता माजी नगरसेवक प्रशांत राऊत यांचेवर मागील काही दिवसात एमआरटीपी व अनुसूचित जाती-जमाती अंतर्गत गुन्हे विरार पोलिसांनी दाखल केले आहेत. हे सर्व गुन्हे राजकिय असूयेपोटी व राक्षसी महत्वाकांक्षीपोटी दाखल केले असून यात काही तथ्य नसल्याचे प्रशांत राऊत यांचे म्हणणे आहे. राजकीय व सामाजिक कारकिर्दीला काळिमा लागावा म्हणून सन २०११ पासून विनायक भोसले हे काही ना काही विघ्न आणत आहेत. जादूटोणा करून माझा मृत्यू व्हावा म्हणून तत्कालीन शिवसेना विभागप्रमुख विनायक भोसले याने काळीजादू करण्याचा प्रयत्न केला होता. हा गुन्हा संगमेश्वर पोलीस ठाणे, जिल्हा रत्नागिरी येथे भाग-६, गुन्हा रजिस्टर नं. ८/२०१४, महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी कृत्य व जादूटोणा यांना प्रतिबंध घालणे बाबत व त्याचे समूळ उच्चाटन करणे बाबतचा अधिनियम - २०१३ चे कलम ३(२) प्रमाणे स्टेशन डायरी क्रमांक २६७/१४, एन्ट्री नं. ३८ / २१.१५ वा. पोलीस निरीक्षक चिखले यांनी नोंद केला आहे. या गुन्ह्यात विनायक भोसले कडून पोलिसांनी मुद्देमाल जप्त केला. त्यात ज्यांचे वाईट करायचे होते त्यात त्यांच्या चुलतभावाचे, काही बडे नेते मंडळी तसेच माझे नाव चिठ्ठीत लिहिलेले सापडले. जी व्यक्ती स्वतःच्या भावाची होऊ शकत नाही, ती इतरांची कशी होणार?



काही दिवसांपूर्वी यांनी राजकिय आकसापोटी माझेवर एमआरटीपी अंतर्गत खोटा गुन्हा दाखल केला, तर प्रवीण जाधव या त्यांच्या साथीदाराला त्याने पुढे केले व एका प्रकरणात मी तिथे हजर नसतांना सुद्धा माझेवर खोटा अनुसूचित जाती जमाती अंतर्गत चा गुन्हा दाखल केला आहे. यापूर्वी प्रवीण सदानंद जाधव यांचेवर सुद्धा विरार पोलीस स्टेशन मध्ये CR NO. 1-५४३/२०१९ दिनांक १६/६/२०१९ रोजी एका वर्षीय मनोरुग्ण असलेल्या महिलेवर बलात्कार केल्याचा गुन्हा दाखल झाला आहे. विरार पूर्व संतनगर विभागात ब्रिज जवळील डी मार्ट शेजारी रात्रीच्यावेळी पेट्रोलिंगवर असणाऱ्या पोलिसांनी याला गुन्हा करताना पकडले आहे. व स्वतः पोलिसांनी प्रवीण जाधव यांचेवर गुन्हा दाखल केला आहे. माझे व माझ्या कुटुंबाचे मानसिक संतुलन बिघडावे व मी राजकीय व सामाजिक क्षेत्रातून उठावे यासाठीच खोटे गुन्हे दाखल करून माझे मनोधैर्य खच्चीकरण करण्याचा हा डाव आहे. माझा न्याय व्यवस्था व पोलीस यंत्रणेवर पूर्ण भरवसा आहे. सत्य कधीच लपून राहत नाही. परंतु भविष्यात विनायक भोसले व प्रवीण जाधव तसेच काही नेते मंडळी व त्याचे इतर साथीदार माझेवर अशाच प्रकारचे गंभीर स्वरूपाचे खोटे गुन्हे दाखल करू शकतात.

याप्रकरणी प्रशांत राऊत यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, गृहमंत्री मा. अनिलजी देशमुख, विरोधीपक्ष नेते विधानसभा देवेंद्र फडणवीस, विरोधीपक्ष नेते विधानपरिषद प्रवीण दरेकर, पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, पोलीस आयुक्त मीरा- भाईंदर वसई विरार, मा. पोलीस उपा आयुक्त नालासोपारा परिमंडळ ०२, मा.सह पोलीस आयुक्त मॅडम विरार विभाग, मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विरार पोलीस ठाणे यांना अशा प्रकारचे निवेदन दिले आहे. असे प्रशांत राऊत यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# देवणी येथील ग्रामीण रुग्णालयात सुविधांचा अभाव
## राष्ट्रवादी काँग्रेसचे अल्टिमेटम अन्यथा आमरण उपोषण



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी येथील ग्रामीण रुग्णालय असून अडचण झाल्याने रुग्णांना वेदनांशी सामना करावा लागत असल्याने राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने रुग्णालय प्रशासनाला सुविधांच्या पुर्ततेसाठी निवेदन देण्यात आले अन्यथा आमरण उपोषण करण्यात येईल असा इशाराही देण्यात आला. तालुक्यातील ५४ गावे देवणी येथील ग्रामीण रुग्णालयातील आरोग्य सेवेवर अवलंबून असून मात्र येथे येणाऱ्या रुग्णांना येथे हजेरी लावून सेवा व सुविधांचा अभाव असल्या कारणाने निराश होऊन इतर ठिकाणी उपचारासाठी परतावे लागत आहे. परिणामी यात गंभीर स्वरूपाचे रुग्ण या हेलपाट्यातच दगावत असल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत हे सर्वश्रुत आहे. बुधवारी सदरील देवणी ग्रामीण रुग्णालयाच्या भेटीवर असलेले लातूर जिल्हा निवासी शल्यचिकित्सक डॉ हरिदास यांची राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अनिल इंगोले यांच्यासह कार्यकर्त्यांनी भेट घेऊन रुग्णालयातील सुविधांची कैफियत मांडली व संबंधित सुविधांची पुर्तता करण्यासाठीचे निवेदन देण्यात आले. अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आमरण उपोषणाला बसण्यात येईल असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. शितल एकघरे. डॉ. कालिदास बिरादार. डॉ. बलवान बोलसुरे, राष्ट्रवादीचे युवक काँग्रेस शहराध्यक्ष जितेंद्र शिवगे यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

# भिवंडी ग्रामीण-शहापूरच्या विकासासाठी शिरसाड-वासिंद नव्या महामार्गाची मागणी
## खासदार कपिल पाटील यांचे मंत्री नितीन गडकरी यांना पत्र

**भिवंडी/आकाश गायकवाड**



मुंबई-अहमदाबाद आणि मुंबई-आग्रा महामार्ग जोडण्यासाठी शिरसाड ते वासिंद दरम्यान नवा राष्ट्रीय महामार्ग उभारावा, अशी महत्वपूर्ण मागणी भाजपाचे खासदार कपिल पाटील यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन केली. त्याचबरोबर कल्याण-मुरबाड रस्ता, माळशेज बोगदा आणि घाटाच्या कामाबरोबरच ५४८ अ महामार्गाच्या निकृष्ट कामाच्या चौकशीची मागणी केली.


भिवंडी लोकसभा मतदारसंघातून मुंबई-अहमदाबाद आणि मुंबई-आग्रा महामार्ग जातो. या दोन्ही महामार्गावरून मोठ्या प्रमाणावर वाहतूक होते. या दोन्ही महामार्गाला जोडणारा राज्य मार्ग शिरसाड-अंबाडी नाका-पडघा-वासिंद असा अस्तित्वात आहे. या राज्य मार्गाला राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा दिल्यास ग्रामीण भागाच्या विकासाला चालना मिळेल. तसेच या भागाचा औद्योगिक परिसर म्हणून विकास होण्यास मदत मिळेल. त्याचबरोबर ठाणे, भिवंडी शहरात होणारी मोठी वाहतूक कोंडी टळू शकेल, याकडे खासदार कपिल पाटील यांनी लक्ष वेधले आहे. त्याचबरोबर भिवंडीतील गोडाऊन हबसाठी हा रस्ता एक वरदान म्हणून सिद्ध होईल, असे खासदार कपिल पाटील यांनी नमूद केले आहे. ग्रामीण भागाच्या विकासाबरोबरच वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी शिरसाड ते वासिंद महामार्गाला मंजुरी द्यावी, अशी मागणी खासदार कपिल पाटील यांनी नितीन गडकरी यांच्याकडे पत्राद्वारे केली.

कल्याण-मुरबाड चौपदरी रस्ता आणि माळशेज घाटात साडेसात किलोमीटर बोगदा व रस्त्याचे काम वेगाने पूर्ण करावे, अशी मागणीही खासदार कपिल पाटील यांनी केली. कल्याण-मुरबाड रस्त्यावर वाहनांचे अपघात होऊन अनेक जणांचा मृत्यू झाला आहे. त्याचबरोबर या मार्गावरून नगर आणि मराठवाड्यापर्यंत मोठ्या प्रमाणावर वाहतूक होते. त्यामुळे या रस्त्याचे काम वेगाने पूर्ण करावे, अशी मागणी खासदार कपिल पाटील यांनी केली.

# आर्ट सोसायटी ऑफ इंडियाच्या प्रदर्शनात आर्टिस्ट विजय जैन यांच्या चित्राची निवड

**जळगाव/प्रतिनिधी**

जैन इरिगेशनचे सहकारी आर्टिस्ट श्री विजय जैन यांच्या चित्राची आर्ट सोसायटी ऑफ इंडियाच्या १०३ व्या वर्षीच्या ऑनलाईन प्रदर्शनातल्या व्यावसायिक गटात निवड झाली आहे. आर्ट सोसायटी ऑफ इंडिया ही नावाजलेली संस्था दरवर्षी अखिल भारतीय पातळीवर चित्र प्रदर्शन आयोजित करत असते. या प्रदर्शनात ३६०० कलाकृतितून चित्राची निवड होणे हाच एक बहुमान समजला जातो. या वर्षीचे चित्र प्रदर्शन कोविड-१९ विषाणूच्या साथीमुळे ऑनलाईन आयोजित करण्यात आले आहे. अखिल भारतीय पातळीवरील या चित्र प्रदर्शनात चार व्हर्च्युअल (आभासी) दालनात हे चित्र प्रदर्शित केली आहेत. कला रसिक या प्रदर्शनाचा आनंद २० मार्च ते ५ एप्रील २०२१ दरम्यान आर्ट सोसायटी ऑफ इंडियाच्या संकेत स्थळावर ऑनलाईन घेऊ शकतात. आर्ट सोसायटी ऑफ इंडिया ही संस्था १२९ वर्षापूर्वी १९१८ साली स्थापन झाली. या प्रदर्शनात विद्यार्थी व व्यावसायिक असे दोन गट आहेत. सुप्रसिद्ध चित्रकार वासुदेव कामत हे सध्या आर्ट सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष आहेत. विजय जैन यांच्या २० चित्रांचा एक समूह या प्रदर्शनात आपल्याला पहायला मिळेल. यात त्यांच्या चित्राचा आकार ३२द४० इंच आहे. त्यांनी ही सर्व रेखाचित्रे लॉकडाऊनच्या काळात काढली आहेत. साहजिकच या काळात त्यांना सगळे रंग, कॅनव्हास आणि चित्रकलेचे साहित्य उपलब्ध होऊ शकले नाही. यामुळे त्यांनी ही चित्रे केवळ पेनने कागदावर काढलेली आहेत. त्यांची ही रेखाचित्रे या प्रदर्शनाच्या अगोदर जळगावच्या पु.ना. गाडगीळ कलादालनात 'शोध' चित्र प्रदर्शनात कलारसिकांना बघण्यासाठी १४ ते २८ फेब्रुवारी २०२१ या काळात ठेवण्यात आलेली होती. त्यावेळीच



अनेक प्रेक्षकांनी ती बघितली आहेत. विजय जैन त्यांच्या चित्राला ळपषळपळींशऊ इनफिनिट-डी असे संबोधतात. यामध्ये अनेक मिती आहेत. केवळ दोन मिती, त्रिमिती किंवा बहुमिती चित्र ते नाही. केवळ रेषांनी ते चित्र तयार करतात. या रेषांच्या मदतीने ते अनंत मिती काढतात. विजय जैन यांच्या चित्रांमध्ये दोन किंवा अनेक रेषांमधली जागा निवडतात व त्यांना या चित्रात वेगळा आकार आणि अर्थ दिसतो. आर्टिस्ट विजय जैन आपल्या चित्राविषयी म्हणतात की माझ्या चित्राच्या रंगांच्या थरातून मी एक रेष घेतो आणि कलारसिकांना त्यात रंगांच्या छटा दिसतात. तसेच एका रेषेला दुसरी रेष जोडून प्रेक्षक वेगळी जागा आणि आकार त्या रेखाचित्रात पहातात. ते प्रेक्षकांच्या डोळयात समाधान आणि आनंद बघतात.

# जळगावचे सत्तांतर हा नाथाभाऊंचा भाजपाला पहिला झटका!



**जळगाव/प्रतिनिधी**

जळगाव शहरात भाजपकडे असलेली महानगरपालिका भाजपच्या सत्तावीस नगरसेवकांच्या बंडखोरी आणि घोडेबाजारानंतर शिवसेना नेतृत्वाकडे गेली आहे. जळगाव मनपाची सुत्रे शिवसेनेच्या महापौर सौ. जयश्री महाजन आणि विरोधी पक्षनेत्याची सूत्रे त्यांचेच पती सुनील महाजन यांच्याकडे गेली आहेत. जळगाव शहरातील रस्ते, पिण्याचे पाणी योजना-हरित- स्वच्छ जळगावच्या विकासाला गती द्यावी अशी जळगावकरांची अपेक्षा दिसते. तरीही ७५ सदस्यीय मनपात भाजपचे ५७ नगरसेवक असताना केवळ १५ सदस्यीय शिवसेना संख्याबळावर सत्ता परिवर्तनाचा पराक्रम कसा करु शकते? या छोट्याशा धक्कादायक प्रश्नात जळगाव जिल्हा भाजपचे नेतृत्व करणारे माजी पालकमंत्री गिरीश भाऊ महाजन यांची एकाधिकारशाही कार्यपद्धती आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या उदात्तीकरणाचा धडाका यामुळे भाजप नगरसेवकांच्या मनात असंतोषाचा ज्वालामुखी उसळत असल्याचे वारंवार दिसून आले.

भाजपच्या राज्यातील सत्ता काळात मुख्यमंत्र्यांचे संकटमोचक आणि उजवे हात येथपर्यंत जाऊन पोहोचलेल्या गिरीशभाऊंनी फडणवीस यांचा नाथाभाऊंचे राजकारण थप्पीला लावण्याचा एककलमी अजेंडा राबवला. त्यामुळे नाथाभाऊंना मानणाऱ्या मोठ्या जनसमुदायाची नाराजी त्यांनी ओढवून घेतली. त्यातही हम करे सो कायदा, ना खाता ना बही-हम कहे वो सही या समांतर रुळावरुन गीतांजली एक्सप्रेसच्या वेगाने धावलेली भाजपा एक्सप्रेस आपल्याच लोकांना चेंगरते की काय? याचे भानही त्यांना राहिले नाही. जेव्हा आमदाराचा मंत्री होतो तेव्हा सत्ते भोवती कडेबोळे जमते. जमलेल्या भाऊगर्दीत जो तो आपल्या फायद्याचा अजेंडा घेऊन नेत्यांच्या मागेपुढे करतो. नेतेही वस्ताद असतात. जमलेल्या लोकांच्या गर्दीत गोल्डमॅन, मसल पॉवर वाले, मनी पॉवरवाले, उद्योजक आणि त्यातही जातभाई विश्वासपात्र हस्तक यांचाच आवाज मंत्र्याला ऐकू येतो. आजकाल सत्तारुढ -विरोधातले बहुतेक मंत्री - आमदार -लोकप्रतिनिधी हे एकाच कानाने ऐकतात. त्यांचा दुसरा कान सतत मोबाईलवर व्यस्त असतो. त्यामुळे ही समस्या सोडवण्यासाठी केवळ फायदेशीर उपक्रम ऐकण्यासाठी त्यांनी त्यांच्या खाजगी स्वीय सहाय्यक, उजवे हात बनलेले हस्तक, डाव्या हाताला बसणारे हस्तक, मनी मॅटर, मतदार बांधव, मतदार संघ हाताळणारे, सेवाभावी उपक्रम राबवणारे, फोनच्या एका इशाऱ्यावर हव्या त्या शहरात- हवे तेथे शून्य मिनिटात हजारो- लाखो- करोडो रुपये उपलब्ध करण्याची क्षमता बाळगणा-यांची फौज उभी करण्याचे कौशल्य मिळवल्याचे सांगितले जाते. या तंत्राचा भाग म्हणून मग गिरीशभाऊंच्या अष्टप्रधान मंडळात सुनील झवर नामक विद्वानाचा अमात्य म्हणून समावेश झाल्याचे सांगतात. आर्थिक आघाडीवरील असे सेनापती नाशिक- मुंबई- जळगावसह थेट दिल्लीपर्यंत यशस्वी मोहिमा राबवतात. त्यातून नाशिकचा कुंभ मेळा ( २५०० कोटी) किंवा वाटरग्रेस, स्थानिक आमदार असो किंवा ४ हजार कोटींच्या योजनांची सुखावणारी टेंडर्स असो यातून आर्थिक लाभ मिळवू पाहणाऱ्यांची नवउद्योजक कंत्राटदार (ठेकेदारांची) गर्दी जमते. अलीकडे कार्यकर्ते हेच अनेक योजनांची ठेके मिळवण्यासाठी मैदानात उतरल्यामुळे या कोट्यावधीच्या वाहत्या गंगेतून त्यांनाही काही मिळावे ही अपेक्षा योग्य ठरते. या पार्श्वभूमीवर माजी मंत्री सुरेशदादा जैन यांनी त्यांच्या अनुयायांपैकी अनेकांना ठेकेदारीत आणून व्यवसायाच्या मार्गाने धनसंपदा मिळवण्याचा मार्ग दाखवला. शिवाय एखाद्या शहरात व्यापारी संकुलासह आणखी काय काय करता येऊ शकते याचीही योजना आखून बऱ्याच गोष्टी करुन दाखवल्या आहेत. यापैकी गोलाणी मार्केट, सतरा मजली मनपा इमारत अशा अनेक गोष्टी लक्षात घेतल्या जाऊ शकतात.

धनसंपदा बनवण्याच्या रॅट रेस मध्ये त्यांची विकास एक्सप्रेस मध्यंतरी रुळावरून घसरली (की घसरवली?) हा भाग वेगळा. जिल्हा नेतृत्वाच्या स्पर्धेत सुरेशदादा जैन - एकनाथराव खडसे- गिरीशभाऊ महाजन यांच्यातील राजकीय सत्ता संघर्ष जिल्ह्याने पाहिला आहे. अलीकडे भाजप शिवसेनेत गिरीश भाऊ महाजन-गुलाबराव पाटील या आजी माजी पालकमंत्र्यांमध्ये गुलाबी गुलाबजाम चविष्ट पणे खाण्याचे सख्य दिसते. परंतु जेव्हा आपला नेता हा एकटाच सर्व मिठाई खाऊन फस्त करण्यात गुंततो आणि सत्तेचा घाऊक ठेकेदार या भूमिकेत वावरतो, तेव्हा भाजप सारख्या बलाढ्य अशा राष्ट्रीय पक्षात बंडखोरी होऊ शकते. याचे ताजे उदाहरण म्हणजे मनपातील सत्तांतर नाट्य. भाजपची मनपातील सत्ता भाजपकडून हिसकावून शिवसेनेकडे सोपवण्यात नाथाभाऊंची भूमिका महत्त्वाची मानली जाते. नाथाभाऊंच्या मते त्यांनी मनात आणले तर महिनाभरात भाजपच्या ताब्यातील जिल्हा परिषद देखील ते खेचू शकतात. परंतु सध्या गिरीशभाऊ हे येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत नाथाभाऊंना टक्कर देऊ शकेल अशा त्यांच्यात समाजातील बदनाम फरिश्त्याला (कोट्याधीश) हवा देत आहेत. बीएचआर मल्टीस्टेट प्रकरणातील सुनील झंवर असोत की अशाच कोट्यावधीच्या घोटाळ्यातील आणखी कुणी असो त्यांना भाजपच्या लॉन्ड्रीत धुऊन शुद्ध करून देण्याच्या उद्योगात घरच्या तिजोरीचा कानाकोपरा महात्मा गांधीच्या कागदांच्या गठ्ठ्यांनी भरण्यात वाईट काय आहे? असे काही कार्यकर्ते खाजगीत बोलू लागले आहेत. परंतु गुन्हेगारी प्रवृत्तीच्या उदात्तीकरणाच्या नेत्यांच्या कंपूशाही खेळात कार्यकर्त्यांच्या मात्र पोटावर मार पडू लागला आहे. त्याचा उद्रेक झाल्याने मनपात सत्तांतर घडले. मनपा निवडणुकीपूर्वी त्याच क्षेत्रातल्या जुन्या प्रकरणात आपण १०० आजी माजी नगरसेवक आत घालू शकतो असा दावा एका नेत्याने केला होता. हे पाहता शहरात मनपा विकासासाठी लढणार की एकमेकांचे नेतृत्व संपवण्यासाठी? याचे उत्तर कोण देणार?

# कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी सर्व शासकीय यंत्रनानी समन्वयाने काम करावे - दादाजी भुसे

पालघर : महसूल विभाग, पोलिसयंत्रणा, आरोग्य विभाग,महानगरपालिका नगरपालीका व इतर शासकीय यंत्रणानी समन्वयानी काम करुन कोरोनाचा प्रादुर्भाव रोखावा असे निर्देश कृषी, माजी सैनिक कल्याण मंत्री तथा पालकमंत्री दादाजी भुसे यांनी शासकीय यंत्रनांना दिले. व्हिडिओ कॉन्फरन्स (त.उ) च्या माध्यमातून पालकमंत्री भुसे यांनी कोव्हिड १९ चा आढावा घेतला त्यावेळी श्री. भुसे बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ माणिक गुरसळ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सिध्दाराम सालीमठ, पोलिस अधिक्षक दत्तात्रेय शिदे, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ किरण महाजन, तसेच प्रांतधिकारी, तहसिलदार उपस्थित होते. मा.मुख्यंमत्री उध्दव ठाकरे यांच्या संकल्पनेतून साकारण्यात आलेली 'मी जबाबदार, मोहिम जिल्हयामध्ये प्रभावी पणे राबवावी. तसेच जिल्हयामध्ये लसीकरणाचे उदिष्ट. पुर्ण करुन कोव्हिड १९ चा प्रादुर्भाव रोखावा असेही निर्देश पालकमंत्री भुसे यांनी शासकीय यंत्रनांना दिले. ज्याना कोव्हिडचा प्रादुर्भाव झाला असेल अशा व्यक्तींना संस्थात्मक अलगीकरणा मध्ये ठेवावे .ज्या व्यकतीच्या घरी अलगीकरणासाठी आवश्यक असलेल्या सुविधा आहेत. त्यांना घरीच अलगीकरण करण्याची परवानगी दयावी. ज्या व्यक्तीची कोरोना चाचणी करण्यात आली आहे. अशा व्यक्ती सार्वजनिक ठिकाणी फिरणार नाहीत याची दक्षता पोलिस यंत्रनांनी घ्यावी असेहि निर्देश दादाजी भुसे यांनी दिले.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पालघर**

**ई-निविदा सूचना क्रमांक २४ सन २०२०-२०२१**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पालघर शासकीय विश्रामगृह आवार, जुना मनोर रस्ता, वेवुर रोड, पालघर हे ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ब-१ नमुन्यातील निविदा महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत **सुशिक्षित बेरोजगार अभियंता** ठेकेदाराकडून मागवित आहेत.

टिप : सदर निविदा सूचनेमध्ये एकूण ०१ (एक) काम समाविष्ट आहेत. या निविदेवरील संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावरून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

1) www.mahapwd.com 2) http://mahatenders.gov.in

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रुपये लक्ष जी.एस.टी.वगळून | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| १. | करलगाव सांबरेपाडा स्मशानभूमी रस्ता काँक्रिटीकरण करणे. ता.जि. पालघर | ४,२५,२३५/- | आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम सन २०२०-२१ (मा.आ. श्री. श्रीनिवास वनगा) |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

ई-निविदा उपलब्ध कालावधी - दि. ०१/०४/२०२१ ते दि. ०८/०४/२०२१ पर्यंत

ई-निविदा उघडणे - दि. १२/०४/२०२१ दुपारी ३.०० नंतर शक्य झाल्यास.

स्थळप्रस्त का.अ.यांनी मंजूर केली आहे.


जा.क्र. सा.बां.वि./पालघर/निविदा/१८५९
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सा.बां. विभाग, पालघर
शासकीय विश्रामगृह आवार,
जुना मनोर रस्ता, वेवुर रोड,
पालघर (पुर्व) - ४०१ ४०४.
दिनांक : २५/०३/२०२१

सही/-
कार्यकारी अभियंता,
सा.बां. विभाग, पालघर
*करिता*

**जिमाका/पालघर/जाहि ७८/१५०/२०२१ दिनांक : २६/०३/२०२१**

# उदगीर महसूल विभागात देवणी महसूल विभागाचा समावेश करण्यात यावा; राज्यमंत्री यांची पालकमंत्र्यांकडे मागणी

**देवणी/प्रतिनिधी**



निलंगा तालुक्यात समाविष्ट असलेला देवणी महसूल विभाग उदगीर महसूल विभागात समावेश करण्यात यावा, अशी मागणी राज्याचे पर्यावरण पाणी पुरवठा राज्यमंत्री संजय बनसोडे यांनी पालकमंत्री अमित देशमुखांकडे मागणी केली आहे. देवणी तालुका हा उदगीर पासून १७ कि.मी. आहे, तर निलंगा ५० कि.मी.च्या अंतरावर आहे देवणी तालुका हा पूर्वी उदगीर तालुक्यात होता,तसेच सध्या जनतेची उदगीरशी संबंध आहेत शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, व्यापार व बाजारपेठ इत्यादींच्या माध्यमातून खूप जास्त संबंध आहेत तरी जनतेच्या हितासाठी तसेच प्रशासनाच्या सोयीच्या दृष्टीने ही देवणी तालुक्याचे महसुली उपविभागीय कार्यालय निलंगा ऐवजी उदगीर उपविभागीय कार्यालयास जोडण्यातबाबत विशेष बाब म्हणून निर्णय व्हावा अशी मागणी राज्य मंत्री संजय बनसोडे यांनी वैद्यकीय शिक्षण मंत्री तथा लातूरचे पालकमंत्री अमित देशमुख यांच्याकडे केली आहे यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस बस्वराज पाटील नागराळकर उपस्थित होते.

# देवणी तहसील समोर काँग्रेसचे काळ्या कायद्यांविरोधात अंदोलन

**देवणी/प्रतिनिधी**



देवणी तहसील समोर तीन काळ्या कृषी कायद्यांविरोधात काँग्रेसचे एकदिवसीय अंदोलन करण्यात आले यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते गोविंदराव भोपणीकर, दिलीप पाटील नागराळकर, देवणी तालुका काँग्रेसचे अध्यक्ष अॅड अजित बेळकोणे, जिल्हा उपाध्यक्ष मालबा घोणसे यांनी तीन काळ्या कृषि कायद्याविरोधात केंद्र शासनाच्या विरोधात जाहिर निषेध करून तीन कृषी कायदे रद्द झाले पाहिजे आशा घोषणा केली आहे. यावेळी संजय गांधी निराधार योजना कमिठीचे अध्यक्ष वैजनाथ लुल्ले, काशीनाथ मानकरी, धनराज चिद्रे, सं गा यो सदस्य कृष्णा पाटील, माजी सरपंच देवीदास पंतगे, सुभाष पाटील, प्रताप कोयले, नामदेव मुराळे, देवणी तालुका युवक काँग्रेसचे अध्यक्ष राहुल बालुरे, जावेद तांबोळी, महादेव मळभागे, ईद्रीस भांतब्रे, रशीद मल्लेवाले, जाफर मोमीन, दाऊत भाई उंटवाले, बालाजी पवळे, माधव जाधव आणि राजकुमार जाधव सह अदिंची उपस्थिती होती.

पान १ वरून....

## सायकल चोरीमुळे यंत्रमाग मालक...

असल्याची माहिती परिसरातील लोकांना दिसून आली. त्यांनी या घटनेची माहिती लगेचच शहापूर पोलीस स्टेशनला दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी तातडीने दाखल झाले. त्यांनी घटनास्थवरील मृतदेहाची पाहणी केली असता. मृत तरूणाच्या अंगावर, पाठीवर मारहाणीच्या खुणा स्पष्ट दिसत होत्या. घटनास्थळी डीवायएसपी. बी.बी.महामुनी यांनी भेट देऊन पाहणी केली.तपसाच्या योग्य त्या सुचना त्यांनी पोलीसाना दिल्या. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा सुरू केला होता. मयत तरूणाची ओळख पटविण्याचे काम सुरू असताना मयत तरूण हा इचलकरंजी शहरातील भोनेमाळ परिसरातील डॉ.लांडे हॉस्पिटल शेजारी राहयला असल्याचे पोलीसांना समजले. त्याचे नाव अळीम रशीद गदवाल असे असल्याचे समजले. पोलीसांनी या घटनेची माहिती त्याच्या घरच्या लोकांना दिल्यावर त्याचे घरचे लोक ही घटनास्थळी तातडीने घटनास्थळी आले होते. मयत अलीम गदवाल याची पत्नी जायादा हिने घटनास्थळी मोठा अक्रोश केला होता. पोलीसांनी तिला शांत करून मयत अलीम गदवाल याचा खून कोणत्या कारणातून आणि कुणी केला असावा याची माहिती घेतली. त्यावेळी पोलीसांना तिने दिलेली माहिती ही धक्कादायक अशी होती. अलीम रशीद गदवाल हा डा,लांडे हॉस्पिटलच्या मागे असणाऱ्या सोडगे मळा येथे आई, पत्नी, मुलासह राहयला आहे. तो आपल्या कुटूंबाच्या उदरनिर्वाहासाठी वहीफणी करण्याचे काम करीत असतो.त्यातून त्याला बऱ्यापैकी पैसे मिळत होते. त्यावरच त्याच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालत होता. इचलकरंजी शहर परिसरात यंत्रमाग व्यवसाय मोठया प्रमाणात असल्याने यंत्रमागासाठी तारा देणेसाठी म्हणून वहीफणी करावी लागते. ते काम तो करीत होता. शहर परिसरात आणि आजूबाजूला यंत्रमाग भरपूर असल्याने मिळेल त्या कारखान्यात तो वहीफणी करण्यासाठी जात होता. त्याला त्या कामाचे पैसे शुक्रवारी म्हणजे आठवडयाला मिळत होते. पूर्वीपासूनच इचलकरंजीतील यंत्रमाग कामगारांना आणि इतर कामगारांना शुक्रवारी आठवडी बाजाराच्या दिवशी पगार देण्याची प्रथा आहे. त्यामुळे शुक्रवार म्हणजे इचलकरंजीतील कामगारांची दिवाळीच असते. गेल्या बऱ्याच वर्षापासून तो वहीफणी करण्याचे काम करीत असल्याने त्याला बऱ्याच यंत्रमाग मालकांची चांगलीच ओळख आहे.जो मालक वहीफणीसाठी बोलवेल त्यावेळी तो त्याच्या कारखान्यात जात होता.मागील दोन तीन आठवडयात तो संगमनगर येथील कोल्हापूर धाब्या शेजारी असणाऱ्या अल्ताफ शेख याच्या कारखान्यात वहीफणी साठी जात होता. त्याचा पगार ही अल्ताफ शेख यांनी त्याला दिलेला होता. अल्ताफ शेख हा पूर्वी एका खूनाच्या घटनेतील संशयीत आरोपी होता. मागे एकदा तारदाळ परिसरात राजू लामकाने या तरूणाचा खून झाला होता. त्या खूनातील तो आरोपी होता.या खूनप्रकरणी त्याला जन्मठेपेची शिक्षा झालेली होती. ही शिक्षा त्याने सन २०१२ पर्यत भोगून तो बाहेर आला होता. तेव्हापासून तो सरळ मार्गानी आपला यंत्रमागाचा धंदा करीत होता. यंत्रमागाच्या धंदयाबरोबरच तो दुसरा ही धंदा करीत होता. त्यामुळे त्याची परिस्थिती ही सधन बनली होती. रविवार दि.१३ मार्च २०२१ रोजी त्याच्या कारखान्यासमोर लावलेल्या दोन सायकली चोरीला गेल्या होत्या. तारदाळ संगमनगर परिसरात भुरटया चोऱ्याचे प्रमाण वाढले आहे. दिवसाढवळया घरासमोरील वस्तू चोरीला जात आहेत. त्यातच अल्ताफ याच्या दोन सायकली चोरीला गेल्याने ते भंयकर चिडले होते. अगोदरच त्याचा स्वभाव हा तसा तापट आणि रागीट होता. घरासमोर लावलेल्या सायकली कुणी चोरल्या असतील याचा ते अंदाज काढीत असताना त्याना बाहेरून समजले की त्याच्या कारखान्यात वहीफणी करण्यासाठी येत असलेला अलीम गदवाल यानेच त्या सायकली पहाटे पहाटे नेल्या आहेत.संशयातून त्याचे नाव पुढे आल्याने सोमवारी अल्ताफ हे अलीम गदवाला याच्या सोडगे मळ्यातील घरात गेले होते. त्यावेळी घरात अलीम हा नव्हता. त्याची बायको जायदा आणि त्याची आई आणि दोन लहान मुले घरात होती. अल्ताफ हे रागाने लालबुंद होऊन जायदा हिला विचारू लागले की तिचा नवरा अलीम हा कुठे गेला आहे. त्यावेळी तिला काही समजले नाही. ते त्याच्या घरासमोर येऊन मोठयाने भांडण काढीत असताना त्यांनी जायदा हिला सांगितले की तुझ्या नवऱ्याने संगमनगर येथून आमच्या कारखान्यातून दोन सायकली चोरल्या आहेत. त्या चोरलेल्या सायकली परत आणून देण्यास सांग नाही तर त्याला जिंवत ठेवित नाही. त्याला मारूनच टाकतो अशी गर्भीत धमकी त्याने दिलेली होती. सोमवारी रात्रीच्या सुमारास अलीम हा घरी आला असताना त्याच्या बायकोने संगमनगर येथील अल्ताफ शेख हा घरी येऊन तुम्हाला मारण्याची धमकी देऊन गेला आहे. तुम्ही त्याच्या सायकली चोरल्या आहेत असे तो म्हणत होता.त्यावेळी अलीम याने बायको जायदा हिला सागितले की मी काही त्यांच्या सायकली चोरल्या नाहीत. मी त्यांना भेटून तसे सांगतो. ते दोघे ही जेवण करून झोपले असताना रात्रीच्या सुमारास त्याच्या घराच्या दरवाज्यावर टकटक झाली. त्यावेळी जायदा हिने दरवाजा उघडून बाहेर आली असता. बाहेर अल्ताफ शेख हा तीन चार लोकांना घेऊन आला होता. तो दंगा करीत होता. अलीमला बाहेर पाठवून द्या म्हणून सांगत होता. जायदा हिने तो उदया तुम्हला भेटायला येईल त्याने तुमच्या सायकली चोरल्या नाहीत तो आता झोपला आहे असे सांगून त्यांना जाण्यास सांगत होती. पण ते कुणी ही ऐकायला तयार नव्हते. त्यातच त्यातील दोघांनी घरात शिरून झोपलेल्या अलीम याला उठवून घराच्या बाहेर आणले त्याला सायकल चोरल्याचा जाब विचारीत दोन चार त्याच्या कानाखाली लावले. जायदा हिने त्याला सोडवण्याचा प्रयत्न करीत असताना त्यांनी तिला ढकलून देत अलीम याला एकाच्या दुचाकीवर बसवले आणि त्याला घेऊन गेले. त्यावेळी त्यांनी अलीम याच्या पत्नी जायदा हिला सांगितले की तुझ्या नवऱ्याला सोडवण्यासाठी संगमनगर येथील कारखान्यात चोरलेल्या सायकलीचे पैसे घेऊन ये. अन्यथा त्याचे परिणाम वाईट होतील अशी धमकी दिली. त्यावेळी त्यांनी अलीम याला आपल्या गाडीवर बसवून संगमनगर येथील आपल्या कारखान्यात घेऊन गेले., दुसऱ्या दिवशी मंगळवार दि.१६ मार्च रोजी पार्वती इंट्रस्ट्रीमध्ये कामाला जाणाऱ्या काही लोकांना कोल्हापूर धाब्याच्या रस्त्यावरील मोकळ्या मैदानात एका तरूणाचा मृतदेह पडला असल्याचे दिसून आले. त्याच्या डोक्याला जबर मारहाण झाल्याने मोठी दुखापत होऊन त्यातून मोठया प्रमणात रक्तस्त्राव झाला होता.त्यातच त्याचा मृत्यू झाला असल्याचे दिसून येत होते. घटनास्थळावरली एकाने या घटनेची त्वरीत माहिती शहापूर पोलीसांना दिली. त्यापूर्वीच ही घटना अनेकांच्या व्हॉटसअप ग्रुपवर व्हायरल झाल्याने खूनाच्या या घटनेने चर्चेला उतू आला होता. अगोदरच एका पाठोपाठ होणाऱ्यां खूनाच्या घटनेने पोलीस ही चक्रावून गेले होते.त्यातच संगमनगर येथे ही खून झाल्याची माहिती मिळताच शहापूर पोलीसांचा ताफा लगेचच सकाळ सकाळी घटनास्थळी दाखल झाला.मयत तरूण हा पालथ्या अवस्थेत पडला होता. त्याच्या अंगावर मारहाणीच्या खूणा होत्या. त्याच्या डोक्याला कसल्या तरी लाकडी हत्याराने मारहण झाल्याने मोठे भोक पडले होते. त्यातून रक्तस्त्राव झालेला दिसून येत होता. जबर मारहाण झाल्याने त्यात त्याचा मृत्यू झाला होता. असा अंदाज पोलीसानी बांधून पंचनाम्याला सुरूवात केली. घटनास्थळी जमलेल्या लोकांच्याकडून मयत तरूणाची ओळख अलीम रशीद गदवाल अशी पटलेली होती. या घटनेची माहिती पोलीसांनी मयत अलीम याच्या घरच्या लोकांना दिल्याने ते ही घटनास्थळी दाखल झाले होते. पोलीसांनी घटनास्थळाचा आणि मयतचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी इचलकरंजी येथील आयजीएम रुग्णालयात पाठवून दिला होता. या घटनेतील संशयीत आरोपीना ताब्यात घेतल्याखेरीज मृतदेह ताब्यात घेतला जाणार नाही अशी भूमिका मयताच्या नातेवाईकांनी घेऊन या घटनेसंदर्भात कोल्हापूर जिल्हा पोलीस अधिक्षक तिरूपती काकडे यांची भेट घेतली होती. त्यांनी त्याची समजूत काढून चौकशीचे आदेश दिले होते., या घटनेची माहिती पोलीसांनी मयत अलीम गदवाल याची पत्नी जायदा हिच्याकडून घेतली असता, तिने पोलीसांना अल्ताफ शेख याने जीवे मारण्याची धमकी देऊन नवरा अलीम याला सोमवारी रात्री नेल्याचे सांगितले. तिने दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी अल्ताफ शेख याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे अलीम गदवाल याच्या खूनाविषयी चौकशी केली असता. तो पोलीसांना उडवाउडवीचे उतरे देत होता. म्हणून पोलीसांनी त्याला शहापूर पोलीस स्टेशनला आणून त्याला पोलीसी खाक्या दाखवताच त्याने आपला गुन्हा कबुल करून आणि माहिती दिली की मयत अलीम याने त्याच्या दोन सायकली चोरल्याच्या संशय त्याना होता. त्याला संगमनगर येथे घेऊन येवून त्याच्याकडे सायकल चोरीची विचारणा करीत असताना तो काहीच सांगत नव्हता.त्यावेळी त्याने व इतर तिघा चौघांनी केलेल्या मारहाणीत त्याचा मृत्यू झाला होता. त्याला मारण्याचा आमचा कोणताही हेतू नव्हता. अशी त्याने माहिती पोलीसांना दिली. या घटनेची फिर्याद मयत अलीम याची पत्नी जायदा हिने शहापूर पोलीसात दिल्याने शहापूर पोलीसांनी अलीम रशीद गदवाल (वय ३८) रा.लांडे हॉस्पिटल इचलकरंजी याच्या खूनप्रकरणी अल्ताफ शेख व अन्य तिघांच्या विरोधात गु.रजि.नं ./२०२१ भा.दं.वी.कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून अल्ताफ शेख यास इचलकरंजी येथील कोर्टात उभे केले असता. मा.कोर्टाने त्याला ८ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती. कोर्टाच्या बाहेर पोलीसांनी त्याला आणले असताना काही मिडियाचे प्रतिनिधी त्याचे फोटो काढीत होते. त्यावेळी तो त्या मिडियाच्या प्रतिनिधीच्या अंगावर धावत जात त्यांना ओरडत आपण या गुन्हयातील आरोपी नसल्याचे सांगत तुम्ही खऱ्या गुन्हेगारांना ताब्यात घ्या. आपण निर्दोष असून पोलीसांनी माझ्याकडून जबरदस्तीने मला मारहाण करून गुन्हा कबुल करून घेतला आहे.मी न्यायालयात खऱ्या गुन्हेगारांची नावे सांगितली आहेत. त्यांना अगोदर अटक करा.मला व माझ्या घरच्या लोकांना या गुन्हयासंदर्भात धोका आहे असे तो प्रसार माध्यामांच्या प्रतिनिधींना ओरडून सांगत होता. त्यावेळी पोलीसांनी प्रासर माध्यामासमोर आपली बाजू मांडताना सांगितले की संशयीत आरोपी अल्ताफ शेख याला पोलीसांनी त्याला मारहाण केल्याचे त्याचे म्हणणे आहेपरंतू आम्ही त्याची वैद्यकीय तपासणी केली असून तपासणीत मारहाण झाल्याचे निष्पन्न झालेले नाही. तसेच संशयीत आरोपी हा खोटे बोलत असून त्याच्या बोलण्यात तथ्य नाही असे ही पोलीसांनी सांगितले. आरोपीच्या मते मयत अलीम याने त्याच्या सायकली चोरल्या आहेत त्याचे पैसे मी मागत असताना त्याला माझ्याबरोबर इतरांनीही मारहाण केली आहे. त्या मारहाणीत त्याचा मृत्यू झाला आहे.परंतू मयत अलीम याची पत्नी जायदा हिने पोलीसांना दिलेल्या फिर्यादीत अल्ताफ याने घटनेच्या अगोदर एक दिवस घरी येऊन माझ्या नवऱ्याला जीवे मारण्याची धमकी दिलेली आहे असे नमूद केले आहे. यावरून पोलीसांनी त्याला या घटनेतील मुख्य संशयीत आरोपी बनवले आहे. या घटनेचा पुढील तपास शहापूर पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहेत.

## प्रियकराचा लागला तिला भलताच ...

त्यानंतर विठ्ठलवाडी पोलिसांनी गुन्हा रजि. क्रमांक ७६/२१ भादवि ३०२ असा खूनाचा गुन्हा दाखल केल्यानंतर सखोल चौकशीला सुरुवात केली. मयत विद्याची १५ वर्षाच्या मुलीकडून या खूना विषयी काहीतरी माहिती मिळेल अशी पोलीसांना खात्री होती. म्हणून विठ्ठलवाडी पोलीसांनी त्या मुलीला चौकशीसाठी पोलीस ठाण्यात बोलवले.तिला विश्वासात घेऊन पोलीसांनी चौकशी सुरू केली. मात्र सुरुवातीला मला यातलं काहीच माहित नाही म्हणत आईसाठी तिने हंबरडा फोडला.आईबरोबर कुणाशीच भांडण, तंटा नव्हता कुणाशी राग-रूसवा नव्हता. कुणाशी वैर नव्हते मग इतक्या क्रूरपणे तिची हत्या करण्याचे कारण काय असावे. असा प्रश्न पोलीसांनी विद्याच्या मुलीला विचारला परंतू पोलीसांना मयत महिलेच्या अल्पवयीन मुलीकडून उपयुक्त माहिती मिळत नव्हती. त्यात मुलगी अल्पवयीन असल्याने पोलीस तिची सक्तीने चौकशी करू शकत नव्हते. त्यामुळे या हत्येचा तिडा, या हत्येचा गुंता वाढत होता. कोण असेल या माऊलीचा मारेकरी? हा प्रश्न पोलीसांच्या गलेकी हड्डी बनला होता. पोलीसांनी बळीत महिलेच्या मुलीची गोपनीयपणे माहिती काढण्यास सुरुवात केली. तेंव्हा ती एका तरूणाच्या प्रेमात असल्याचे पोलीसांच्या लक्षात आले. विशेष म्हणजे मयत महिलेचा म्हणजे विद्याचा या दोघांच्या प्रेमाला कट्टर विरोध होता. यातून या महिलेची हत्या झालेली नसावी? असा प्रश्न पोलीसांना पडला होता. म्हणून पोलीसांनी अल्पवयीन मुलीच्या प्रियकराची चौकशी सुरू केली. मुलीकडे तिच्या प्रियकराबद्दल विचारणा केली असता ती उडवाउडवीची उत्तरे देत होती. म्हणून पोलीसांना तिचाच संशय आला होता. हि मुलगीच काहितरी लपवत आहे. हिच्याकडूनच या गुन्ह्याची माहिती मिळू शकते असा पोलीसांची ठाम खात्री पटली होती. म्हणून पोलीसांनी तिच्या हालचालींवर नजर ठेवली होती. त्यात पोलीसांना पाहिजे असणारा तिचा प्रियकर दिलजीत यादव पोलीसांना सापडत नव्हता. तो पोलीसांना भेटण्यास टाळाटाळ करीत होता.अखेर पोलीसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले.दिलजीत यादव हा या खूनाशी माझा काहिच संबध नाही मी फक्त त्या मयत महिलेच्या मुलीवर प्रेम करतो आणि प्रेम करणं हा काय गुन्हा नाही. असं तो पोलीसांनाच शहानपणाचे डोस देऊ लागला होता. परंतू पोलीसांना या गुन्ह्यातील हाच आरोपी असावा असा दाट शंका होती. आता पोलीसांनी त्याला पोलीस खाक्या दाखवण्यास सूरवात केली असता दिलजीत यादवने नुसतेच तोंड उघडले नाही तर त्याने हा गुन्हा कसा केला?, कुणाच्या मदतीने केला.? आणि का केला याची इथंभूत माहिती त्याने पोलीसांना दिली. संशयीत अल्पवयीन मुलगी ज्या जीन्स कारखान्यात काम करीत होती तिकडेच दिलजीत यादव हा देखील काम करीत होता.याच दरम्यान मयत महिलेच्या मुलीची आणि दिलजीत यादवची ओळख झाली. यानंतर यांचे प्रेम जमले. यानंतर या दोघांचे अनैतिक संबंध सुरू झाले होते. दोघे ऐकमेकात खोलवर गुंतले होते. या दोघांच्या या संबंधाला मुलीच्या आई विद्याचा प्रखर विरोध होता. तसेच ती दिलजीतला घरी येण्यास मज्जाव करत होती. आईमुळे दोघांना विरह सहन करावा लागत होता. यातून या दोघांनी एक भयंकर कट रचला. मुलीने प्रियकर दिलजीत यादवच्या मदतीने आईला संपवण्याचा निर्णय घेतला. आईला आपल्या आयुष्यातून कायमची बाजूला केली तर आपण आपले उर्वरीत आयुष्य एकत्रीतपणे आनंदात, मजेत काढू शकतो. असे या दोघांनी ठरवले त्यामुळेच दिलजीत यादव विद्याची हत्या करण्यास तयार झाला. प्रेमासाठी वाट्टेल ते म्हणत तो त्या मुलीच्या आईची हत्या करण्यासाठी तिच्या घरी पोहचला. घरी आई एकटीच असल्याचे त्याने पाहिले याचाच फायदा घेत त्याने तिच्या आईच्या गळ्यावर तीक्ष्ण हत्याराने सपासप वार करण्यास सुरुवात केली. अचानक झालेल्या प्राणघातक हल्यामुळे विद्या आपला जीव वाचवण्यासाठी प्रयत्न करीत असतानाच त्याने धारधार सुरीने तिचा गळा चिरून विद्याची निर्घृण हत्या केली.विद्या रक्ताच्या थारोळ्यात निपचित पडल्यानंतर ती मृत पावल्याची खात्री पटल्यानंतर दिलजीत यादव पसार झाला होता. हे काम त्याने काही मिनिटातच केले होते. जन्मदात्या आईच्या हत्येच्या कटात सहभागी असलेल्या १५ वर्षीय मुलीला विठ्ठलवाडी पोलीसांनीताब्यात घेऊन तिला बाल सुधारगृहात पाठवण्यात आलं आहे. तर दिलजीत यादवला खूनाच्या गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे.

## अनैतिक संबंधामुळे मैत्रीची दोरी ...

विद्युत पुरवठा पुन्हा सुरु झाला आणि प्रकाश पडताच त्या प्रकाशात त्यांच्या पापाला वाचा फुटली. कारण मृतदेह गोणीत भरून नेत असतानाच लाईट आल्याने प्रकाश पडताच गावातल्या लोकांनी त्यांना पहिले आणि त्यांना संशय आला आणि त्यांनी मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी तो पोत्यातून नेणाऱ्यांचा पाठलाग केला. तसे ते पोते टाकून पळून जात होते. मात्र मुख्य आरोपी असलेला पिंटू कुमार सापडला. तर त्याचे दोन साथीदार पळून गेले. गावकऱ्यांनी पिंटूला पकडून पोलिसांच्या हवाली केले आणि त्यानंतर चौकशीत त्याने आपला गुन्हा कबुल करून या संपूर्ण हत्याकांडाची माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी पिंटूला अटक करून त्याच्यावर भादवी कलम ३०२,२०१ व ३४ अन्वये गुन्हा दाखल केला.

पान ८ वरून....

## शेतकऱ्यांच्या 'भारत बंद'ला पाठींबा...

अट्टाहास असल्याचे ओनील आल्मेडा म्हणाले. शेतीमालाची विक्री व्यवस्था मोडकळीस आणणारे हे कायदे आहेत. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च आणि त्यामुळे त्यांना सरकारने किमान हमीभाव देणे बंधनकारक असताना अशी कोणतीही तरतूद या ३ कायद्यामध्ये केलेली नाही. ही फक्त शेतकऱ्यांची समस्या नाही तर सार्वजनिक वितरण व्यवस्था यामुळे प्रभावित होणार आहे. म्हणून सर्वसामान्य नागरिकांनी देखील आता रस्त्यावर उतरण्याची आणि पेटून उठण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. हे कायदे रद्द करण्याशिवाय सरकारकडे पर्याय नाही. मात्र त्याकडे ते दूर्लक्ष करीत आहेत असे म्हणत पंजाब आणि हरियाणा येथील शेतकऱ्यांनी आंदोलन करून देशात जनजागृती करण्याचे प्रभावी कार्य केले असल्याचे ओनील आल्मेडा यांनी सांगितले. या एक दिवसीय लाक्षणिक उपोषणाला जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रकाश पाटील, महिला अध्यक्षा प्रवीण चौधरी, बीना मायकल फुटर्याडो तथा काँग्रेसचे महिला व पुरुष कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## पालघर जिल्ह्यात ५ एप्रिलपासुन पुन्हा...

संध्याकाळी ७ वाजेपर्यंत आयोजित करण्यास परवानगी असणार आहे. १५ एप्रिलनंतर मात्र लॉन्स, मंगल कार्यालये, हॉल्स व तत्सम ठिकाणी लग्न व इतर समारंभ आयोजित करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. अत्यंविधी कार्यक्रमामध्ये देखील २० पेक्षा जास्त व्यक्तींना उपस्थित राहता येणार नाही. खाद्यगृहे व बारमध्ये ग्राहकांचे आगमन व निर्गमन नियंत्रित करण्यात आले आहे. तसेच ज्या ठिकाणी खाद्यपदार्थ सेवन करण्यासाठी टेबलाची व्यवस्था असते, अशीच खाद्यगृहे व बार सकाळी ७ ते रात्री ९ पर्यंत सूरु राहतील. होम डिलिव्हरीचे किचन रात्री १० वाजेपर्यंत सूरु ठेवण्यास परवानगी असणार आहे. तर हातगाडी, ठेले व स्टॉल ज्यावर खाद्य पदार्थ सेवन केले जाते व वितरण केले जाते अशी ठिकाणे सकाळी ७ ते संध्याकाळी ८ या कालावधीतच कोविडचे सर्व नियम पाळून सुरु राहतील. दरम्यान, जिम, व्यायामशाळा, स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, खेळाची मैदाने, स्विमिंग टँक हे वैयक्तीक सरावासाठी सूरु राहतील. तर सामूहिक स्पर्धा व इतर कार्यक्रम बंद राहतील. सर्व प्रकारच्या सामाजिक, राजकीय व धार्मिक कार्यक्रमांवर पुर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. सर्व प्रकारची धार्मिक स्थळे देखील संध्याकाळी ७ वाजेपर्यंत सूरु राहतील.

भाजी मंडई ५०% क्षमतेने सूरु राहतील आणि एका-आड-एक या प्रमाणे ओटे सूरु राहतील. सिनेमा हॉल, हॉटेल, रेस्टॉरंट यामध्ये क्षमतेच्या ५०% व्यक्तींनाच उपस्थिती बंधनकारक राहील. प्रवेश देतांना प्रत्येक व्यक्तीस विना मास्क प्रवेश देण्यास मनाई असेल. अशा ठिकाणी प्रवेश द्वारावर थर्मल स्क्रिनिंग घेण बंधनकारक राहील. ताप असलेल्या कोणत्याही व्यक्तीला प्रवेश मिळणार नाही याची खात्री करण्यासाठी वापरल्या जाणार्या तापमान मोजण्याचे उपकरण वापरावे लागले. या निर्बंधाचे उल्लंघन केल्याचे आढळून आल्यास सिनेमा हॉल, हॉटेल, रेस्टॉरंट आणि खाजगी आस्थापना केंद्र शासन जो पर्यंत कोविड-१९ च्या आजारास आपत्ती म्हणून घोषित ठेवत आहे, त्या कालावधीपर्यंत बंद करण्यात येतील व संबंधित धारकांविरुध्द दंडात्मक कार्यवाही देखील करण्यात येईल. शॉपिंग मॉल्सना देखील करोना नियमांचे काटेकोरपणे पालन करावे लागणार असुन सकाळी ७ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंतच सुरु ठेवता येणार आहे. ज्या व्यक्तींची आरटीपीसीआर चाचणी झाली आहे त्यांनी चाचणी अहवाल प्राप्त होईपर्यंत गृह अलगीकरणमध्ये राहणे आवश्यक राहील. अशा व्यक्ती घराबाहेर आढळून आल्यास त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात येईल. होम आयोसोलेशनमध्ये असल्यास याबाबतची माहिती स्थानिक अधिकार्यांना तसेच वैद्यकीय अधिकारी यांना द्यावी लागेल. रुग्ण बाधित झाल्याच्या दिवसापासून दरवाज्यावर होम आयोसोलेशन सुस्पष्ट ठिकाणी बोर्ड लावण्यात येईल. बाधित रुग्णावर होम क्कारंटाईनचा शिक्का मारुन कुटुंबातील व्यक्तींनी देखील बाधित रुग्णाच्या हालचालीवर लक्ष देणे तसेच त्यांनी नियमित मास्क वापरणे बंधनकारक राहील. अलगीकरणाचे कोणतेही उल्लंघन केल्यास नियुक्त केलेले स्थानिक अधिकारी संबंधित इसमाला जवळच्या कोविड सेंटरमध्ये तात्काळ दाखल करतील. दरम्यान, या निर्बंधाचे उल्लघंन करणाऱ्या संबंधितांवर आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करुन कडक कारवाई करण्यात येणार आहे.

## जिल्हा विधी सेवा प्राधिकरण...

अनेक तृतीयपंथी व्यक्तींजवळ भारतीयत्वाचा पुरावाही नव्हता. त्यांच्यासाठी सुरवातीला शिधापत्रिका नंतर मतदानकार्ड, आधारकार्ड, पँन-कार्ड व जनधन बँक खाते काढुन देण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली. यावेळी बोलताना न्या.कंकणवाडी म्हणाल्या की, तृतीयपंथी हे देखील देशाचे नागरिक आहेत. सामान्य नागरिकांप्रमाणे त्यांनाही सर्व सोयीसुविधा मिळाव्यात यासाठी हा उपक्रम आम्ही हाती घेतला आहे. महेश ढवळे यांनीही मनोगत व्यक्त केले. या वेळी १५ तृतीय पंथीयांना शिधापत्रिका व मतदार नोंदणी अर्जाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा महिला-बालकल्याण अधिकारी श्रीमती वर्षा पवार, पुरवठा तहसीलदार देशमुख, नायाब तहसीलदार महामुनी, बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डोंगरगे, प्रा.दिनेश मोने, पुरवठा निरीक्षक गणेश अंबर, लिपिक काळे, ग्राहक पंचायतचे शहराध्यक्ष इस्माईल शेख, विधी स्वयंसेविका अँड.सुनैना बायस, तृतीय पंथीयांच्या गुरुमाऊली प्रीती माऊली लातुरकर व त्यांचे सर्व तृतीयपंथी सहकारी उपस्थित होते.

## कोपरा येथील आरोपींना तात्काळ ...

राष्ट्रगीत घेऊन रास्ता रोकोचा समारोप करण्यात आला. यावेळी सकल मराठा क्रांती मोर्चा, मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड, संभाजी ब्रिगेड चे पदाधिकारी, कार्यकर्ते व विविध समाजातील सामाजिक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## केंद्र सरकार विरोधात वाडा ...

जेष्ठ नेते अदनान धांगे वाडा तालुका अध्यक्ष दिलीप पाटील, वाडा शहर अध्यक्ष सुशील पातकर, नगरसेविका भरती सपाटे,नगरसेविका विशाखा पाटील, सामाजिक कार्यकर्ते आनंता वनगा, मुकेश चौधरी, वाडा शहर उपाध्यक्ष गिरीष पाटील, इंटक तालुका अध्यक्ष शांताराम पाटील किसान काँग्रेस वाडा तालुका अध्यक्ष जयवंतजी पाटील, वाडा तालुका आदिवासी काँग्रेस सेल अध्यक्ष बाळा लहांगे, पालघर जिल्हा युवक काँग्रेस सरचिटणीस यश शिंगडा, वाडा तालुका युवक काँग्रेस अध्यक्ष गणेश (बाळा) बाराठे, पशु काबाडी विक्रमगड आदिवासी काँग्रेस सेल तालुका अध्यक्ष विनोद निबला, देवाशीष वलटे आदी कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी वाडा तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने वाडा तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.

29 MARCH TO 04 APRIL 2021 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 27/03/2021 9:25 PM Page 1



# सराफ व्यापाऱ्यावर हल्ला करून लुटमार करणारे आंतरराज्य गुन्हेगार जेरबंद

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील तडवळ येथील गणेश ज्वेलर्स शॉप दुकानाचे मालक मलिकार्जून गुंडप्पा पोतदार व त्यांचा भाउ सचिन सुरेश पोतदार हे दोघे दि.२३ मार्च २०२१ रोजी दुकानात दिवसभर सोने चांदीचा विक्रीचा व्यवहार करून नेहमीप्रमाणे दुकान बंद करून दुकानात शिल्लक राहिलेले १ किलो २०० ग्रॅम सोन्याचे दागिने व अर्धा किलो वजनाचे चांदीचे दागिने असा एकूण ५४, ३४,०००/- रू. किंमतीचे दागिने एका काळया रंगाच्या रेगझीन बॅग मध्ये घालून ते दोघेजण त्यांचे यूनीकॉर्न मोटार सायकल नं. एम एच १३सी एफ ९६०९ या वरून तडवळ ते कोर्सेगांवकडे सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास घराकडे जात असताना मौजे मुंडेवाडी जाणारे रोडवरील तडवळ गांवालगत असलेले रेल्वे गेट जवळ आले असता समोरून दोन मोटार सायकलवरील अनोळखी ५ इसमांनी त्यांची मोटार सायकल अडवून त्यांचे डोळयात चटणी टाकून त्यांचेजवळील लोखंडी रॉडने त्यांना डोक्यात व हातावर मारहाण करून गंभीर जखमी करून त्यांचेजवळील दागिन्याची बॅग हिसकावून घेण्याचा प्रयत्न करीत असताना फिर्यादीने पिवळया रंगाचा शर्ट असलेले इसमास मिठठी मारून पकडले असता इतरांनी त्यांचेजवळील बॅग हिसकावून घेवून जात असताना चोर चोर म्हणून ओरडल्याने रस्त्याने जाणारे लोक जमा झाले व चोरटे मोटार सायकलवरून केगांवचे दिशेने पळून गेले म्हणून पकडलेल्या इसमासह इतर अनोळखी इसमांनी सोन्या चांदीचे दागिने असलेली बॅग जबरदस्तीने हिसकावून नेले म्हणून मलिकार्जून गुडप्पा पोतदार (वय ३७ रा.कोर्सेगाव ता.अक्कलकोट) यांनी दिलेल्या फिर्यादी वरून राजा नुरुद्दीनसाब सौदागर (वय २२, रा. बळोरगीनगर, आलमेल ता सिंदगी जि विजयपूर राज्य कर्नाटक) गणेश अर्जुन मरगुर (२५), रवी राजकुमार जमगे (२५) यांच्या विरुद्ध अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात गुरनं १०९/२०२१ भादंवि का क ३९५, ३९७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचे गांभीर्य ओळखून तात्काळ गुन्हयाचे ठिकाणी वरिष्ठ अधिकारी, तसेच गुन्हे शाखेकडील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी भेट देवून गुन्हयाची माहिती घेतली. पकडलेल्या इसमाकडे विचारपूस करता त्याने सांगितले की, तो त्याच्या भावासोबत आल्याचे सांगून इतरांची अर्धवट नांवे सांगून, अधिक काही माहित नसल्याचे सांगितले. त्यावरून गुन्हयाची गुंतागुंती वाढल्याने गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांनी रवींद्र मांजरे व त्यांचे पथकास तांत्रिक पध्दतीने विश्लेशन करून गुन्हयाची उकल करण्याबाबत सुचना दिल्या. गुन्हयाचे तांत्रिक पध्दतीने विष्लेशन करीत असताना माहिती मिळाली की, सदर गुन्हयात आलमेल ता. सिंदगी, गुब्याड ता. इंडी जि. विजापूर रा कर्नाटक तसेच गादगी ता. औराद जि. बिदर राज्य कर्नाटक येथील गुन्हेगारांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले.




तेंव्हा सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे यांचे पथकास मिळालेल्या माहिती प्रमाणे कारवाई करणेबाबत सूचना दिल्या. त्याप्रमाणे पथक हे कर्नाटकातील मौजे आलमेल, गुब्याड येथे जावून दोन इसमांची माहिती काढून, बातमीदाराची मदत घेवून त्या दोघांना शिताफीने ताब्यात घेतले, नंतर त्यांना विश्वासात घेवून त्यांचेकडे गुन्हयाचे अनुशंगाने विचापूस केली असता समजले की, मौजे आलमेल व गुब्याड मधील इसमांची मौजे गादगी ता. औराद जि. बिदर येथील काही इसमांची मागील चार महिन्यापूर्वी इंडी येथील हॉटेल मध्ये जेवणखान करीत असताना ओळख झाली. त्यावेळी बिदर कडील इसमांनी त्यांना काही लुटालुटीचे मोठे काम असेल तर सांगा? आम्ही ते काम करून तुम्हांला ही वाटणी देतो'' असे सांगितले होते तेंव्हा पासून त्यांची जवळीक वाढली होती.

मौजे गुब्याड येथील इसमाने मौजे तडवळ ता. अक्कलकोट येथील ज्वेलरी शॉप दुकानाची माहिती काढून त्यांना गुन्हा करण्यासाठी दिनांक २३ मार्च २०२१ रोजी बोलावून घेतले होते. त्यानुसार गादगी ता. औराद जि. बिदर येथील तीन इसम, आलमेल येथील एक इसम, इंडी येथील एक, विजापूर येथील एक असे एकूण सहा जण इंडी येथे एकत्र जमले तेथून दोन मोटार सायकलवर मौजे तडवळ ता. अक्कलकोट येथे येवून त्यांचेपैकी एकास दुकानाजवळ टेहाळणी करण्यासाठी सोडून इतर पाच जण सराफ येण्याजाण्याच्या रस्त्यावर थांबले होते. सराफ दुकानदाराची मोटार सायकल आडवून त्यांचे डोळयात चटणी टाकून, लोखंडी रॉडने मारून, जखमी करून त्यांचेजवळील बॅग हिसकावून आणल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही गांवाकडे येवून चोरलेली बॅग ही एका शेतातील मक्याचे पिकामध्ये पुरून ठेवल्याचे सांगितले. *त्यांचे कब्जातून ८५४.७२ मि.ग्रॅम वजनाचे सोन्याचे वेगवेगळे मुळ दागिने, ७८७ ग्रॅम वजनाचे चांदीचे मुळ दागिने असा एकूण ४१, ६०, २४०/- (४१ लाख ६० हजार २४० रू.) किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यातील आरोपीतांपैकी काही आरोपी हे रेकॉर्ड वरील सराईत गुन्हेगार असून मौजे गादगी ता. औराद जि. बिदर येथील एका इसमा विरूध्द चोरी व खूना सारखे गुन्हे दाखल आहेत. त्या दोघांना गुन्हयाचे तपासकामी अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणे यांचे ताब्यात दिले असून गुन्हयाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक तुकाराम राठोड हे करीत आहेत. सदरची कामगिरी ही सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांचे नेतृत्वाखाली सहा. पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे, सफौ ख्वाजा मुजावर, पोलीस अंमलदार नारायण गोलेकर, धनाजी गाडे, मोहन मनसावाले, धनराज गायकवाड, अक्षय दळवी, चालक समीर शेख यांनी बजावली आहे.

# मांजरा धरणाचे पाणी कालव्याद्वारे सोडल्याने शेतकऱ्यांत आनंद!

**लातूर/प्रतिनिधी**

उन्हाळी पिकाची अवस्था आणि पाण्याची होत असलेली अडचण पाहता लातूर ग्रामीणचे आमदार धीरज विलासराव देशमुख यांनी मांजरा कालव्यातून तातडीने पाणी सोडावे अशी मागणी केली होती. या मागणी प्रमाणे राज्याचे वैदयकीय शिक्षण आणि सांस्कृतिक कार्यमंत्री तथा पालकमंत्री ना.अमित विलासराव देशमुख यांनी मांजरा आणि निम्न तेरणा प्रकल्प कालवा समिती बैठकीत मांजरा धरणातुन पाणी सोडण्यात बाबत निर्देश दिले होते. मांजरा धरणातील कालव्याद्वारे पाणी सोडण्यात आल्याने शेतकरी आनंदीत झाले आहेत. दरम्यान मांजरा धरण क्षेत्रातील शेतकऱ्यांनी शेतीसाठी पाण्याचा वापर काटकसरीने करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यावर्षी पावसाळयात सुरूवातील अत्यल्प पाऊस तर परतीचा पाऊस तेवढ चांगला झाला आहे. पावसाच्या अनियमीततेमुळे पाणी पातळी मात्र वाढली नाही. उन्हाळ्याची तीव्रता वाढल्याने परिणामी सध्या नदी, तलाव, विहीरी तसेच ट्युबवेलची पाणी पातळी कमी झाली आहे. शेतकऱ्यांना उन्हाळी पिकासाठी पाण्याची अत्यंत आवश्यकता होती. मांजरा धरणातून लवकरात लवकर पाणी सोडण्यात यावे अशी मागणीही शेतकऱ्यांकडून होत होती. याअनुषंगाने शेतकऱ्यांनी आमदर धीरज देशमुख यांची भेट घेऊन् मांजरा धरणातून पाणी सोडण्याची मागणी केली. आमदार धीरज देशमुख यांनी पालकमंत्री ना. अमित विलासराव देशमुख यांच्याशी संपर्क करुन मांजरा धरणातून तातडीने पाणी सोडण्याचे गरजेचे आहे हे लक्षात घेऊन त्वरीत पाणी सोडण्याचे निर्देश द्यावेत अशी विनंती केली होती. शेतकऱ्यांच्या मागणीचा विचार करून आमदार धीरज देशमुख यांनी पाठपुरावा केला. यानंतर पालकमंत्री ना. अमित विलासराव देशमुख यांच्या उपस्थितीत मांजरा आणि निम्न तेरणा प्रकल्प कालवा समिती बैठकींत निर्देश दिल्या प्रमाणे मांजरा धरणातून उजव्या व डाव्या कालव्यावदारे २२ मार्चपासून पाणी सोडण्यात आले आहे. आज रोजी ३० ते ३५ किमी पर्यंत पाणी पोहचले आहे. ऊन्हाळी पिकासाठी मांजरा धरणातून पाणी सुटल्याने शेतकऱ्यात आनंदाचे वातावरण असून पालकमंत्री अमित विलासराव देशमुख व आमदार धीरज देशमुख यांचे आभार मानले आहेत.

# लातूर शहरातील रस्ते व प्रमुख चौंकात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार

**लातूर/प्रतिनिधी**

शहरातील नागरिकांची सुरक्षितता आणि वाहतूक सुरळीत करण्याच्या दृष्टिकोनातून महानगरपालिकेच्या वतीने प्रमुख रस्ते व चौकांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत.यासाठी ८२ लाख रुपयांचा खर्च येणार असून जिल्ह्याचे पालकमंत्री अमित विलासराव देशमुख यांनी जिल्हा नियोजन समिती अंतर्गत मान्यता दिली असल्याची माहिती महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी दिली. लातूर शहराचा वेगाने विकास होत आहे.चारही दिशांनी विस्तारित होणाऱ्या शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेला महानगरपालिकेकडून प्राधान्य दिले जात आहे.त्या अनुषंगाने शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी ८२ लाख ९५ हजार ८८९ रुपये खर्च प्रस्तावित आहे. महानगर पालिकेची आर्थिक स्थिती बेताची असल्याने नागरी दलितेत्तर योजनेतून हे काम प्रस्तावित करण्यात आले होते. नुकतीच याच्या प्रशासकीय मंजुरीचे आदेश जिल्हाधिकारी प्रथविराज बी पी यांनी निर्गमित केले आहेत. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत या प्रस्तावाला मान्यता देण्यात आलेली होती. पालिकेकडून तांत्रिक मान्यताही देण्यात आली आहे. आता जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून त्यामुळे लवकरच या कामास प्रारंभ होणार आहे. शहरातील प्रमुख चौक, रस्ते आणि महत्वाच्या ठिकाणी हे सीसीटीव्ही बसवले जाणार आहेत.पोलिस विभागाच्या वतीने त्याचे नियंत्रण केले जाणार आहे. यामुळे शहरातील नागरिकांची अधिक चांगल्या पद्धतीने सुरक्षितता करता येणार आहे. शहरातील वाहतूक सुरळित करण्यासही या सीसीटीव्हीचा फायदा होणार असल्याचे महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी सांगितले.

## मोबाईल टॉवर कंपनीला उच्च न्यायालयाचा दणका

# कराची रक्कम पूर्ण भरल्या शिवाय सुनवाई घेण्यास नकार

**भिवंडी/आकाश गायकवाड**

संपूर्ण देशात मोबाईल कंपन्यांचे एक प्रकारे मक्तेदारी व दादागिरी सुरू असताना, भिवंडी महानगरपालिकेच्या एका प्रकरणात मा. उच्च न्यायालयाने मोबाईल कंपनीला चांगलाच झटका दिला आहे. आकारण्यात आलेल्या कराची रक्कम संपूर्णपणे भरल्याशिवाय सुनावणी घेण्यास माननीय उच्च न्यायालयाने नकार दिला आहे.

याकामी भिवंडी महापालिका क्षेत्रातील एटीएस कंपनीचे व्योम मोबाईल कंपनी म्हणून प्रसिद्ध आहे. या कंपनीचे शहरात एकूण ६७ मोबाईल टॉवर आहेत. या कामी एकूण कराची मागणी ५ कोटी ५३ लाख १३ हजार ईतक्या रकमेचे देयक मोबाईल कंपनीला बजावण्यात आले होते. सदर कंपनीने कराची रक्कम न भरता भिवंडी पालिकेच्या विरोधात माननीय उच्च न्यायालयात याचिका क्रमांक ५८९६/ २०२१ दावा दाखल केला. याबाबत सदर दावा सुनावणीला घेण्यापूर्वी कंपनीला करापोटी मूळ कराची रक्कम ४,६३,१५,१५६ इतकी रक्कम येत्या दहा दिवसात भरण्याचे आदेश माननीय उच्च न्यायालयाने कंपनीला दिले आहेत. त्यामुळे त्यामुळे मोबाईल कंपनीला चांगलाच दणका माननीय उच्च न्यायालयाने दिला आहे. मोबाईल कंपन्याचा शहरात कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता टॉवर उभे करतात व या बाबतीत आकारण्यात आलेला कर देखील भरण्यास टाळाटाळ करतात.

सदर कराची थकबाकी मोठ्या प्रमाणात वाढत जाते व कंपनी माननीय उच्च न्यायालयात धाव घेतात. पण या प्रकरणात एकूण कराची मूळ रक्कम भरल्याशिवाय सुनावणी घेण्यास न्यायालयाने नकार दिल्यामुळे मोबाईल कंपन्यांना चाप बसेल व स्थानिक प्रशासनाला देखील कराची रक्कम वसूल करता येईल. पालिका आयुक्त डॉ.पंकज आशिया, यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, उपायुक्त दीपक झिंजाड, विधी अधिकारी अनिल प्रधान यांनी प्रशासनातर्फे विशेष मेहनत घेतली. पालिकेच्यावतीने ज्येष्ठ विधिज्ञ नारायण बुबना यांनी न्यायालयात बाजू मांडली.



# 'विकेल ते पिकेल' राज्यात प्रभावी योजना

शेती हा देशाच्या तसेच राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा समजला जातो. राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा घटत असला तरी शेतीवर आधारीत लोकसंख्येचे प्रमाण देश व राज्य पातळीवर दिवसेंदिवस वाढत आहे. राज्यात अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांचे प्रमाण ८१ टक्के इतके आहे. जवळपास ८३ टक्के कोरडवाहू क्षेत्र असल्याने जागतिक हवामान बदलाचा तसेच बहुतांश मुख्य पिके जागतिक बाजारपेठेशी जोडलेली असल्याने त्यांच्या आंतरराष्ट्रीय विक्री मूल्यातील चढ-उताराचा थेट परिणाम राज्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नावर होतो. शेतकऱ्यांनी संघटित होऊन गट शेतीच्या माध्यमातून ज्या मालाला बाजारपेठ आहे तो पिकविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. कृषी प्रधान देशात शेतकरी अभिमानाने उभा राहिला पाहिजे . शेतात पिकलेला शेतमाल थेट शहरातल्या घरापर्यंत पोहचविण्यासाठी साखळी निर्माण करण्याकरिता कृषी विभागाच्या माध्यमातून राज्य शासनाने नेहमीच नवनवीन योजना राबविलेल्या आहेत.

जागतिकीकरणाच्या या पर्वामध्ये शेतकऱ्याने उत्पादीत केलेला शेतमाल विक्री करण्याकरीता स्थानिक बाजारपेठ शोधण्याबरोबरच ज्याला जागतिक बाजारपेठेत मागणी आहे व ज्यापासून शेतकऱ्यांना अधिक उत्पन्न मिळू शकेल अशा विकेल ते पिकेल या धोरणाचा अंगिकार करून पिक पध्दती व शेतीपध्दतीची पुर्नमांडणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उध्दव बाळासाहेब ठाकरे यांनी जानेवारी २०१९ मध्ये संकल्पना मांडली.दि.१० सप्टेंबर २०२० रोजी या योजनेची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यात आली. या यासाठी राज्याची कृषि क्षेत्रातील बलस्थाने आणि राज्यात जे सामाजिक भांडवल व पायाभूत सुविधा निर्माण होत आहेत. त्यांचा योग्य वापर करून बाजाराभिमुख कृषि विकासाच्या आधारे देशांतर्गत आणि जागतिक बाजारपेठेतील संधीचा लाभ थेट शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी अधिक नियोजनबध्द अशी 'विकेल ते पिकेल' ही योजना राबविण्यात आली आहे. कृषी प्रधान देशात शेतकरी अभिमानाने उभा राहिला पाहिजे . शेतकरी संघटित होणे गरजेचे असून शेती उद्योगक्षम होऊन अन्नदाता सुखी झाला पाहिजे. बाजारात कुठल्या मालाला मागणी आहे याचे नियोजन करुन महाराष्ट्रात विभागवार शेती व्हावी या दृष्टीकोनातूनदर्जेदार उत्पादन घेऊन 'विकेल ते पिकेल' या संकल्पनेच्या आधारे शेतकऱ्याला फायदेशीर उत्पन्न मिळेल.शेतकऱ्याने पिकवलेल्या मालाला हमखास भाव मिळवून शेतकऱ्याला चिंतामुक्त करण्यासाठी 'विकेल ते पिकेल' ही योजना राबविण्यात आली आहे.

महाराष्ट्र फलोत्पादनात अग्रेसर आहे . राज्यातून फळे, भाजीपाला मोठ्या प्रमाणावर निर्यात होत आहे . राज्यात भाजीपाला रोपांची मागणी वाढत असून भाजीपाला लागवडीस प्रोत्साहन देण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटीका योजनेच्या माध्यमातून प्रयत्न केले जाणार आहे. प्रायोगिक तत्वावर या योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात ५०० लाभार्थ्यांची निवड करुन त्यामध्ये प्रयोगशील शेतकरी, महिला बचत गट , शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी गट यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. महाराष्ट्राची शेती मोठमोठया उद्योगधंदय़ांना कच्चा माल पुरविण्याचा मुख्य स्त्रोत आहे. कापड आणि ज्युट, साखर, वनस्पती तेल इत्यादी उद्योग आहेत. जे अप्रत्यक्षरीत्या शेतीवर अवलंबून आहेत. आपल्या देशातील छोटेछोटे कुटीरउद्योग उदाहरणार्थ, हातमाग, तेलबिया, भातगिरण्या इत्यादी कच्च्या मालाकरिता शेतीवर अवलंबून असतात. शेतमालाच्या उत्पादकाला व ग्राहकाला काय हवे याचा शोध घेऊन त्यानुसार पिक पध्दती, कृषि प्रक्रिया, पुरवठ्याची साखळी व विक्री व्यवस्था विकसित करणे आवश्यक आहे. त्यासाठी शेतकरी बांधवांना विकेल ते पिकेल हे अभियान मदत करेल. उत्पादक शेतकऱ्यांना प्रक्रिया उद्योग, किरकोळ विक्री साखळ्या आणि कृषि आधारित उद्योजकांच्या माध्यमातून नवीन व संघटीत बाजारपेठेत प्रवेश मिळवून देण्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण, तांत्रिक सहाय्य, पायाभूत सुविधा आणि जोखीम निवारण क्षमता विकसित करण्यासाठी शासनाच्या विविध विभागातील योजनांद्वारे गुंतवणूक करण्यात येणार आहे. त्यसाठी कृषि विभागामार्फत पिकनिहाय विविध मूल्यसाखळी प्रकल्प उभे करण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांनी एकत्र येऊन गटशेती तसेच शेतकरी बचतगट स्थापन केलेल्या संघ/संस्थांच्या माध्यमातून काढणीपश्यात हाताळणी, मुल्यवृध्दी आणि प्राथमिक प्रक्रिया केलेला शेतमाल थेट संघटीत खरेदीवर, प्रक्रिया उद्योग आणि निर्यातदारांना पुरवठा करण्यासाठी शासनामार्फत विशेष प्रयत्न केले जातील. 'विकेल ते पिकेल' या अभियानाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत- बाजारात मागणी असलेल्या पिकांच्या लागवडीवर भर देणे, शेती पिकाचे अधिक दर्जेदार व गुणवत्तापूर्ण उत्पादन घेणे, शेतीव्यवसाय हा उद्योगक्षम करणे, शेतमाल विक्रीसाठी ब्रॅन्ड विकसित करणे, शेतमाल मूल्यसाखळी विकास प्रकल्पांच्या माध्यमातून बाजाराच्या वाढीव संधी उपलब्ध करणे, कृषि व्यवसाय सुलभतेसाठी धोरणात्मक बदल करणे, कृषि क्षेत्रात गुंतवणूक वाढविणे, शेती उत्पन्नात शाश्वतता आणणे व निव्वळ उत्पन्नात वाढ करणे, बाजारपेठीय माहितीचे विश्लेषण करणे व उत्पादकांना त्याची माहिती देणे होय. शेतकऱ्यांचा माल ग्राहकांपर्यत पोहचविताना अस्तित्वात असलेल्या साखळीतील टप्पे कमी करणे, विक्री तंत्रासाठी आवश्यक किमान दर्जा, प्रतवारी, स्वच्छता व सुकविणे यासारख्या कमी खर्चाच्या परंतु दरात खूप फरक करणाऱ्या घटकांसाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जाईल.

कार्यवाहीचे स्वरुप-ताजा शेतमाल, भाजीपाला, फळे यांची थेट विक्री, पिक, शेतमालाची निवड करणे, इच्छुक उत्पादक शेतकरी, गट, समुह, शेतकरी उत्पादक कंपनीची निवड करणे, गांव, तालुका, जिल्हा, नगरपालिका क्षेत्र, गृहनिर्माण संस्था, राष्ट्रीय महामार्ग इ.ठिकाणी विक्री व्यवस्था निर्माण करणे, विक्रेता, खरेदीवर निवडून त्यांना शेतमालाची विक्री करणे, पिक, शेतमालाची निवड करणे,विक्रेता, खरेदीदार, बाजार व्यवस्थेची निवड करणे, आवश्यकता मागणीप्रमाणे शेतमालाचा पुरवठा करणे, पायाभूत व्यवस्थेसह प्रक्रियायुक्त शेतमालाची विक्री, पिक, शेतमालाची निवड करणे, इच्छुक उत्पादक शेतकरी, गट , समुह शेतकरी उत्पादक कंपनीची निवड करणे, विक्रेता, खरेदीवर, बाजार व्यवस्थेची निवड करणे, आवश्यक पायाभूत सुविधांची निश्चिती करणे, योजनांची व निधीची उपलब्धतेप्रमाणे सांगड घालणे, आर्थिक व्यवहार्यता तपासणे, बँकेसाठी प्रस्ताव तयार करणे, प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे इत्यादी. निधीची उपलब्धता व नियोजन- विकेल ते पिकेल अभियानाचे अंमलबजावणीसाठी कृषि व संलग्न विभागांच्या तसेच सहकार, पणन, नाबार्ड इत्यादी विभागांच्या विविध योजनाची सांगड घालण्यात आली आहे. प्रथम विविध योजनांतर्गत शेतकरी गटांना त्यांचा शेतमाल थेट ग्राहकांना विक्री करण्यासाठी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. तसेच या गटांचे मालाचे विक्रीसाठी प्रक्रियादार, निर्यातदार, सहकारी भांडार, गृहनिर्माण संस्था यांना जोडण्यात आल्या आहेत. यामधून सक्षमपणे काम करणाऱ्या गटांची निवड करून त्यांचे शेतकरी उत्पादक कंपन्यांमध्ये रुपांतर करता येईल व त्यासाठी एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, प्रधान मंत्री सूक्ष्म खाद्य उद्योग उन्नयन योजना या योजनामधून प्राधान्याने अनुदान देण्यात उपलब्ध करुन दिले जाईल. याशिवाय शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्यासाठी १० हजार शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करणे योजनेचा लाभ घेता येईल. याशिवाय चांगले संघटन झालेले गट, कंपन्या यांच्या माध्यमातून मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत मुल्यसाखळी विकसित करण्यात आली आहे. यासाठी आवश्यक वित्तीय सहाय्य मिळवणेसाठी कृषि पायाभूत सुविधा योजनेचा लाभ घेता येईल. वरील प्रचलित योजनांचा लाभ गटांना प्राधान्याने देता येईल. यासाठी योजनामधील (४० ते ५० टक्के) तरतूद राखीव ठेवण्यात आली आहे. विकेल ते पिकेल अभियानाच्या अंमलबजावणीसाठी कृषि व संलग्न विभागांच्या कार्यक्रमातील हस्तक्षेप व परिणाम या संदर्भात मार्गदर्शन, प्रकल्प मंजुरी व देखरेखीसाठी राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. कृषि आयुक्त हे या समितीचे अध्यक्ष आहेत. त्याच प्रमाणे जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. त्या त्या जिल्हयाचे जिल्हाधिकारी हे अध्यक्ष असतील. ही योजना यशस्वीरीत्या चालविण्यासाठी तसेच योजने बाबत पारदर्शकता रहावी यासाठी राज्सतरावरील नोडल एजन्सी म्हणून कृषि आयुक्तालय स्तरावर एका कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

राज्यात शेती व्यवसाय करताना होणारे अपघात, वीज पडणे, पूर, सर्पदंश, विंचूदंश, विजेचा शॉक बसणे आदी आपत्तीमुळे होणारे अपघात, रस्त्यावरील अपघात, वाहन अपघात तसेच अन्य कोणत्याही कारणामुळे होणारे अपघात झाल्यास वेळोवेळी शासन मदतीसाठी धावले आहे. राज्य आज तंत्रज्ञानात आघाडीवर असलं तरी आजही राज्यात शेतकरी आणि त्याचा शेती व्यवसाय हा महाराट्रातील प्रमुख व्यवसाय आहे. शेतकऱ्यांना समृद्धी प्राप्त व्हावी आणि त्यांची कर्जातून कायमस्वरुपी मुक्तता व्हावी या उद्देशाने राज्यात सन २०२२ या वर्षापर्यंत खरीप आणि रब्बी हंगामातून सध्या प्राप्त होत असलेल्या उत्पन्नाच्या दुप्पट उत्पन्न व्हावे यासाठी 'उन्नत शेती -समृद्ध शेतकरी' सारखी यशस्वी मोहीम राबविण्यात येत आहे. विकेल ते पिकेल अभियान राज्याली अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांसाठी सुरु केले आहे. अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्याचं राज्यातील प्रमाण ८१ टक्के असून ८३ टक्के शेती कोरडवाहू आहे. ही वस्तूस्थिती लक्षात घेऊन शेतकरी व ग्राहकांच्या मागण्या निश्चित करणे, शेतकऱ्यांचं बाजारभावातील अनिश्चिततेमुळे होणाऱ्या हानीपासून संरक्षण करणे असा या अभियानाचा उद्देश आहे. विकेल ते पिकेल' या अभियानांतर्गत ग्राहकांना व व्यापाऱ्यांना शेतमालाची विक्री केली जाणार आहे. प्रक्रिया केलेल्या शेतमालाच्या विक्रीसाठी पायाभूत सुविधा विकसित केल्या जाणार आहेत. या अभियानाची अंमलबजावणी राज्य शासनाचे विभाग आणि नाबार्ड यांच्या मार्फत करण्यात येत असून संत शिरोमणी श्री सावतामाळी शेतकरी आठवडे बाजार अभियानांतर्गत सप्टेंबर २०२० पासून ७६ आठवडे बाजार कार्यरत आहेत. हे अभियान विकेल ते पिकेल अभियानाअंतर्गत राबवण्यात येत आहे. याचा प्रतिसाद ग्रामीण भागासोबतच शहरी भागात अधिक दिसून येत आहे.

**- प्रविण डोंगरदिवे; माहिती सहाय्यक**
**विभागीय माहिती कार्यालय, कोकण विभाग, नवी मुंबई**




# पालघर जिल्ह्यात ५ एप्रिलपासुन पुन्हा निर्बंध

## दुकाने सकाळी ७ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत खुली राहणार

### शाळा, महाविद्यालये, खाजगी क्लासेस तसेच सामाजिक, राजकीय, धार्मिक कार्यक्रम पुर्णपणे बंद!

**पालघर/प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यात (वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्र वगळून) मागील काही दिवसांपासुन करोना रुग्णांच्या संख्येत होत असलेली मोठी वाढ लक्षात घेता जिल्हा प्रशासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार जिल्ह्यात पुन्हा निर्बंध लागू करण्यात आले असुन येत्या पाच एप्रिलपासुन जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालये, खाजगी क्लासेस तसेच सामाजिक, राजकीय, धार्मिक कार्यक्रम पुर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दुकाने, मॉल्स, हातगाडी व ठेल्यांवरील खाद्य पदार्थ विक्रेत्यांसह अनेक बाबींवर वेळेचे व नागरीक क्षमतेचे बंधन लादण्यात आले आहे. आज, २६ मार्च रोजी पालघर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची



जिल्ह्यातील कोविड परिस्थितीबाबत आढावा बैठक पार पडली. या बैठकीत जिल्ह्यातील करोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी चर्चा होऊन याबाबत रुपरेषा निश्चित करण्यात आली. त्यानुसार येत्या ५ एप्रिलपासुन विविध बाबींवर निर्बंध लादण्याचा निर्णय घेण्यात आला.

आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण कार्यालयाने प्रसिद्धीस दिलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, पाच एप्रिलपासुन जिल्ह्यातील सर्व शाळा, कॉलेजेस व कोचिंग क्लासेस पुढील आदेशापर्यंत पुर्णपणे बंद करण्यात येणार आहेत. चालू शैक्षणिक वर्षातील १० वी व १२ वी इयत्तेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांच्या संमतीने उपस्थिती ऐच्छिक राहील. तसेच या संस्थांद्वारे ऑनलाईन स्वरुपात कामकाज सूरु ठेवता येईल. तर राष्ट्रीय, राज्य, विद्यापीठ, शासन किंवा शिक्षण मंडळ स्तरावरील यापुर्वीच घोषित झालेल्या परीक्षा कोविड-१९ विषयक सर्व मार्गदर्शक सुचनांचे पालन करुन घेण्यास परवानगी देण्यात आली आहे. जिल्ह्यातील सर्व दुकाने ५ एप्रिलपासुन सकाळी ७ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंतच सुरु राहतील. मात्र हे निर्बंध अत्यावश्यक सेवा, मनुष्य व प्राणीमात्रांसाठी जिवनावश्यक वस्तू, दूध, पेट्रोल पंप व औषधांच्या दुकानांना लागू राहणार नाही. १५ एप्रिलपर्यंत पुर्वनियोजित असलेल्या लग्न व इतर समारंभांच्या बाबतीत स्थानिक प्रशासन व संबंधित पोलीस स्टेशनकडून परवानगी घेऊन कोविड-१९ च्या सर्व मार्गदर्शक सुचनांचे पालन करुन सकाळी ७ ते ...पान ६ वर

# शेतकऱ्यांच्या 'भारत बंद'ला पाठींबा देण्यासाठी काँग्रेसचे लाक्षणिक उपोषण



**वसई/प्रतिनिधी**

केंद्र सरकारने आणलेल्या ३ शेतकरी कायद्यांना तीव्र विरोध करण्यासाठी मागील १०० दिवसांपेक्षा जास्त काळापासून दिल्लीच्या वेशीवर शेतकरी आंदोलन करीत आहेत. शेतकरी संघटनांनी देशभर भारत बंदची हाक दिली होती. त्यास पाठींबा म्हणून प्रदेश काँग्रेसने राज्यात एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्याचे जाहीर केले होते. वसई विरार जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष ओनील आल्मेडा यांच्या नेतृत्वाखाली वसई पारनाका येथील काँग्रेस भवन पटांगणात सकाळी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपोषणास बसले होते. बीजेपी सरकार हाय हाय, जुमला सरकार हाय हाय, बीजेपी हटाव देश बचाव, नानाभाऊ पटोले आगे बढो हम तुम्हारे साथ है अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या. शेतकरीविरोधी कायदे केंद्र सरकारने रद्द करावेत यासाठी जिल्हा काँग्रेसतर्फे वसईच्या तहसीलदार उज्ज्वला भगत यांच्या मार्फत राष्ट्रपतींना निवेदन देण्यात आले. या कायद्याची मागणी केली नसताना निव्वळ भाजपचे मित्र अडाणी आणि अंबानी यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठीच हे शेतकरीविरोधी कायदे त्यांच्यावर लादण्याचा मोदी सरकारचा ...पान ६ वर

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व ग्राहक पंचायतीच्या वतीने तृतीय पंथीयांना शिधापत्रिका वाटप



**लातूर/प्रतिनिधी**

भारतीयत्वाचा पुरावाच नसलेल्या अनेक तृतीय पंथीयांना जिल्हा विधीसेवा प्राधिकरण व अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या वतीने शिधापत्रिका प्रदान करण्यात आल्या. यानंतर आता त्यांना आधारकार्ड, पॅन कार्ड, मतदान ओळखपत्र व जनधन बँक खाते काढून दिले जाणार आहे. तृतीय पंथीयांची आजची अवस्था पाहता जिल्हा व सत्र न्यायधीश आर.एस.तिवारी यांच्या मार्गदर्शनात विधी-सेवा प्राधिकरणाच्या सचिव तथा न्यायाधीश श्रीमती सुनिता कंकणवाडी व अन्न आयोगाचे सदस्य तथा अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे अँड.महेश ढवळे यांनी त्वरित दखल घेतली. पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना बोलावुन तात्काळ शिधापत्रिका देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावयास सांगितले. त्यानुसार पुरवठा अधिकारी के.डी देशमुख यांनी अवघ्या चार तासात शिधापत्रिका तयार केल्या. तृतीयपंथी समाजाच्या समस्यांचे निराकरण केले. ...पान ६ वर

# कोपरा येथील आरोपींना तात्काळ अटक करा!

## मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने अहमदपूरात रास्ता रोको



**अहमदपूर/फिरोज शेख**

तालुक्यातील कोपरा किनगांव येथे १२ मार्च रोजी घडलेल्या घटनेतील आरोपींना तात्काळ अटक करा व पिडीतेला न्याय मिळवून देण्याच्या व इतर मागण्यासाठी मराठा क्रांती मोर्चच्या वतीने अहमदपूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात दोन तास रास्ता रोको करून मागण्यांचे निवेदन प्रशासनाला सादर करण्यात आले.

याबात अधिक अशी की, कोपरा येथे १२ मार्च रोजी अतिक्रमन काढण्याच्या नावाखाली सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, सदस्य व गावातील इतर व्यक्तींनी एका २३ वर्षीय मुलीला अमानुषपणे मारहान करुन अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न गावगुंडानी केला. त्यामुळे त्या २३ वर्षीय तरुणींचे आयुष्य बरबाद झाले असुन यास जबाबदार कोण? असा सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला. या प्रकरणातील मुख्य आरोपी अद्यापपर्यंत अटक न झाल्यामुळे समाजाच्या भावना उफाळून आल्या आहेत. त्यामुळे नाईलाजास्तव आंदोलन करण्याची वेळ मराठा क्रांती मोर्चावर आली आहे. पोलीस प्रशासनाने तात्काळ मुख्य आरोपींना अटक करून पिडीतेला न्याय मिळवून द्यावा. कोपरा येथील प्रकरणातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी, पिडीतेवरील खोटा ॲट्रोसटी व शासकीय कामात अडथळा हा दाखल गुन्हा रद्द करण्यात यावा., ग्रामसेवकाचे निलंबन करण्याया यावे. सरपंच व उपसरपंचाचे पद रद्द करण्यात यावे. या प्रकरणी पिडीतेच्या बाजुने विशेष सरकारी वकीलाची नेमणुक करण्यात यावी. दिशा कायदा अंतर्गत या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी. पिडीतेचे पुर्नवसन करून दहा लाखाची तात्काळ आर्थिक मदत करण्यात यावी. पिडीतेस शासकीय सेवेत नोकरी देण्यात यावी. अशा विविध मागण्यांसाठी मराठा क्रांतीमोर्चाच्या वतीने कोवीड-१९च्या नियमांचे पालन करून शांततेत रास्ता रोको करण्यात आला. या मागण्या तात्काळ मान्य नाही झाल्यास मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येणार आहे. यावेळी सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालुन अभिवादन करण्यात येऊन जिजाऊ वंदना घेण्यात आली व रास्ता रोकोस सुरुवात करण्यात आली. व तसेच प्रशासनाला निवेदन देवून ...पान ६ वर

# केंद्र सरकार विरोधात वाडा तालुका काँग्रेसच्या वतीने लाक्षणिक उपोषण




**वाडा/प्रतिनिधी**

अखिल भारतीय काँग्रेस कमिटी व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सूचनेनुसार केंद्रातील भारतीय जनता पार्टी सरकारने शेतकऱ्यांच्या विरोधात जे अन्यायकारी तीन काळे कायदे पास केले आहेत, कामगार विरोधी कायदा, गॅस, डिझेल, पेट्रोल यांच्या वाढत्या दराने व महागाईमुळे सर्वसामान्य जनतेचं या असंवेदनशील सरकारनं कंबरडं मोडलं आहे. या असंवेदनशील भारतीय जनता पार्टीच्या केंद्रातील सरकारच्या विरोधात शुक्रवारी (दि.२६) वाडा तालुका काँग्रेसच्या वतीनं एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आलं या वेळी केंद्रातील हुकूमशाही आणि असंवेदनशील सरकारचा निषेध करण्यात आला. याप्रसंगी महाराष्ट्र किसान काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष पराग पष्टे, महाराष्ट्र महिला काँग्रेस प्रदेश सरचिटणीस संगीता धोडी, पालघर जिल्हा काँग्रेस कार्याध्यक्ष मधुकर चौधरी, पालघर जिल्हा काँग्रेस सरचिटणीस रामदास जाधव,पालघर जिल्हा काँग्रेस सरचिटणीस सचिन शिंगडा, पालघर जिल्हा महिला काँग्रेसच्या कार्याध्यक्ष शरयू औसरकर, पालघर जिल्हा काँग्रेस ओ.बी.सी सेलचे जिल्हाध्यक्ष प्रमोद पाटील, काँग्रेस जेष्ठ नेते सुसे सेवादल पालघर जिल्हा अध्यक्ष लोकेश पाटील, पालघर जिल्हा सरचिटणीस स्वप्नील ठाकरे, ...पान ६ वर

